६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी
सरकार घडविणार
तीर्थक्षेत्राची यात्रा

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना



MCED
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन

वर्ष ३४ वे

मासिक

# उद्योजक

ऑक्टोबर
2024
₹ 75/-

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र




सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत गुंतवणूक

## १ लाख १७ हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण-२०२४ ला मंत्रिमंडळाची मान्यता

## लॉजिस्टिक धोरणामुळे ५ लाख रोजगार, ३०,५७३ कोटीचे उत्पन्न









कोकणच्या दिघीत
औद्योगिक स्मार्ट सिटी

## ३८ हजार कोटींची गुंतवणूक

# सर्वोत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण

उद्योजकता विकास क्षेत्रात ३४ वर्षापासून कार्यरत संस्था

## ध्येय (Mission)

जागतिक पातळीवर उद्योजकीय चैतन्य निर्मिती

## दृष्टिकोन (Vission)

ग्राहकांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून, संघटना व व्यक्ती यांच्या उद्योजकीय व व्यवस्थापकीय क्षमतेत वृद्धी होण्यासाठी, नविनतम तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना करत साह्यभूत ठरणे. कर्मचाऱ्यांचे हित व आकांक्षा जोपासत संस्था आत्मनिर्भर व विश्वात उत्कृष्ट संस्था म्हणून संबोधली जावी.

## • ध्येय धोरणे •

१) होतकरू व नवउद्योजकांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रशिक्षणाद्वारे यशस्वी उद्योजक घडविणे.
२) राज्यात उद्योजकतेचा प्रचार व प्रसार करणे. ३) उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे.
४) उद्योजकतेशी निगडीत सल्ला सेवा, ट्रेनिंग सेंटर, तांत्रिक वर्कशॉप, इंडस्ट्रियल क्लिनिक, निर्मिती केंद्र सुरू करणे.
५) उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती / ज्ञानाचे आदान-प्रदान. ६) संस्थाना प्रशिक्षण गरजांविषयी सहकार्य करणे.
७) उद्योजकतेशी निगडीत नियतकालिके/प्रकाशने प्रकाशित करणे.

### संस्थेचे प्रमुख उपक्रम

१) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)
२) स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रम (DPSE)
३) व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम (VTP)
४) उद्योजकता परिचय कार्यक्रम (EAP)
५) व्याख्याते प्रशिक्षण कार्यक्रम (FDP)
६) प्रेरक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (TTP)
७) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंर्तगत व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम (PMEG)
८) व्यवस्थापन विकास कार्यक्रम/संस्था विकास कार्यक्रम
९) उद्योजक मासिक
१०) माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### उपलब्ध प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा

१) सुसज्ञ प्रशिक्षण हॉल
२) प्रशिक्षणाच्या अत्याधुनिक सुविधा.
३) सुसज्ञ असे निवासी वस्तीगृह.
४) माहितीने परिपूर्ण असे ग्रंथालय.
५) उपहारागृहाची सुविधा.
६) इंटरनेट, व्हिडोओ कॉन्फरन्सींग सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध.
७) स्वतःचे वेब पोर्टल कार्यान्वीत.
८) तज्ज्ञ मनुष्यबळ व प्रशिक्षीत प्रेरक प्रशिक्षकांचा समूह.
९) ११ विशेष कक्ष (सेंटर), ८ विभागीय कार्यालये व प्रत्येक जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षकाची उपलब्धता.
१०) उद्योजकतेच्या क्षेत्रांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी समन्वय.

प्रशिक्षणाच्या गरज पूर्तीसाठी संपर्क साधा.

मा. कार्यकारी संचालक
**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**
अ-३८, एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन औरंगाबाद-४३१ ००५.

Email : executivedirectormced3@gmail.com
udyojakmagazine2@gmail.com
Portal : www.mced.co.in

उद्योजकीय मन घडविणारे मासिक
**उद्योजक**

**Visit us @ http://www.mced.co.in**

**उद्योजक**

*October-2024, VOL.XXXIV, ISSUE X*

मुख्य संपादक
**बी. टी. यशवंते**

व्यवस्थापकीय संपादक
**संतोष बोर्डे**

विभाग प्रमुख, उद्योजक मासिक
**संतोष बोर्डे**

मुखपृष्ठ
**संतुक गोलेगावकर**

**पत्रव्यवहार**
मुख्य संपादक, उद्योजक,
अ-38, एम.आय.डी.सी.,
रेल्वे स्टेशन परिसर,
छत्रपती संभाजीनगर - 431 005.
☎ 2321223, 2321224
फॅक्स : (0240) 2341719



**सल्लागार मंडळ**

डॉ. भा. र. साबडे
संचालक, आयएसबीआय, पुणे

डॉ. यु. म. पठाण
ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.

श्री. राम भोगले
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर

श्री. रा. रं. बोराडे
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.

संपादक
दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर

श्री. विवेक देशपांडे
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर

श्री. सुधीर सेवेकर
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर

अध्यक्ष, मसिसा, छत्रपती संभाजीनगर

विभागप्रमुख, जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

श्री. सुरेश वाघ, नाशिक



उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन
अंतर्गत कार्यरत संस्था

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र
यांचे प्रकाशन



**E-mail :**
udyojakmagazine1@gmail.com
udyojakadvt@gmail.com

**Portal :**
www.mced.co.in


**कोणत्याही महिन्यापासून 'उद्योजक'चे वर्गणीदार होता येईल.**

# देशाचे लॉजिस्टिक हब महाराष्ट्र



एव्हाना पावसाळा संपत आला आहे. सर्वदूर हिरवळ पसरली आहे. त्यातच महत्त्वाच्या सणांना सुरुवात झाली आहे. त्यामुळे बाजारपेठेत चैतन्याचे, आनंदाचे वातावरण आहे. अशा आनंदाच्या वातावरणात राज्याचे उद्योग विश्वही न्हाऊन निघाले आहे. जगभरातील उद्योग समूह पुढील गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पसंती देत आहेत. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळख असणारे महाराष्ट्र आता देशातील प्रमुख लॉजिस्टिक हब म्हणूनही नावारूपाला येत आहे. २०२८ पर्यंत एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साकारण्यासाठी महाराष्ट्र सज्ज झाला आहे.

राज्य मंत्रिमंडळाने नुकतेच 'महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण-२०२४' ला मंजुरी दिली. या धोरणात प्रकल्पांना देऊ केलेली विशेष प्रोत्साहने व सुविधांमुळे राज्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे ५ लाख रोजगारनिर्मिती होणार आहे, तर आगामी १० वर्षात सुमारे ३०,५७२ कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न मिळेल. केंद्र शासनाच्या नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी २०२२ नुसार भारतातील लॉजिस्टिकवर होणारा खर्च १४ ते १५% आहे. लॉजिस्टिक क्षेत्र हे देशात २.२ कोटी लोकांना रोजगार पुरवते. देशामध्ये वार्षिक ४.६ अब्ज टन उत्पादनाची वाहतूक व हाताळणी याकरिता रु. ९.५ लाख कोटी इतका खर्च येतो. महाराष्ट्राचा यामध्ये मोठा वाटा असून, राज्यात १७,७५७ किमी लांबीचे राष्ट्रीय महामार्ग व २८,४६१ किमी लांबीच्या राज्य महामार्गासह राज्यामध्ये पायाभूत सुविधांचे विस्तीर्ण जाळे आहे. तसेच राज्यामध्ये ११,६३१ किमीचे रेल्वेचे जाळे असून त्याअंतर्गत ५४८ रेल्वे गुड्स शेड्सचा समावेश आहे. सागरी आणि हवाई जोडणी अंतर्गत राज्यामध्ये दोन मोठी व ४८ लहान बंदरे, ५३ आंतरदेशीय कन्टेनर डेपो आणि कन्टेनर फ्रेट स्टेशन, ८ खासगी माल वाहतूक टर्मिनल आणि ११ एअर कार्गो टर्मिनल्स या सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. त्यादृष्टीने महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी लॉजिस्टिक धोरण महत्त्वाचे ठरणार आहे.

उद्योगांना चालना देण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रामध्ये नवीन रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या क्षमता वाढीसाठी २ महत्त्वाकांक्षी सामंजस्य करार केले. राष्ट्रीय उद्योजकता आणि लघुउद्योग विकास संस्थेसह नियोक्ता महासंघ व भारतीय उद्योग संघासोबत करार करण्यात आले, तर जागतिक बँक व सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार यांचा सहयोग असलेल्या रॅम्प कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी तब्बल १३ औद्योगिक संघटनांसोबतही करार करण्यात आले. या करारांमुळे उद्योगांच्या वाढीस वेग येणार आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' ही योजना सुरू केली. त्याला मिळत असलेला प्रतिसाद सरकारची महिलांप्रति असणारी संवेदनशीलता दर्शविते. यासोबतच समाजातील तळागाळातील व्यक्तींच्या कल्याणासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना यासारख्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. या योजना व उपक्रमांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रम सुरू केला असून, याअंतर्गत ५०,००० योजनादूत नेमले जात आहेत. १८ ते ३५ वयोगटातील 'योजनादूत' १० हजार रुपये मानधनावर पुढील ६ महिने सर्वसामान्यांपर्यंत सरकारी योजनांची माहिती पोहोचवतील. योजनादूतांना शासनाचे अनुभव प्रमाणपत्र मिळेल. त्याचा अन्य ठिकाणी रोजगारासाठी उपयोग होईल.

२०१४ मध्ये केंद्रातील एनडीए सरकारच्या पहिल्या टर्मच्या सुरुवातीला भारत जगातील अर्थव्यवस्थांमध्ये १० व्या स्थानावर होता. दुसऱ्या टर्ममध्ये ५ व्या स्थानावर आला. तिसऱ्या टर्ममध्ये २०२८ पर्यंत ५ ट्रिलियन अमेरिकी डॉलर्ससह भारत जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये सामील करण्याचे केंद्राचे उद्दिष्ट आहे. ते पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा वाटा देणार आहे. देशात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सर्वात मजबूत असून देशाच्या एकूण उत्पन्नात राज्याचा वाटा १४ टक्के आहे. राज्याची औद्योगिक प्रगती बघता हे उद्दिष्ट साध्य करणे फार कठीण ठरणार नाही.

उत्तम पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक संपदा, दर्जेदार शैक्षणिक संस्था आणि त्यातून निर्माण होणाऱ्या कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेमुळे महाराष्ट्राला नेहमीच वेगळी ओळख मिळाली आहे. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगतीशील राहून आपले पुरोगामीत्व सिद्ध करणाऱ्या महाराष्ट्राने शाश्वत विकासाच्या दिशेने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. महाराष्ट्र हे देशातील आघाडीच्या औद्योगिक राज्यासह लॉजिस्टिक हब म्हणून नावारूपाला आले आहे. भविष्यात ही ओळख अजून गडद होणार आहे.

**दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.**
विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन तथा
अध्यक्ष, सुकाणू समिती, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)


Edited & Published by Santosh Borde printed at M/s. Printwell International Pvt. Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar for Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC Area, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar. Not responsible for unprinted articles. Chief Editor : B. T. Yeshwante

# उद्योजक ऑक्टोबर 2024

## अंतरंग




- लॉजिस्टिक धोरणामुळे ५ लाख रोजगार, ३०,५७३ कोटींचे उत्पन्न / प्रिया गंध्रे ---------- ०५
- लॉजिस्टिक हबच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल / प्रतिनिधी ---------- ०७
- १ लाख १७ हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता / प्रतिनिधी ---------- ०९
- उद्योगांना मिळणार बळकटी, गवसणार प्रगतीचे मार्ग / प्रतिनिधी ---------- ११
- सरकार घडविणार तीर्थक्षेत्राची यात्रा / डॉ. आरतीश्यामल जोशी ---------- १३
- राज्यात ५०,००० योजनादूत, ६ महिने करणार सरकारी योजनांचा प्रचार / प्रिया गंध्रे ---------- १५
- कोकणच्या दिघीत ३८ हजार कोटींची गुंतवणूक / प्रतिनिधी ---------- १८






- उद्योग, पर्यटनाला चालना देण्यासाठी विमानतळ महत्त्वाचे / प्रतिनिधी ---------- १९
- १ लाख ८८ हजार ७५० कोटी रुपयांची गुंतवणूक / प्रतिनिधी ---------- २०
- मातृशक्तीला आर्थिक सक्षमीकरणाचे बळ / प्रतिनिधी ---------- २१
- महाराष्ट्राच्या मद्यनिर्मितीची राजधानी / प्रतिनिधी ---------- २३
- ‘यूएलआय’ कर्ज प्रणाली : समृद्ध बळीराजाचा आधार / प्रसाद घारे ---------- २५
- यशस्वी उद्योजक होण्याची सप्तपदी / डॉ. सुधीर राशिंगकर ---------- २७
- स्पर्धात्मक युगात एक पाऊल पुढे / जीवन मुळे ---------- २९





- यशाचा गुरुमंत्र / प्रतिनिधी ---------- ३१
- धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे / संतोष बोर्डे ---------- ३३
- मुंबईत जर्मन भाषेचे मोफत प्रशिक्षण / प्रतिनिधी ---------- ३६
- उद्योजकतेच्या दीपस्तंभाची ३६ वर्षांची वाटचाल / संतोष बोर्डे ---------- ३७
- हार नहीं मानूंगा / सुधीर साबळे ---------- ४१
- मुसळीने दिला जगण्याचा आधार / डॉ. आरतीश्यामल जोशी ---------- ४३
- फळबाग लागवडीतून बळीराजा होणार लक्षाधीश / प्रतिनिधी ---------- ४५
- अन्नप्रक्रियेतील संधी / निलाक्षी पवार ---------- ४७
- सीताफळ प्रक्रिया उद्योगातून अर्थार्जन / प्रतिनिधी ---------- ४९
- ‘साक्री’ महानिर्मितीचे सोलर हब / प्रतिनिधी ---------- ५१
- निसर्गाचा ठेवा, उद्योजकांसाठी मेवा / डॉ. संतोष आगरकर ---------- ५२
- नमुना प्रकल्प अहवाल / संजय सिधये ---------- ५४
  मिलेट उत्पादने तयार करणे; सिल्क उत्पादने तयार करणे व गोल्ड ज्वेलरी वर्कशॉप




याशिवाय संपादकीय, शीर्षासन, प्रश्नपेटी इत्यादी...



**महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण-२०२४ ला मंत्रिमंडळाची मान्यता**

# लॉजिस्टिक धोरणामुळे ५ लाख रोजगार, ३०,५७३ कोटीचे उत्पन्न

**महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यासाठी तसेच आगामी १० वर्षात विकासाला अधिकाधिक चालना मिळून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने 'महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण-२०२४' ला नुकतीच मंजुरी दिली. लॉजिस्टिक धोरणात प्रकल्पांना देऊ केलेली विशेष प्रोत्साहने व सुविधांमुळे राज्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे ५ लाख रोजगारनिर्मिती होणार आहे. तर आगामी १० वर्षात सुमारे ३०,५७३ कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न मिळणार आहे. २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी लॉजिस्टिक धोरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचा विश्वास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला.** - प्रिया गंद्रे



मा.श्री. एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी ७ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत लॉजिस्टिक धोरणास मान्यता दिली. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारसीनुसार राज्याचे वर्ष २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था गाठण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ते गाठण्यासाठी नवीन लॉजिस्टिक धोरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. केंद्र शासनाच्या नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी २०२२ नुसार भारतातील लॉजिस्टिकवर होणारा खर्च १४ ते १५% आहे. लॉजिस्टिकच्या उच्च खर्चाचे प्रमुख कारण हे मालवाहतुकीसाठी रस्त्यावर प्रामुख्याने अवलंबत्व आहे. त्यामुळे हे धोरण तयार करताना पुढील १० वर्षात करावयाचा विकासाला समोर ठेऊन केले आहे. राज्याचे लॉजिस्टिक धोरण ठरविताना लॉजिस्टिक क्षेत्रातील विविध भागधारकांशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली. राज्य शासनाच्या विविध विभागांच्या अंतर्गत येणाऱ्या संस्था जसे की, MMB, JNPA, BPT, MSRDC, MMRDA, MADC, CIDCO झालेली चर्चा तसेच विविध विभागांचे अभिप्राय विचारात घेवून तसेच यापूर्वीचे लॉजिस्टिक पार्क धोरण २०१८ राबविताना विभागाला आलेल्या अनुभवाच्या आधारे लॉजिस्टिक धोरण २०२४ तयार करण्यात आले आहे. या धोरणाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

**लॉजिस्टिक धोरणाची वैशिष्ट्ये** : वर्ष २०२९ पर्यंत संपूर्ण राज्यात १०,००० एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा खालीलप्रमाणे विकसित करण्यात येणार आहे. त्या पुढीलप्रमाणे असतील-

**१) आंतरराष्ट्रीय मेगा लॉजिस्टिक हब** - पनवेल येथील प्रस्तावित नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संलग्न नवी मुंबई-पुणे क्षेत्रात २००० एकर जमिनीवर पसरलेल्या इंटरनॅशनल मेगा लॉजिस्टिक हबचा विकास करण्याचे नियोजित आहे. देशाच्या आर्थिक राजधानी मुंबईच्या नजिक नवी मुंबई क्षेत्र अल्प कालावधीत उत्पादन व सेवा उद्योगामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकासाचे प्रमुख केंद्र बनले आहे. सुनियोजितरित्या स्थापित नवी मुंबई येथे जेएनपीएच्या व्यापक आयात-निर्यात विषयक विविध स्तरावरील घटकांमुळे लॉजिस्टिक क्षेत्राचा महत्त्वाचा केंद्रबिंदू झाले आहे. नवी मुंबई ते पुणे हे क्षेत्र तळोजा, पाताळगंगा, रसायने, खोपोली, महाड, रोहा, चाकण, तळेगाव या औद्योगिक वसाहतीमुळे आंतराष्ट्रीय स्तरावरील व्यापार व उद्योगांचे प्रमुख केंद्र झाले आहे. सदर नॅशनल मेगा लॉजिस्टिक हब विकसित करण्यासाठी रु. १५०० कोटीची तरतूद करण्यात येईल.

**२) नॅशनल मेगा लॉजिस्टिक हब** - १५०० एकर जागेवर नागपूर-वर्धा नॅशनल मेगा लॉजिस्टिक हब उभारण्यात येणार असून हा हब हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाशी जोडला आहे. नागपूर जिल्ह्याचे देशातील वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक केंद्रीय स्थानामुळे लॉजिस्टिक हबच्या विकासासाठी अनुकूल आहे. जिल्ह्यात ४ राष्ट्रीय द्रुतगती मार्ग व एक समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर प्रगतीपथावर असून जिल्हा पूर्वीपासून मालवाहतूक करण्याचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखला गेला आहे. सदर नॅशनल मेगा लॉजिस्टिक हब विकसित करण्यासाठी रु. १५०० कोटीची तरतूद करण्यात येईल.

**३) राज्य लॉजिस्टिक हब** - छत्रपती संभाजीनगर-जालना, ठाणे-भिवंडी, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे-पुरंदर व पालघर-वाढवण हे ५ राज्य लॉजिस्टिक हब किमान प्रत्येकी ५०० एकर जागेवर लॉजिस्टिक सुविधा उपलब्ध करतील. सदर राज्य लॉजिस्टिक हब विकसित करण्यासाठी रु. २५०० कोटीची तरतूद करण्यात येईल.

**४) प्रादेशिक लॉजिस्टिक हब** - नांदेड-देगलूर, अमरावती-बडनेरा, कोल्हापूर-इचलकरंजी नाशिक-सिन्नर व धुळे-शिरपूर हे ५ प्रादेशिक लॉजिस्टिक हब किमान प्रत्येकी ३०० एकर जागेवर लॉजिस्टिक सुविधा उपलब्ध करतील. सदर प्रादेशिक लॉजिस्टिक हब विकसित करण्यासाठी रु. १५०० कोटीची तरतूद करण्यात येईल.

**५) जिल्हा लॉजिस्टिक नोड्स** - राज्यातील प्रत्येक जिल्ह्याची मूलभूत क्षमता, अंतर्भूत उद्योग व्यवसायाच्या संधी व पारंपरिक कौशल्याच्या आधारे



मा.श्री.देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

निर्माण झालेली आर्थिक विकासाची केंद्रे याच्या समन्वयातून व विश्लेषणातून २५ जिल्हा लॉजिस्टिक नोड्स प्रत्येक जिल्ह्यात किमान २ ते ३ ठिकाणी एकूण १०० एकर क्षेत्रावर जिल्हा भूक्षेत्र संलग्न असेल किंवा जिल्ह्याची दोन-तीन प्रमुख उद्योग व्यापार व व्यवसायची ठिकाणे हब आणि स्पोक मॉडेल अंतर्गत जोडले जातील. जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रातील १५ टक्के क्षेत्र खाजगी क्षेत्रातील लॉजिस्टिक नोड्स साठी राखीव ठेवण्यात येतील.

**लॉजिस्टिक पार्क विकासकासाठी प्रोत्साहने :**

**१) वित्तीय प्रोत्साहने-** या धोरणांतर्गत विहित केलेल्या झोन १ आणि झोन २ मधील वर्गवारीमध्ये स्थापित होणाऱ्या पात्र लॉजिस्टिक पार्क यांना भांडवली अनुदान खालीलप्रमाणे अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

**लघु लॉजिस्टिक पार्क :** किमान ५ एकर जागेवर स्थापित होणारे किमान रु. १० कोटी गुंतवणूक असलेल्या घटकांना २० टक्के भांडवली अनुदान अनुज्ञेय आहे.

**मोठा लॉजिस्टिक पार्क :** किमान ५० एकर जागेवर स्थापित आणि किमान रु. १०० कोटी गुंतवणूक असलेला घटकांना १५ टक्के भांडवली अनुदान अनुज्ञेय आहे.

**विशाल लॉजिस्टिक पार्क :** किमान १०० एकर जागेवर स्थापित होणारे किमान रु.२०० कोटी गुंतवणूक असलेल्या घटकांना १५ टक्के भांडवली अनुदान अनुज्ञेय आहे.

**अतिविशाल लॉजिस्टिक पार्क :** किमान २०० एकर जागेवर पसरलेले आणि किमान रु. ४०० कोटीची गुंतवणूक असलेल्या घटकांना १० टक्के भांडवली अनुदान अनुज्ञेय आहे. वरील लॉजिस्टिक पार्कना औद्योगिक दराने वीज, निर्णायक औद्योगिक पायाभूत सहाय्य व ग्रीन लॉजिस्टिक सहाय्य अनुज्ञेय करण्यात आले आहे.

**२) बिगर वित्तीय प्रोत्साहने-** झोन १, झोन २ व झोन ३ मधील स्थापित होणाऱ्या लघु, मोठे, विशाल, अतिविशाल व बहुमजली लॉजिस्टिक पार्क यांना लॉजिस्टिक घटकांना उद्योग व पायाभूत क्षेत्र दर्जा, ग्राउंड कव्हरेज मध्ये सवलत, झोन निर्बंधामध्ये शिथिलता, उंचीच्या निर्बंधामध्ये शिथिलता, ऑपरेशन्स २४ बाय ७, कौशल्य व उद्योजकता विकासासाठी सहाय्य तसेच एकल खिडकी प्रणाली, व्यवसाय सुलभता बिगर वित्तीय प्रोत्साहने अनुज्ञेय आहेत. बहुउद्देशीय लॉजिस्टिक पार्क- शहरी/निमशहरी भागात किमान २०,००० चौ.फूट बांधीव क्षेत्र असलेल्या क्षेत्रास 'बहुमजली लॉजिस्टिक पार्क' असे संबोधले जाईल व किमान गुंतवणूक रु. ५ कोटी इतकी राहील. ठाणे, मुंबई व पुणे या महानगरांमध्ये खुल्या जागेची उपलब्धतेमध्ये अडचणी असल्याने, जागेचा जास्तीत वापर होण्यासाठी बहुउद्देशीय लॉजिस्टिक पार्क प्रस्तावित करण्यात आले आहे.

**३) स्वतंत्र लॉजिस्टिक घटकांसाठी प्रोत्साहने-** एमएसएमई प्रवर्गातील कोअर लॉजिस्टिक प्रक्रिया/सुविधामध्ये गुंतलेल्या एकल/स्वतंत्र घटकांकरिता राज्याचे वित्तीय /बिगर वित्तीय सहाय्य खालीलप्रमाणे आहे :

वित्तीय प्रोत्साहने- प्रत्येक जिल्ह्यातील ६ (प्रथम १०० घटकांना) लॉजिस्टिक पार्कच्या आतील तसेच प्रत्येक जिल्ह्यातील ६ (प्रथम १०० घटकांना) लॉजिस्टिक पार्कच्या बाहेरील एमएसएमई - स्टोरेज आणि कार्गो हाताळणी घटकांना व्याज अनुदानासह मुद्रांक शुल्क सवलत, औद्योगिक दराने वीज, तंत्रज्ञान सुधारणा सहाय्य व व्यवसाय सुलभता अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

बिगर वित्तीय प्रोत्साहने- एमएसएमई प्रवर्गातील कोअर लॉजिस्टिक प्रक्रिया/सुविधामध्ये गुंतलेल्या एकल/स्वतंत्र घटकांकरिता उद्योग व पायाभूत क्षेत्र दर्जा, ग्राउंड कव्हरेज मध्ये सवलत, झोन निर्बंधामध्ये शिथिलता, उंचीच्या निर्बंधामध्ये शिथिलता, ऑपरेशन्स २४ बाय ७, कौशल्य व उद्योजकता विकासासाठी सहाय्य तसेच एकल खिडकी प्रणाली, व्यवसाय सुलभता बिगर वित्तीय प्रोत्साहने अनुज्ञेय आहेत.

**४) लॉजिस्टिक उपक्रमासाठी व्यवसाय सुलभता-** लॉजिस्टिक क्षेत्रातील एमएसएमईना (जमिन किमत वगळून रु.५० कोटी गुंतवणूक मर्यादा असणारे घटक) कोणत्याही प्रकारच्या पूर्वपरवानगी पासून सूट अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच राज्यातील सदर एकल सुविधेद्वारे उद्योजकांना आपले उद्योग व्यवसाय जलदगतीने स्थापित होण्यासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणीवर मात करण्यासाठी राज्य शासन मैत्री कक्षाद्वारे आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

**पुढील १० वर्षातील विकासाचे उद्दिष्ट - उद्योगमंत्री उदय सामंत**

महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण २०२४ अंतर्गत प्रकल्पांना देऊ केलेली विशेष प्रोत्साहने व सुविधांमुळे राज्यात अंदाजे ५ लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे, तर पुढील १० वर्षात यातून सुमारे रु. ३०,५७३ कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न अपेक्षित असल्याचा विश्वास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला. लॉजिस्टिक धोरणावर प्रतिक्रिया देतांना ते बोलत होते. उदय सामंत म्हणाले, लॉजिस्टिक धोरणात राज्याच्या प्रत्येक क्षेत्राची क्षमता आणि पुढील १० वर्षातील अपेक्षित आर्थिक विकास विचारात घेण्यात आला आहे. लॉजिस्टिक यंत्रणेचा पद्धतशीर आणि नियोजित विकास करण्यासाठी संपूर्ण राज्यात जिल्हा, प्रादेशिक, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लॉजिस्टिक नोड्सचा अंतर्भाव करून लॉजिस्टिक मास्टरप्लॅन तयार करण्यात आला आहे. त्यामुळे सध्याच्या १४-१५% च्या तुलनेत लॉजिस्टिकचा खर्च किमान ४-५% ने कमी होणार आहे. लॉजिस्टिक्स मास्टरप्लॅन, कार्यक्षम मल्टीमॉडल लॉजिस्टिक्सच्या तरतुदीद्वारे लॉजिस्टिकसाठी लागणारा वेळ कमी होईल. लॉजिस्टिक्स क्षेत्रांतर्गत विविध कार्य टप्प्यातील उपक्रमांमध्ये हरित उपक्रमांद्वारे कार्बन उत्सर्जन कमी होईल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे आधुनिक तंत्रज्ञान संबंधातील बाबी जसे की, ब्लॉक चेन, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटलिजन्ट लॉजिस्टिक मॅनेजमेंट सिस्टमचा वापर, ग्रीन लॉजिस्टिक पार्कचा प्रसार, शाश्वत डिझाईन,मोडल शिफ्ट या बाबी स्मार्ट लॉजिस्टिकमध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. देशांतर्गत व परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे तसेच स्थानिक लॉजिस्टिक उद्योगांच्या स्पर्धात्मतेमध्ये वाढ करून महाराष्ट्रला जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक हब आणि आघाडीचे केंद्र म्हणून स्थापित करण्यात येईल. वर्ष २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी लॉजिस्टिक धोरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला.

*(या लेखाच्या लेखिका मुक्त पत्रकार असून विविध विषयांवर लिखाण करतात त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९१६८०६७००६ हा आहे.)*

महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण-२०२४ बदलणार राज्याचे चित्र

# लॉजिस्टिक हबच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल



**सध्या देशातील लॉजिस्टिक क्षेत्राचा भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये १४ टक्के वाटा आहे. लॉजिस्टिक क्षेत्र २.२ कोटी लोकांना रोजगार पुरवते. देशामध्ये वार्षिक ४.६ अब्ज टन उत्पादनाची वाहतूक व हाताळणी याकरिता रु. ९.५ लाख कोटी इतका खर्च येतो. महाराष्ट्राचा यामध्ये मोठा वाटा असून, राज्यात १७,७५७ किमी लांबीचे राष्ट्रीय महामार्ग व २८,४६१ किमी लांबीच्या राज्य महामार्गासह राज्यामध्ये पायाभूत सुविधांचे विस्तीर्ण जाळे आहे. तसेच राज्यामध्ये ११,६३१ किमीचे रेल्वेचे जाळे असून त्याअंतर्गत ५४८ रेल्वे गुड्स शेड्सचा समावेश आहे. महाराष्ट्र हे देशाच्या एकूण मूल्यवर्धित दरामध्ये १५.१ टक्के योगदान देऊन राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळख असणारे महाराष्ट्र आता जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक हब म्हणूनही नवीन ओळख निर्माण करत आहे.**

**- प्रतिनिधी**



मा.श्री.अजित पवार
उपमुख्यमंत्री


भारतातील आघाडीचे राज्य म्हणून महाराष्ट्राचा नावलौकिक आहे. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये (जीडीपी) राज्याचे योगदान सुमारे १४ टक्के असून देशाच्या आर्थिक वाढीमध्ये महाराष्ट्र राज्य हे निर्णायक भूमिका बजावत आहे. महाराष्ट्राने सन २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर जीडीपी गाठण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, देशाच्या ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या निर्धारित लक्ष्यात महाराष्ट्र २० टक्के योगदान देणार आहे. महाराष्ट्र राज्य हे उच्च सकल राज्य देशांतर्गत उत्पादनासह भारतातील सर्वात औद्योगिक राज्य म्हणून अग्रेसर आहे. महाराष्ट्र हे देशाच्या एकूण मूल्यवर्धित दरामध्ये १५.१ टक्के योगदान देऊन राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

### देशातील २९ टक्के एफडीआय महाराष्ट्रात

महाराष्ट्र हे भारतातील दुसरे सर्वात मोठे निर्यातदार राज्य आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये यूएसडी २३ अब्ज इतक्या निर्यातीसह देशाच्या एकूण निर्यातीमध्ये राज्याचा १७ टक्के वाटा आहे. महाराष्ट्रातून यूएसए, यूएई, हाँगकाँग, बेल्जियम, यूके, चीन, सिंगापूर इत्यादी देशांमध्ये प्रामुख्याने निर्यात केली जाते. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये राज्याने थेट परकीय गुंतवणुकीमध्ये (एफडीआय) आपले सर्वोच्च स्थान कायम ठेवले आहे. एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीदरम्यान महाराष्ट्रात एकूण रु. १,१८,४२२/- कोटी इतके एफडीआय प्राप्त झाले. हे देशातील एकूण परकीय गुंतवणूकीच्या २९ टक्के इतके आहे. सन २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था साध्य करण्याच्या उद्दिष्टाच्या पूरक कार्यवाही अंतर्गत राज्य नवीन उद्योग, औद्योगिक उद्याने आणि समर्पित कॉरिडॉरच्या स्थापनेला सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे.

### लॉजिस्टिक क्षेत्रात महाराष्ट्राची आघाडी

सध्या भारतातील लॉजिस्टिक क्षेत्राचा भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये १४ टक्के वाटा आहे. लॉजिस्टिक क्षेत्र २.२ कोटी लोकांना रोजगार पुरवते. देशामध्ये वार्षिक ४.६ अब्ज टन उत्पादनाची वाहतूक व हाताळणी याकरिता रु. ९.५ लाख कोटी इतका खर्च येतो. महाराष्ट्राचा यामध्ये मोठा वाटा असून, राज्यात १७,७५७ किमी लांबीचे राष्ट्रीय महामार्ग व २८,४६१ किमी लांबीच्या राज्य महामार्गासह राज्यामध्ये पायाभूत सुविधांचे विस्तीर्ण जाळे आहे. तसेच



मा.श्री. उदय सामंत
उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

राज्यामध्ये ११,६३१ किमीचे रेल्वेचे जाळे असून त्याअंतर्गत ५४८ रेल्वे गुड्स शेड्सचा समावेश आहे. सागरी आणि हवाई जोडणी अंतर्गत राज्यामध्ये दोन मोठी व ४८ लहान बंदरे, ५३ आंतरदेशीय कन्टेनर डेपो आणि कन्टेनर फ्रेट स्टेशन, ८ खासगी माल वाहतूक टर्मीनल आणि ११ एअर कार्गो टर्मीनल्स या सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. राज्यामध्ये २.२३ एमएमटीपीए इतकी गोदाम क्षमता, १.०३ एमटीपीए इतकी शीतगृह सुविधा आणि १३२० दशलक्ष टनची शिंपीग पोर्टची क्षमता आहे. कौशल्य विकासाकरिता राज्यामध्ये ११६ पेक्षा अधिक लॉजिस्टिक प्रशिक्षण केंद्रे आहेत.

### तंत्रज्ञानाने लॉजिस्टिकवरील खर्चात कपात

देशातील लॉजिस्टिकवर होणारा खर्च कमी करण्याकरिता प्रभावी धोरणात्मक हस्तक्षेप महत्त्वाचे असून बहुविध वाहतूक व्यवस्था, उत्कृष्ट दर्जाचे रस्ते आणि बंदर पायाभूत सुविधा, वितरण, वाहतूक आणि साठवण यांच्याशी संबंधित कामांमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वापर या बाबी लॉजिस्टिक खर्च कमी करण्यास सहाय्यभूत ठरणार आहे. देशभरात लॉजिस्टिक परिसंस्था सुधारण्यासाठी विविध उपक्रम घेतले जात असून, त्यात केंद्र शासनाच्या पीएम गती शक्ती २०२१ व नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी-२०२२ इत्यादी उपक्रमांचा समावेश आहे.

### लॉजिस्टिक धोरणाची महत्त्वाची भूमिका

राज्यामध्ये कार्यक्षम एकात्मिक लॉजिस्टिक पायाभूत सुविधेच्या निर्मितीद्वारे स्थानिक लॉजिस्टिक उद्योगांच्या स्पर्धात्मकतेमध्ये वाढ करून तसेच लॉजिस्टिकचा वेळ आणि खर्च कमी करण्यावर भर देऊन, महाराष्ट्राला जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक हब आणि आघाडीचे केंद्र म्हणून स्थापित करण्याचा या शासनाचा मानस आहे. सन २०२८ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर एवढी साध्य करण्याकरिता उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. अर्थव्यवस्थेचे हे उद्दिष्ट साध्य करण्यात लॉजिस्टिक धोरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. पुढील १० वर्षातील विकासाला समोर ठेवून राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४ तयार करण्यात आले आहे. राज्यामध्ये लॉजिस्टिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांची निर्मीती व बळकटीकरण करणे, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान व शाश्वत उपक्रमाचा प्रसार करणे, लॉजिस्टिक पार्क विकासकांसाठी प्रोत्साहन, लॉजिस्टिक क्षेत्रातील एकल घटकांना प्रोत्साहन, लॉजिस्टिक सुविधांकरिता संस्थात्मक उभारणी करणे, कौशल्य विकास आणि क्षमता निर्माण करणे, लॉजिस्टिक क्षेत्राच्या उपक्रमांसाठी व्यवसाय सुलभता (इज ऑफ डुईंग बिझिनेस) तसेच लॉजिस्टिक क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या घटकांसाठी राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या इतर धोरणांचे अभिसरण करणे, या बाबींवर विशेष भर देण्यासाठी राज्याचे लॉजिस्टिक धोरण -२०२४ तयार करण्यात आले आहे.



*उद्योजक मासिकाच्या माहे सप्टेंबर २०२४ विशेष अंकाचे प्रकाशन श्री.बी.टी.यशवंते, उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून श्री.संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक तथा उद्योजक मासिक विभाग प्रमुख दिसत आहेत.*

### लॉजिस्टिक धोरणातील तरतुदी

'महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण-२०२४' अंतर्गत राज्यात १० हजार एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी २५ जिल्हा लॉजिस्टिक नोड्स (प्रत्येकी १०० एकर), ५ प्रादेशिक लॉजिस्टिक हब (प्रत्येकी ३०० एकर), ५ राज्य लॉजिस्टिक हब (प्रत्येकी ५०० एकर), १ नॅशनल लॉजिस्टिक मेगा हब (१५०० एकर) व १ आंतरराष्ट्रीय लॉजिस्टिक मेगा हब (२००० एकर) विकसित करण्यात येईल. लॉजिस्टिक नोड्स तसेच लॉजिस्टिक हबच्या पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्याकरिता (कार्यक्रम खर्च) रु. ७ हजार कोटी तसेच लघु, मोठे, विशाल, अतिविशाल, एकात्मिक ट्रक टर्मिनल्सकरिता (अनिवार्य खर्च) भांडवली अनुदानासाठी रु. ६३५ कोटी तसेच एकल घटकांना व्याज दर अनुदान व तंत्रज्ञान सहाय्यसाठी द्यावयाच्या प्रोत्साहनांकरिता (अनिवार्य खर्च) रु. ६७५ कोटी, धोरणाच्या अंमलबजावणीसाठी धोरण कालावधीत एकूण रु. ८३१० कोटी एवढी तरतूद उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या धोरणाअंतर्गत येणाऱ्या बहुमजली, लघु, मोठे, विशाल, अतिविशाल लॉजिस्टिक पार्क यासह एकल/स्वतंत्र घटकांना धोरणात नमूद केलेल्या बिगर वित्तिय प्रोत्साहन देय करण्याकरिता मान्यता सुद्धा देण्यात येईल. व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीने लॉजिस्टिक क्षेत्रातील एमएसएमईंना जमिनीची किंमत वगळून रु.५० कोटी मर्यादेपर्यंत स्थिर भांडवली गुंतवणूक मर्यादा असणाऱ्या घटकांना कोणत्याही प्रकारच्या पूर्व परवानगीपासून सूट देण्यास मान्यता प्रदान करण्यात येईल. सन २०२४-२५ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षात आवश्यक भूसंपादन / पायाभूत सुविधांसाठीचा खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येईल. उर्वरीत धोरण कालावधीसाठी आवश्यक वित्तीय तरतूद राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

■ ■



**सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत गुंतवणूक**

# १ लाख १७ हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

**महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पुणे, पनवेल येथे १ लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित ४ विशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाची मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. या प्रकल्पांमुळे सुमारे २९ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. - प्रतिनिधी**



मा. डॉ. हर्षदीप कांबळे
प्रधान सचिव, उद्योग

उद्योग विभागाच्या बैठकीत मान्यता दिलेल्या प्रकल्पांमुळे राज्यात सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रिक वाहन निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमुद केले. यामुळे महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, यापूर्वी जुलै महिन्यात झालेल्या उपसमितीच्या बैठकीत ८० हजार कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे गेल्या दोन महिन्यात झालेल्या बैठकांमध्ये एकूण दोन लाख कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे, ज्यामुळे ३५ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे

मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. उद्योगमंत्री उदय सामंत दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदी उपस्थित होते.

या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होण्यास मदत होणार आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल. स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांची रोजगारक्षमता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील कौशल्य वाढण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

टॉवर सेमीकंडक्टर कंपनी व अदानी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंडक्टर निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प पनवेल जिल्हा रायगड येथे करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात ५८ हजार ७६३ कोटी तर दुसऱ्या टप्प्यात रुपये २५ हजार १८४ कोटी अशी एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पामुळे १५ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे.

दरम्यान, ३० जुलै २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स यांच्या सेमीकंडक्टर निर्मितीच्या अतिविशाल प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प सेमीकंडक्टर निर्मितीचा राज्यातील पहिला प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये लवकरच ओसॅट, चिप्स निर्मिती सुरू होणार आहे. आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स व टॉवर सेमीकंडक्टर कंपनी यांच्या प्रकल्पांमुळे प्रगत सेमीकंडक्टरची निर्मिती होणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात महाराष्ट्र भारताच्या अग्रस्थानी राहणार आहे. देशातील वाढती मागणी पूर्ण करणे व सेमीकंडक्टरची इकोसिस्टीम स्थापित करण्यास देखील चालना मिळणार आहे.

स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया कंपनीचा प्रकल्प पुणे येथे एकात्मिक पद्धतीने स्थापना करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण १२ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे एक हजार रोजगारनिर्मिती होणार असून प्रकल्पातून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर




आधारित इलेक्ट्रिक व्हेइकलची निर्मिती केली जाणार आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटर कंपनीचा प्रकल्प राज्याचे इलेक्ट्रिक वाहन प्रोत्साहन धोरणांतर्गत इलेक्ट्रिक वाहन निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण २१ हजार २७३ कोटी एवढी गुंतवणूक होणार असून, त्या माध्यमातून १२ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. यामुळे महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पामुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होईल. मराठवाड्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना त्याचा फायदा होणार आहे. इलेक्ट्रिक वाहनाच्या वापरामुळे हरितगृह वायू उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी होऊन हवेची गुणवत्ता आणि हवामान बदल कमी होण्यास हातभार मिळणार आहे.

यापूर्वी जेएसडब्ल्यू ग्रीन मोबिलिटी यांचा छत्रपती संभाजीनगर येथे इलेक्ट्रिक वाहन निर्मितीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटर यांचा इलेक्ट्रिक वाहन निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणारा छत्रपती संभाजीनगर येथील दुसरा अतिविशाल प्रकल्प असून या क्षेत्राचा सर्वंकष विकास होण्यास चालना मिळणार आहे.



मा.श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह,
विकास आयुक्त (उद्योग)

रेमंड लक्झरी कॉटन्स यांचा वस्त्रोद्योग धोरणांतर्गत स्पिनिंग, यार्न डाइंग, वीव्हिंग ज्यूट, वीव्हिंग कॉटन, ज्यूट, मेस्टा, कॉटन या उत्पादनांच्या निर्मितीचा विशाल प्रकल्प अतिरिक्त औद्योगिक विकास महामंडळ नांदगाव पेठ, जि. अमरावती येथे होणार आहे. या प्रकल्पात १८८ कोटी एवढी गुंतवणूक आणि ५५० रोजगारनिर्मिती होणार आहे.

ग्रामीण सक्षमीकरणाद्वारे राज्यातील एक हजार गावांना स्वयंपूर्ण करणाऱ्या 'स्वदेश ड्रीम व्हिलेज' या उपक्रमाच्या विस्तारासाठी महाराष्ट्र शासन आणि स्वदेस फाऊंडेशन यांच्या दरम्यान सहकार्य करार करण्यात आल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. या करारावर महाराष्ट्र शासनाच्यावतीने राज्याच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक तसेच स्वदेश फाऊंडेशनच्या संस्थापक संचालक झरीन स्क्रूवाला यांनी स्वाक्षरी केल्या. या उपक्रमाच्या विस्तारानुसार स्वदेश फाऊंडेशन पुढील पाच वर्षांत राज्यातील एक हजार गावांना स्वयंपूर्ण करून त्यांचा कायापालट करणार आहे. यापूर्वीच फाऊंडेशनने रायगड जिल्ह्यामधील सात तालुक्यांत आणि नाशिक जिल्ह्यामधील चार तालुक्यांत ग्रामीण सक्षमीकरणाचे काम सुरू केले आहे. यात आरोग्य, शिक्षण, स्वच्छ पाणी, स्वच्छता सुविधा यांसह आर्थिक विकास साधण्यावरही भर देण्यात येणार आहे. सामुदायिक सहभागावर आधारित विकास अशी संकल्पना यात अभिप्रेत आहे. ■ ■




*विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नाशिक व छत्रपती संभाजीनगर विभागाचे ५ दिवसीय प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम एमसीईडी छत्रपती संभाजीनगर येथील परिसरात नुकताच संपन्न झाला. यावेळी उद्योजक मासिकाच्या सप्टेंबर २०२४ अंकाचे विमोचन मा. श्री. दिलिप स्वामी, भा.प्र.से. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून श्री. देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर, श्री.संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक तथा उद्योजक मासिक विभाग प्रमुख, श्री. आनंद माने, लेखाधिकारी, एमसीईडी, श्रीमती मनिषा पांडे, मालमत्ता विभाग प्रमुख, श्रीमती भारती सोसे, कनिष्ठ प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर दिसत आहेत.*



राष्ट्रीय उद्योजकता व लघुउद्योग विकास संस्था, नियोक्ता महासंघ व भारतीय उद्योग संघासोबत करार

# उद्योगांना मिळणार बळकटी, गवसणार प्रगतीचे मार्ग

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रामध्ये नवीन रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या क्षमता वाढीसाठी २ महत्त्वाकांक्षी सामंजस्य करार केले. राष्ट्रीय उद्योजकता आणि लघुउद्योग विकास संस्थेसह नियोक्ता महासंघ व भारतीय उद्योग संघासोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांमुळे उद्योगांच्या वाढीस वेग येणार आहे, तर जागतिक बँक व सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार यांचा सहयोग असलेल्या रॅम्प कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी तब्बल १३ औद्योगिक संघटनांसोबतही करार करण्यात आले.**

**- प्रतिनिधी**



**मा.श्री.राजेंद्र निंबाळकर**, भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र निंबाळकर आणि भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय अंतर्गत असलेली राष्ट्रीय उद्योजकता आणि लघुउद्योग विकास संस्थेच्या (NIESBUD) संचालक डॉ. पूनम सिन्हा यांनी एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. मंगळवार १३ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या या सामंजस्य करारामुळे पुढील वर्षात महाराष्ट्रातील १०,००० महिलांनी चालविलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांसाठी एक दिवसीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

जागतिक बँक व सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार यांचा सहयोग असलेल्या रॅम्प कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाला स्टेट नोडल संस्था म्हणून नियुक्त केले आहे. योजनेची गती महामंडळाने नीसबड व सीआयआय यांच्या नवीन भागीदारी व सहकार्यातून कायम ठेवली आहे. हे सामंजस्य करार जयंत चौधरी, राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार), कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय व अतुलकुमार तिवारी, सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कराराचा मुख्य उद्देश महिलांच्या नेतृत्वाखाली सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना व्यवसाय नियोजन, वित्तीय व्यवस्थापन, विपणन, तंत्रज्ञानाचा वापर, व्यवसायातील शाश्वतता इ. क्षेत्रात प्रशिक्षण देणे हा आहे.

**ईएफआय, सीआयआयसोबत करार** : योग्य कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची उपलब्धतता ही सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना भेडसावणारी मोठी समस्या आहे. या समस्येवर मात करण्यासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने २२ ऑगस्ट २०२४ रोजी नियोक्ता महासंघ (ईएफआय) आणि भारतीय उद्योग संघ (सीआयआय) यांच्यासोबत सामंजस्य करार केला. या कराराद्वारे पुढील वर्षभरात महाराष्ट्रातील १०,००० नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी अल्प कालावधीचे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांना नियुक्ती-प्रशिक्षण-उपयोजन या मॉडेल अंतर्गत सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रात रोजगार दिला जाईल. भारतीय उद्योग संघाच्या कौशल्य विकास उपक्रमाने विविध उपक्रमांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मागणीवर आधारित अभ्यासक्रम तयार करण्याची प्रथा सुरू केली आहे आणि या अभ्यासक्रमाअंतर्गत प्रशिक्षित उमेदवारांची निवड नोकरीसाठी केली जाईल. अशा प्रशिक्षणार्थींची निवड रोजगार विनिमय केंद्र, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था इ. माध्यमातून करण्यात येणार आहे. ही योजना राज्यात राबविण्यासाठी नियोक्ता महासंघ, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळासोबत भागीदार असणार आहे. या सामंजस्य करारावर नियोक्ता महासंघाच्या वतीने त्यांचे महासंचालक सौगत रॉय चौधरी आणि भारतीय उद्योग संघाच्या कौशल्य विकास प्रमुख जया अवस्थी यांनी स्वाक्षरी केली.

**उद्योगांसाठी शाश्वत धोरण राबविणार** : महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र निंबाळकर म्हणाले, महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ४६ लाखाहून अधिक उदयम नोंदणीकृत सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत आहेत. त्यामुळे रॅम्प कार्यक्रमांतर्गत १ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना फायदा देण्याचे उद्दिष्ट हे हिमनगाचे एक टोक आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या समस्यांचे रॅम्प कार्यक्रमाच्या कालावधीनंतरसुद्धा निराकरण करण्यासाठी शाश्वत धोरण

महामंडळामार्फत तयार करण्यात येईल. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महामंडळामार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सहकार्याने फ्लॅटेड फॅक्टरी गाळे विकसित करून हे गाळे सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना ५० टक्के अनुदानावर भाड्याने देण्यात येणार आहेत. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना परवडणाऱ्या जागा उपलब्ध होण्यास महामंडळाच्या उपक्रमामुळे फायदा होईल. रॅम्प योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या क्षमतावृद्धी उपक्रमाद्वारे राज्यातील अनेक सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना त्यांच्या विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

**एमएसएमईच्या विकासासाठी सहकार्य** : सीआयएचे महासंचालक श्री. चौधरी म्हणाले, भारतीय उद्योग संघ हा राष्ट्रीय पातळीवर सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांसाठी कार्य करीत आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची क्षमता वाढविणे आणि त्यांच्या उत्पादक क्षमतेचा विकास करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या सामंजस्य कराराद्वारे त्यांनी महामंडळासोबत हाती घेतलेला प्रकल्प हा त्यांच्या मिशनचा एक भाग आहे. या सामंजस्य कराराद्वारे महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ आणि भारतीय उद्योग संघ एकत्रितपणे सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रात मोठे योगदान देऊ शकतात.

**क्षमतावृद्धी, कौशल्य विकासाचे उपक्रम** : महाराष्ट्र राज्याने रॅम्प योजनेअंतर्गत धोरणात्मक गुंतवणूक आराखडा सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय,भारत सरकार यांना सादर केला होता. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार यांनी राज्यास सर्वात जास्त रु.१८९.५० कोटी एवढा निधी महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर केला आहे. या निधीमधून राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उपक्रमांसाठी क्षमतावृद्धी, कौशल्य विकास, वित्तीय सुलभता, बाजारपेठ सुलभता, (राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी) इ. उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राज्यामध्ये रॅम्प कार्यक्रम राबविण्यासाठी महामंडळाने मे. केपीएमजी या संस्थेची राज्य कार्यक्रम अंमलबजावणी युनिट म्हणून नियुक्ती केली आहे. रॅम्प कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी खालील संस्थांसोबत सामंजस्य करार केले आहेत :

(१) मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज ॲण्ड ॲग्रीकल्चर, पुणे - क्षमतावृद्धी. (२) दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिज,पुणे - एससी/एसटी उद्योग घटकांची क्षमतावृद्धी. (३) इंडिया एसएमई फोरम, मुंबई - क्षमतावृद्धी. (४) सह्याद्री रुरल डेव्हलपमेंट फाऊंडेशन, नाशिक - क्षमतावृद्धी.

(५) रबर केमिकल ॲण्ड पेट्रोकेमिकल्स स्किल डेव्हलपमेंट काऊंसिल, दिल्ली - कौशल्यवृद्धी. (६) जेम्स ॲण्ड ज्वेलरी स्किल कौंसिल ऑफ इंडिया, मुंबई -कौशल्यवृद्धी. (७) महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी,मुंबई - बौद्धिक संपदा अधिकार. (८) युथ बिल्ड फाऊंडेशन, पुणे - कौशल्यवृद्धी. (९) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजीनगर - क्षमता व कौशल्यवृद्धी. (१०) आयडीबीआय बॅंक - पतसुलभता

(११) एमएसटीसी लिमिटेड - ई कॉमर्सद्वारे पुरवठा साखळी. (१२) इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन ऑफ इलेक्ट्रिकल मेझरिंग इन्स्ट्रुमेंट- क्षमतावृद्धी. (१३) असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री ऑफ इंडिया-महिला उद्योजकांची क्षमतावृद्धी

**प्रादेशिक संतुलनाकडे लक्ष** : महामंडळाच्या सहव्यवस्थापकीय संचालक फरोग मुकादम म्हणाले, महामंडळामार्फत करण्यात आलेल्या सामंजस्य करारामध्ये प्रादेशिक आणि क्षेत्रीय संतुलन सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने सामंजस्य करार तयार केला आहे. महामंडळाने या कार्यक्रमामध्ये महिला, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उद्योग घटकांचा समावेश होण्यासाठी त्यांच्यासाठी समर्पित उपक्रमांची रुपरेषा तयार केली आहे. महामंडळामार्फत विविध संस्था, कंपन्या व उद्योग समूह सोबत संपर्क साधून यांच्या सहकार्याने त्यांना पुरवठा समावेश राष्ट्रीय व जागतिक पुरवठा चेन सोबत जोडण्यात येणार आहे.




*महिला व बालकल्याण विकास आयुक्त डॉ.श्री. प्रशांत नारनवरे, भा.प्र.से. यांची भेट घेऊन उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रस्तावाबाबत चर्चा करून डॉ. नारनवरे यांना सप्टेंबर २०२४ चा उद्योजक मासिकाचा अंक भेट देत असताना श्री. विवेक तोंडरे, समन्वय विभाग प्रमुख व श्री. सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, MCED, छ. संभाजीनगर. या वेळी महिला व बालकल्याण विकास आयुक्त कार्यालयाच्या सौ. वर्षा पवार, उपायुक्त (प्रशासन) या उपस्थित होत्या.*



## ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना

# सरकार घडविणार तीर्थक्षेत्राची यात्रा

**भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. महाराष्ट्रासह देशभरात प्रसिद्ध तीर्थक्षेत्रे आहेत. या तीर्थक्षेत्रांना आयुष्यात एकदा तरी भेट देता यावी, असे सर्वांचे स्वप्न असते; परंतु आर्थिक परिस्थिती, कुणी सोबत नसल्याने किंवा पुरेशा माहितीच्या अभावाने अनेकांना इच्छा असतानाही तेथे जाता येत नाही. अशा ज्येष्ठ नागरिकांना आता काळजीचे कारण नाही. त्यांना तीर्थाटन करण्यासाठी राज्य शासनाने सर्व धर्मियांमधील ६० वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरू केली आहे. या अंतर्गत देशातील ७३ तर राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याचा खर्च राज्य शासन करणार आहे. - डॉ. आरतीश्यामल जोशी**



मा.श्री. एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

हिंदू धर्मात चारधाम यात्रा, माता वैष्णोदेवी यात्रा, अमरनाथ यात्रा तसेच इतर धर्मीयांची मोठी तीर्थक्षेत्रे आहेत. या तिर्थक्षेत्रांच्या यात्रा करण्याचे सर्वसामान्यांचे स्वप्न साकारण्यासाठी आता शासनानेच पुढाकार घेतला आहे. ६० वर्षांवरील नागरीकांना तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात आली असून त्यास जोरदार प्रतिसाद मिळतोय. नेमकी काय आहे ही योजना, यासाठी कोण आहेत पात्र, अर्ज कसा व कोठे करायचा याबाबत सविस्तर माहिती देणारा लेख.

**योजना सुरू करण्यामागचा मानस** : राज्यातील सर्व धर्मातील सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे वा कोणी सोबत नसल्याने आणि पुरेशी माहिती नसल्यामुळे तीर्थयात्रा करण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. ही बाब विचारात घेऊन ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थ स्थळांना जाण्याची इच्छा पूर्ण व्हावी. यासाठी त्यांना राज्यातील आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत दर्शनाची संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरू करण्यात आली आहे.

**योजनेत कोणत्या स्थळांचा समावेश** : या योजनेमध्ये भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. यात मुंबईतील सिद्धीविनायक, चैत्यभूमी, माउंट मेरी चर्च आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणांचाही समावेश आहे. तीर्थक्षेत्रांमध्ये वैष्णोदेवी मंदिर, अमरनाथ गुहा, अमृतसरमधील सुवर्ण मंदिर, अयोध्येतील श्रीराम मंदिर, वेरावळमधील सोमनाथ मंदिर आणि ओडिशातील जगन्नाथ पुरी या प्रमुख धार्मिक स्थळांचा समावेश होतो. याशिवाय तामिळनाडू, केरळ, मध्यप्रदेश, राजस्थान, बिहार, उत्तरप्रदेश, गुजरात, झारखंड, आंध्रप्रदेश, आसाम, ओरीसा, झारखंड, उत्तराखंड, दिल्ली, पंजाब, जम्मू आणि काश्मिर आणि कर्नाटक या धार्मिक स्थळांचा समावेश आहे. त्याचबरोबर मुंबईतील १५ धार्मिक स्थळंही या यादीत आहेत. या योजनेंतर्गत निर्धारित तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा केवळ एक वेळच लाभ घेता येईल.

**३० हजार रुपयांची मर्यादा** : योजनेसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे अर्ज दाखल करायचे आहेत. योजनेअंतर्गत लाभार्थी व्यक्तीला प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रति व्यक्ती ३० हजार रुपये इतकी असेल. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवासाची सोय इत्यादी सर्व बाबींचा समावेश असेल.

**योजनेसाठी आवश्यक पात्रता** : लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक, वय वर्ष ६० आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक, लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम २.५ लाखांपेक्षा कमी

**योजनेसाठी अपात्र कोण ठरणार?**

-कुटुंबातील सदस्य आयकरदाता नसावा. कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/ भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत, असे सदस्य या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.

-अडीच लाखांपर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी मात्र या योजनेसाठी पात्र ठरतील.

-कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार नसावेत.

-कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य नसावेत.

-चारचाकी वाहनं (ट्रॅक्टर वगळून) त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत नसावे.

-प्रवासासाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे आणि कोणत्याही संसर्गजन्य रोगानं ग्रस्त नसावे, जसे की टीबी, हृदयाशी संबंधित श्वसन रोग, कोरोना, थ्रोम्बोसिस, मानसिक आजार, संसर्गजन्य कुष्ठरोग इत्यादी. अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे)

-जे अर्जदार मागील वर्षांमध्ये लॉटरीत निवडले गेले; परंतु प्रवासासाठी आमंत्रित करूनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही.

**अर्ज कसा करावा** : योजनेसाठी पात्र ज्येष्ठ नागरीकास अर्ज पोर्टल, मोबाईल ॲपद्वारे, सेतू सुविधा केंद्राद्वारे ऑनलाइन भरले जाऊ शकतात. ज्यांना ऑनलाइन अर्ज सादर करता येत नसेल, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा सेतू केंद्रात उपलब्ध असेल. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन येथेही अर्ज करता येईल. अर्जदाराने स्वतः उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असेल जेणेकरून त्यांचा थेट फोटो काढता येईल आणि केवायसी करता येईल.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** : अर्जासोबत लाभार्थ्यांचे आधार कार्ड, रेशनकार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्यांचे १५ वर्षांपूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैको कोणतेही ओळखपत्र, प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल), सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत असणे अनिवार्य) किंवा पिवळे, केशरी रेशनकार्ड, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक तसेच सदर योजनेच्या अटी शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र आवश्यक राहील.

**लाभार्थी निवड प्रक्रिया** : जिल्हास्तरीय समिती लाभार्थ्यांची निवड करेल. अर्जदारांच्या संख्येसह त्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिभार देऊन कोटा निश्चित केला जाईल, विहित कोट्यापेक्षा जास्त अर्जाच्या उपलब्धतेवर आधारित लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड केली जाईल. पात्र अर्जदारांची तात्पुरती यादी पोर्टल, ॲपवर जाहीर केली जाईल. पात्र अंतिम यादीतील अर्जदार दुर्दैवाने मयत झाल्यास सदर अर्जदाराचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.

**७५ वर्षावरील नागरीकास सहाय्यक, जोडीदारासह प्रवास** : ७५ वर्षावरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यक यापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असेल. अर्जदाराने त्याच्या अर्जात तसे नमूद करणे आवश्यक आहे. ७५ वर्षावरील अर्जदाराच्या जोडीदाराचे वय ६० वर्षापेक्षा कमी असेल तरीही प्रवासी सहाय्यक अर्जदारासोबत प्रवास करू शकेल.

**अशी होईल यात्रा** : जिल्हास्तरीय समितीने निवडलेल्या प्रवाशांची यादी आयुक्त, समाज कल्याण पुणे यांचेकडे सुपूर्द केली जाईल. निवडलेल्या प्रवाशांची यादी प्रवासासाठी अधिकृत टूरिस्ट कंपनी/एजन्सीला देण्यात देईल. नियुक्त अधिकृत टूरिस्ट कंपनी/एजन्सी टूरवरील प्रवाशांच्या गटाच्या प्रस्थानाची व्यवस्था करेल. प्रवासासाठी आवश्यक सुविधा आणि कोणत्या सुविधा देण्यात याव्यात याचा निर्णय राज्यशासन घेईल. सर्व यात्रेकरूंना प्रवासासाठी नियोजित स्थळी त्यांच्या स्वखर्चाने पोहोचावे लागेल.

**सुखद वृद्धापकाळासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना'** : राज्यातील ६५ वर्ष किंवा त्याहून अधिक वय असलेल्या नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनःस्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्राद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी ज्येष्ठांना लाभ देणात यावा यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना अंमलात आणली आहे.

**अटी व शर्ती** : ६५ वर्षे किंवा त्याहून अधिक वय.आधार कार्ड असावा किंवा आधारकार्डसाठी अर्ज केलेला असावा किंवा आधार नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. लाभार्थी पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशनकार्ड किंवा राष्ट्रीय सामाजिक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेंतर्गत किंवा राज्य केंद्रशासित सरकारच्या इतर कोणत्याही पेंशन योजनेंतर्गत वृद्धापकाळ निवृत्ती वेतन मिळत असल्यास पुरावा. लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न दोन लाखाच्या आत असल्याबाबत स्वयंघोषणापत्र, मतदान कार्ड सोबत जोडावे. राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, दोन वेगवेगळे घोषणापत्र सोबत जोडावे.

**लाभाचे स्वरूप** : पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता, दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने, उपकरणे ३ हजारापर्यंत खरेदी करता येईल. यामध्ये चष्मा, श्रवण यंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस लंबर बेल्ट व सर्वाइकल कॉलरचा समावेश आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्या कार्यालयात अर्ज सादर करावा.

*(या लेखाच्या लेखिका उद्योजक मासिकामध्ये कनिष्ठ प्रकल्प अधिकारी (से.पू.) म्हणून कार्यरत असून त्यांना मराठी आणि इंग्रजी प्रसार माध्यमात कामाचा सतरा वर्षांचा अनुभव आहे.)*

■ ■



# मुख्यमंत्री योजनादूत

**राज्य शासनाचा नवीन उपक्रम, तरुणांना मिळणार दरमहा १०,००० मानधन**

## राज्यात ५०,००० योजनादूत, ६ महिने करणार सरकारी योजनांचा प्रचार



**राज्यातील महायुती सरकारच्या योजना व उपक्रमांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रम सुरू केला असून याअंतर्गत ५०,००० योजनादूत नेमले जाणार आहेत. १८ ते ३५ वयोगटातील 'योजनादूत' १० हजार रुपये मानधनावर पुढील ६ महिने सर्वसामान्यांपर्यंत सरकारी योजनांची माहिती पोहोचवतील. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उपक्रम राबविला जाईल. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर १ तर शहरी भागात प्रत्येक ५००० लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने योजनादूत नेमले जातील.**

**- प्रिया गंद्रे**

महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. या लोक कल्याणकारी योजनांचे प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने 'शासन आपल्या दारी' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या दारापर्यंत जाऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत होता. या अंतर्गत राज्यातील लाखो नागरिकांना विविध शासकीय योजनांचा एका छताखाली लाभ देण्यात शासन यशस्वी झाले होते. याच उपक्रमाचा विस्तार म्हणजे 'मुख्यमंत्री योजनादूत' असून याचा मुख्य उद्देश सामाजिक बदल घडविण्यासाठी उत्सुक असलेल्या ५० हजार उत्साही तरुणांच्या समर्पित प्रयत्नाद्वारे जनतेपर्यंत पोहोचणे हा आहे. कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम म्हणजेच 'मुख्यमंत्री योजना दूत' होय.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना' राबविण्यास दि.९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिद्धी करणे व त्यांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ पोहोचविण्यासाठी ५०,००० 'योजनादूत' नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी(२७,८३४), प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी(५३८३) तर महानगरपालिकेच्या १२९६ वार्ड साठी प्रत्येकी १ याप्रमाणे राज्यात एकूण ४७,५१६ योजनादूतांची निवड केली जाणार आहे. म्हणजे शहरी भागात १९,६८२ तर ग्रामीण भागात २७,८३४ योजनादूत लवकरच निवडले जाणार आहेत.

### शासनाच्या योजनांची प्रचार व प्रसिद्धी

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावर सोपविण्यात आली आहे. नेमणूक केलेल्या योजनादूतांचे मानधन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून देण्यात येणार आहे. तसेच योजनादूतांच्या निवडीचे निकष, अटी व शर्ती तयार करण्याबाबतची कार्यवाही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने 'मुख्यमंत्री योजनादूत' कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिद्धी करणे व त्यांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने सहाय्य करण्यासाठी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.

### कार्यक्रमाची रूपरेषा

१) महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री योजनादूत' कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जातील.

२) ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात ५००० हजार लोकसंख्येसाठी १ योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येईल.

३) मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १०,००० प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येईल. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित)

४) निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत ६ महिन्यांचा करार केला जाईल व हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

### मुख्यमंत्री योजनादूताच्या निवडीसाठी पात्रतेचे निकष

१) वयोमर्यादा १८ ते ३५ वयोगटातील उमेदवार.

२) शैक्षणिक अर्हता- कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर.

३) उमेदवाराला संगणक ज्ञान आवश्यक.

४) उमेदवाराकडे अदययावत मोबाइल असणे आवश्यक.

५) उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असणे आवश्यक.

६) उमेदवारांचे आधार कार्ड असावे व त्याच्या नावाचे बँक खाते आधार संलग्न असावे.

### उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे

१) विहित नमुन्यातील 'मुख्यमंत्री योजनादूत' कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाइन अर्ज.

२) आधार कार्ड.

३) पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ.

४) अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला)

५) वैयक्तिक बँक खात्याचा तपशिल.

६) पासपोर्ट आकाराचा फोटो.

७) हमीपत्र (ऑनलाइन अर्जासोबतच्या नमुन्यामधील)

### उमेदवारास होणारे फायदे

प्रत्यक्ष कामाचा अनुभव. सामाजिक बदलाचा भाग होण्याची संधी. विद्या वेतनातून युवकांना आर्थिक सहाय्य. शिकण्याबरोबरच कौशल्य विकास. सरकारी कामकाजाचा अनुभव.

### मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक प्रक्रिया

१) उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात बाह्यसंस्थांमार्फत ऑनलाइनरीत्या पूर्ण करण्यात येईल.

२) ऑनलाइनरीत्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी राज्यातील प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल.

३) जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने, प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील (यामध्ये उमेदवारांची शैक्षणिक व वयोमर्यादेविषयक मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील). त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर ६ महिन्याचा करार केला जाईल. कराराचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही.

४) जिल्हा माहिती अधिकारी वरील प्रमाणे शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व करतील.

५) जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, (कौशल्य विकास रोजगार) व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १/शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून पाठवतील.

६) मुख्यमंत्री योजनादूत या कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना सोपविण्यात येणारे कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. या नेमणूकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही. याबाबतचे हमीपत्र निवड झालेल्या उमेदवाराकडून घेतले जाईल.

### निवड झालेल्या योजनादूताने करावयाची कामे

१) योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील.

२) प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

३) योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करतांना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील.

४) योजनादूत दर दिवशी त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल तयार करून तो ऑनलाइन अपलोड करतील.

५) योजनादूत त्यांना सोपविलेल्या जबाबदारीचा स्वतःच्या स्वार्थासाठी/नियमबाह्य कामासाठी उपयोग करणार नाहीत, तसेच ते गुन्हेगारी स्वरुपाचे/गैरवर्तन करणार नाहीत. योजनादूत तसे करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येवून त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल.

६) योजनादूत अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

**उपसंचालक (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांची जबाबदारी**

१) विभागीय स्तरावर विभागीय संचालक / उपसंचालक (माहिती) या योजनेचे सनियंत्रण करतील. जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा विभागीय स्तरावर घेतला जाईल.

२) जिल्हा माहिती अधिकारी हा सदर योजनेसाठी संबंधित जिल्ह्याचे नोडल ऑफिसर असतील.

३) संबंधित जिल्ह्यातील योजनादूतांनी विहित नमुन्यात ऑनलाइन अपलोड केलेल्या त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा आढावा जिल्हा माहिती अधिकारी घेतील तसेच, संबंधित योजनादूतांना त्यांच्या कामकाजामध्ये मार्गदर्शन करतील.

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील उपसंचालक (वृत्त) यांची नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी :**

१) मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रमाशी संबंधित कामकाजाचे समन्वयन करतील,

२) प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी / उपसंचालक यांच्याकडून दैनंदिन आढावा घेतील.

३) प्रत्येक जिल्ह्याने मुख्यालयाला साप्ताहिक अहवाल पाठविल्यानंतर त्याचे विश्लेषण करतील.

४) योजनादूत कार्यक्रमाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या बाह्यसंस्थेकडून अहवाल तयार करून घेतील. त्यानुसार राज्यातील कोणत्या जिल्ह्याचे काम समाधानकारक आहे अथवा नाही, हे तपासून त्याचा अहवाल तयार करतील.

५) योजनादूतांची निवड, समुपदेशन व निर्देशन आणि उद्दिष्टाप्रमाणे कामकाज केल्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करून घेतील.

६) योजनादूतांना त्यांचे मासिक मानधन विहित वेळेत अदा होते किंवा कसे याबाबत आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता आयुक्तालय यांच्याकडे समन्वय साधून खातरजमा करतील व याबाबत काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करतील.

**योजनादूत कार्यक्रमाच्या संचलनासाठी बाह्यसंस्थांमार्फत करावयाची कामे**

१) उमेदवारांची ऑनलाइन नोंदणी करणे.

२) उमेदवारांच्या प्राप्त अर्जाची तसेच, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची छाननी करणे व पात्र उमेदवारांच्या नावांची यादी जिल्हा माहिती अधिकारी यांना ऑनलाइन उपलब्ध करून देणे.

३) निवडण्यात आलेले योजनादूत यांना जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने समुपदेशन व निर्देशन, कामकाजाचे वाटप इ. बाबतीत सनियंत्रण करणे.

४) योजनादूतांना कामाचे वाटप झाल्यानंतर त्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबतचा (हजेरी) ऑनलाइन पद्धतीने अहवाल घेणे. मुख्यालय स्तरावरील उपसंचालक (वृत्त) (नोडल ऑफिसर) यांना याबाबत आवश्यक असेल तेव्हा माहिती देणे. तसेच, उपस्थितीबाबतचा व अन्य बाबींचा साप्ताहिक अहवाल त्यांना सादर करणे.

५)योजनादूतांनी प्रत्येक दिवशी केलेल्या कामाचा ऑनलाइन अहवाल घेणे. तद्नंतर सदरचा अहवाल जिल्हा माहिती अधिकारी व नोडल ऑफिसर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना पाठविणे.

६) योजनादूतांच्या मानधनाची देयके तयार करून जिल्हा माहिती अधिकारी यांना सादर करणे. त्याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय बाबी सादर करणे.

**अर्थसंकल्पीय तरतूद**

कार्यक्रमाच्या अंमबजावणीसाठी ५० हजार योजनादूत यांना प्रतिमा १०,००० रुपये याप्रमाणे ६ महिन्याकरिता अंदाजे ३०० कोटी इतका खर्च येणार आहे. हा खर्च कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात येईल. योजनादूतांनी ठरवून दिलेल्या उद्दिष्ट प्रमाणे काम केले आहे का नाही याची खातरजमा माहिती जनसंपर्क विभाग करेल व त्यानंतरच योजनादुताना मासिक मानधन अदा करण्यात येईल. ही कार्यवाही प्रत्येक महिन्याच्या २ तारखेपर्यंत पूर्ण करण्यात येईल. मानधन निवड झालेल्या उमेदवाराच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. अधिक माहितीसाठी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

*(या लेखाच्या लेखिका मुक्त पत्रकार असून विविध विषयांवर लिखाण करतात त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९१६८०६७००६ हा आहे.)*

■■



### कोकणच्या दिघीत औद्योगिक स्मार्ट सिटी

# ३८ हजार कोटींची गुंतवणूक

**विकसित भारत मोहिमेअंतर्गत वैश्विक पुरवठा साखळीमध्ये भारताचे स्थान बळकट करण्यासाठी राष्ट्रीय औद्योगिक पट्टा विकास प्रकल्पांतर्गत देशात १२ औद्योगिक स्मार्ट शहरे विकसित केली जाणार आहेत. त्या अंतर्गत रायगड जिल्ह्यातील दिघी बंदर येथे औद्योगिक क्षेत्र उभारले जाणार आहे. यावर केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतेच शिक्कामोर्तब केले आहे.**

**- प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्रिमंडळाने देशात १२ नव्या औद्योगिक स्मार्ट सिटींना मंजुरी दिली आहे. यात महाराष्ट्रातील रायगड-दिघीसह १० राज्यांतील व ६ प्रमुख कॉरिडॉरलगतच्या औद्योगिक स्मार्टसिटींचा समावेश आहे. नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्रामअंतर्गत केंद्र सरकार या प्रकल्पात २८,६०२ कोटी रुपये गुंतवणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माध्यमांना दिली आहे.

या प्रकल्पातून तब्बल १० लाख थेट नोकऱ्या व ३० लाख अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होतील. या प्रकल्पातून १.५२ लाख कोटींची गुंतवणूक क्षमता निर्माण होईल. तसेच यातून २०३० पर्यंत दोन लाख कोटींची निर्यात होण्याचे उद्दिष्ट बाळगले आहे.

**दिघीत ५४६.९ कोटींचे इंजिनिअरिंग, फार्मा, कापड उद्योग** : ६,०५६ एकरच्या दिघी स्मार्ट सिटीत अभियांत्रिकी, औषधी, कापड, रसायने आणि खाद्यपेय क्षेत्रातील उद्योग असतील. या प्रकल्पावर ५४६.९ कोटींचा खर्च अपेक्षित असून यामुळे रोजगारनिर्मितीस चालना मिळणार आहे. रायगड जिल्ह्यातील प्रस्तावित दिघी बंदराला जोडणाऱ्या दिघी स्मार्ट सिटीत ३८ हजार कोटींची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे.

**अधिग्रहण पूर्ण** : दिघी औद्योगिक स्मार्ट शहरांसाठी १०० टक्के जमिनीचे अधिग्रहण झाले असल्याची माहिती केंद्रीय व्यापार मंत्री पीयूष गोयल यांनी प्रसार माध्यमांना दिली. नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडोर डेव्हलपमेंट कार्यक्रमांतर्गत हे कॉरिडोर उभारले जात आहे. कोणत्याही महत्त्वकांक्षी प्रकल्प सुरू करायचा असेल तर जमिनीचे अधिग्रहण हा खूप मोठा मुद्दा असतो. सुदैवाने आपल्या देशात उभारल्या जाणाऱ्या १२ औद्योगिक स्मार्ट शहरांसाठी केंद्र सरकारने आधीच जमिनींचे अधिग्रहण केले आहे. पर्यावरणविषयक परवाने देखील घेण्यात आल्याने गुंतवणूकदारांना थेट उद्योग स्थापन करण्याची संधी मिळणार आहे. देशाचा चतुष्कोन जोडला जाईल अशा पद्धतीने औद्योगिक शहरांसाठी जमिनीची निश्चिती करण्यात आली असल्याचे गोयल यांनी सांगितले

**मोठ्या गुंतवणुकीची अपेक्षा** : रायगड जिल्ह्यातील दिघीत ३८ हजार कोटींची गुंतवणूक होणार असून यातून १ कोटी १४ लाख रोजगारनिर्मिती होईल. देशात आधीपासून ८ औद्योगिक स्मार्ट सिटीच्या उभारणीचे काम सुरू आहे. दिघी औद्योगिक स्मार्ट शहर हा प्रकल्प महाराष्ट्र आणि देशाच्या विकासात महत्त्वाची कामगिरी बजावेल असा विश्वास मंत्री गोयल यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा बिडकीन औद्योगिक पार्कनंतर राज्यात उभारला जात असलेला हा दुसरा महत्त्वाचा प्रकल्प आहे. क्षेत्राचा विचार केला तर गुजरातमधील धोलेरा औद्योगिक पार्क सर्वांत मोठे आहे. त्या खालोखाल दिघीचा प्रकल्प सर्वांत मोठा असेल.

दिघी बंदर क्षेत्राला लागून असलेल्या या औद्योगिक क्षेत्रातील उद्योग मार्फत निर्यातींवर सर्वाधिक भर असेल. माणगाव पुणे या राष्ट्रीय महामार्गापासून आणि मुंबई गोवा राज्य महामार्गापासून अवघ्या दहा किलोमीटर अंतरावर दिघी बंदर. औद्योगिक क्षेत्राचे याखेरीज कोलाड, इंदापूर, माणगाव ही रेल्वे स्थानके या प्रकल्पाशी जोडलेले असतील. यासोबतच मुंबई विमानतळ नवी मुंबई विमानतळ आणि पुणे विमानतळापासूनही औद्योगिक क्षेत्र अनुक्रमे १७०, १२० आणि ११६ किलोमीटर या अंतरावर असेल. महाराष्ट्रासाठीच्या महत्त्वाच्या प्रकल्पांची घोषणा करण्याच्या मालिकेमध्ये केंद्र सरकारने राज्यातील बंदर औद्योगिक क्षेत्र उभारणीला मंजुरी दिली आहे.

**औद्योगिक सिटीतील सुविधा** : कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबीयांसोबत इंडस्ट्रियल स्मार्ट सिटीमध्ये राहण्याची सुविधा मिळणार आहे. फॅक्टरीपर्यंत पायी जाता येणार आहे. या सिटी स्वर्णिम चतुर्भुज कॉरिडॉरच्या जवळ आहेत. हे क्षेत्र रेल्वे, हवाई आणि इतर वाहतूक सुविधांद्वारे सुलभ केले जातील. २४ तास वीज आणि पाण्याची सुविधा देखील असेल. गॅस पाइपलाइनसारख्या इतर सुविधाही उपलब्ध असतील. येथे उद्योग परिसंस्था निर्माण होईल. ही योजना २०२७ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. मोठ्या व एमएसएमईप्रमाणे इंडस्ट्रीला गुंतवणुकीची सुविधा देत इंडस्ट्री इकोसिस्टीम तयार केली जाईल. टेलिकॉम-ओएफसी नेटवर्क मिळेल. केंद्र व राज्य सरकारे अतिरिक्त इन्सेन्टिव्ह देतील. पाण्याचा पुर्नवापर होईल.

**दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र** : ५५ किमी बंदरापासूनचे अंतर; ६,०५६ एकर एकूण क्षेत्रफळ; ५,४६.९ कोटी रुपये एकूण अपेक्षित खर्च; ३८,००० कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित; १,१४,१८३ रोजगार अपेक्षित.




### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रत्नागिरी विमानतळ टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन

# उद्योग, पर्यटनाला चालना देण्यासाठी विमानतळ महत्त्वाचे

**उद्योग, व्यवसाय आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी विमानतळ अत्यंत महत्त्वाचे आहे. हेलिकॉप्टर सेवा, टूरिस्ट सर्किट तयार केल्यास मोठा फायदा होणार आहे. नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे हात तयार करा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. रत्नागिरी विमानतळाच्या टर्मिनल इमारतीच्या कोनशिला अनावरण प्रसंगी ते बोलत होते. - प्रतिनिधी**

रत्नागिरी विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे कुदळ मारून आणि कोनशिलेचे अनावरण करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते २१ ऑगस्ट रोजी भूमिपूजन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री उदय सामंत, आमदार शेखर निकम, रविंद्र फाटक, कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, विमानतळ प्राधिकरणाचे व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजारी, सिंधुरत्न समृद्ध योजनेचे विशेष निमंत्रित सदस्य किरण सामंत, मिरजोळे सरपंच रत्नदिप पाटील, शिरगाव सरपंच फरिदा काझी आदी उपस्थित होते.

### संरक्षण क्षेत्रातील उद्योग इच्छुक


मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीच्या बांधकामाचा प्रारंभ झाला. नवीन दालन तयार झाल्याशिवाय राहणार नाही. जगाला टक्कर देणारे इथले पर्यटन आहे. त्यासाठी कनेक्टीव्हिटी खूप महत्त्वाची आहे. नाईट लँडीगची सुविधा केल्यास परदेशी पर्यटक वाढण्यास मदत होणार आहे. पूर्ण क्षमतेने विमानतळ चालले पाहिजे, असे करा. १० हजार कोटींचे डिफेन्स सेक्टरमधील उद्योग इच्छुक आहेत. उद्योगासाठी पायाभूत सुविधा आणि वातावरण चांगले आहे. दावोसमध्ये ५ लाख कोटीचे सामंजस्य करार केले होते. त्यातील ७० टक्के अंमलबजावणी स्तरावर आहेत. उद्योग क्षेत्रात भरभराट होत आहे. रत्नागिरी जिल्ह्यात पर्यटनातूनही विकासाची मोठी संधी आहे. मासेमारीतून खूप मोठ्या प्रमाणात परकीय चलन उपलब्ध होत आहे. या सर्व विकासाचा पुढचा टप्पा गाठण्यासाठी विमानतळ ही सर्वात मोठी सुविधा आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### उद्योगांसाठी कनेक्टिव्हिटी महत्त्वाची

जास्तीत जास्त उद्योग महाराष्ट्रात यावेत, यासाठी उद्योजकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा सरकार देत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातही अनेक नवे उद्योग येत आहेत. निसर्ग सौंदर्यामुळे रत्नागिरी जिल्ह्याचा पर्यटनाच्या माध्यमातून विकास होणार आहे. मासेमारी हा रत्नागिरी जिल्ह्यातील महत्त्वाचा उद्योग आहे. या सर्व क्षेत्रांच्या विकासासाठी कनेक्टिव्हिटी हा सर्वात महत्त्वाचा दुवा आहे. या इमारतीचे काम लवकरच पूर्ण होईल आणि विमान वाहतूक सुरू होईल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

### टर्मिनलवर बांबूचे फर्निचर

पालकमंत्री उदय सामंत म्हणाले, दोन महिन्यापूर्वी विमानतळाबाबत बैठक आयोजित केली होती. मुख्यमंत्री महोदयांनी टर्मिनल इमारतीसाठी निधी देण्याचा निर्णय घेतला. गतिमान पद्धतीने सर्व परवानग्या मिळाल्या. दीड वर्षात हे टर्मिनल पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करताना टर्मिनलवर बांबूपासून बनविलेले फर्निचर सर्वत्र पहायला मिळेल, असेही ते म्हणाले. श्रीमती पांडे यांनी प्रास्ताविक करून सविस्तर माहिती दिली. यावेळी चित्रफीतीमधून विमानतळाची माहिती दर्शविण्यात आली. मिरजोळे, शिरगाव ग्रामस्थ आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■■




### पंप स्टोरेजचे राज्यात विक्रमी करार

# १ लाख ८८ हजार ७५० कोटी रुपयांची गुंतवणूक

**महाराष्ट्र राज्याची एकूण स्थापित क्षमता ४६ हजार मेगावॅट त्यातून ४० हजार ८७० मेगावॅटचे पंप स्टोरेज क्षेत्रात वीजनिर्मिती करार झाल्याने ग्रीन एनर्जी क्षेत्रात हे राज्याचे मोठे पाऊल आहे. जलविद्युत ऊर्जा निर्मितीसाठीच्या पंप स्टोरेज प्रकल्पासाठी झालेल्या सामंजस्य करारामुळे राज्यात एकूण १ लाख ८८ हजार ७५० कोटी रुपयांची गुंतवणूक तर ६२ हजार ५५० एवढी रोजगारनिर्मिती होणार आहे.**

**- प्रतिनिधी**

जलविद्युत ऊर्जा निर्मितीसाठीच्या पंप स्टोरेज प्रकल्पासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र शासन आणि एन टी पी सी, वेलस्पन न्यू एनर्जी, एन एच पी सी, रीन्यू हायड्रो पावर, टी एच डी सी इंडिया, टोरंट पॉवर, अदानी ग्रीन एनर्जी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. एकूण ३५ हजार २४० मेगावॅटचे वीजनिर्मिती करार करण्यात आले. या करारामुळे राज्यात एकूण १ लाख ८८ हजार ७५० कोटी रुपयांची गुंतवणूक तर ६२ हजार ५५० एवढी रोजगारनिर्मिती होणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्याची एकूण स्थापित क्षमता ४६ हजार मेगावॅट त्यातून ४० हजार ८७० मेगावॅटचे पंप स्टोरेज क्षेत्रात वीजनिर्मिती करार झाल्याने ग्रीन एनर्जी क्षेत्रात हे राज्याचे मोठे पाऊल आहे. यापूर्वीही राज्यात सौरऊर्जा निर्मितीत लक्षणीय पुढाकार घेतला असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

२०३० पर्यंत राज्यातील ५० टक्के वीजनिर्मिती ही नैसर्गिक साधनांतून होणार आहे. नैसर्गिक संसाधनांचा वापर करून ऊर्जा शाश्वत पद्धतीने निर्माण करू शकतो. राज्यात पश्चिम घाटात विशेष जैवविविधता आहे. तेथे अनेक ठिकाणी शीतगृहांसाठी ऊर्जेचा वापर होणार आहे. शासकीय आणि खाजगी क्षेत्राने उत्सुकतेने हे करार पूर्णत्वास नेण्यास सहकार्य केले आहे. यामुळे राज्यासाठी शाश्वत वीजनिर्मिती आणि अर्थव्यवस्था वाढीस सहकार्य लाभणार आहे.

अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी विविध सात कंपन्यांअंतर्गत होणाऱ्या करारासंदर्भात अधिक माहिती दिली. नॅशनल थर्मल पॉवर कंपनीअंतर्गत ९ हजार ७८ कोटी इतकी गुंतवणूक होणार आहे तर १ हजार ४०० रोजगारनिर्मिती, १ हजार ८०० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. वेलस्पन न्यू एनर्जी कंपनी अंतर्गत ५ हजार कोटी गुंतवणूक तर १ हजार ५०० रोजगारनिर्मिती, १ हजार २०० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे.

एनएचपीसी लिमिटेड अंतर्गत ४४ हजार १०० कोटी इतकी गुंतवणूक, ७ हजार ३५० रोजगारनिर्मिती आणि ७ हजार ३५० मेगा वॅट वीजनिर्मिती होणार आहे. रिन्यू हायड्रोपावर लिमिटेड अंतर्गत १३ हजार १०० कोटी गुंतवणूक, ५ हजार रोजगारनिर्मिती, २ हजार ६०० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे.

टेहेरी हायड्रो डेव्हलपमेंट कार्पोरेशन इंडिया लिमिटेड अंतर्गत ३३ हजार ६२२ कोटी गुंतवणूक, ६ हजार ३०० रोजगारनिर्मिती तर ६ हजार ७९० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. टोरन्ट पावर लिमिटेड अंतर्गत २८ हजार कोटी गुंतवणूक १३ हजार ५०० रोजगारनिर्मिती, ५ हजार ६०० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड अंतर्गत ५४ हजार ४५० कोटी इतकी गुंतवणूक, ३० हजार रोजगार आणि ९ हजार ९०० मेगावॅट इतकी वीजनिर्मिती केली जाणार आहे.



**जळगाव येथे लखपती दीदी संमेलन**

# मातृशक्तीला आर्थिक सक्षमीकरणाचे बळ

**देशातील प्रत्येक महिलेच्या सुरक्षिततेसोबतच आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. संत मुक्ताई आणि कवयित्री बहिणाबाई यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या जळगाव या भूमीत लखपती दीदीचे संमेलन पार पडले. महाराष्ट्र राज्यात बचतगटामार्फत ७५ लाख कुटुंब लखपती दिदी योजनेला जोडली गेली असून दोन कोटी कुटुंब जोडण्याचा संकल्प करण्यात आला आहे. लखपती दीदीचे संमेलन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बचतगटाच्या ४८ लाख महिलांना २५०० कोटी रुपयांच्या फिरत्या निधीचे वितरण करण्यात आले.**

**- प्रतिनिधी**

भारताची वाटचाल विकसित देशाकडे सुरू असून २०४७ पर्यंत आपल्याला हे लक्ष्य गाठावयाचे आहे. हे लक्ष्य साधताना देशातील प्रत्येक महिलेच्या सुरक्षिततेसोबतच आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. महिलांच्या सर्वांगीण प्रगतीमुळे आपण विकसित भारताचे ध्येय नक्कीच गाठू, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी येथे व्यक्त केला. स्वयंसहायता गटाला आर्थिक ताकद देतानाच गरिबांसाठी घरकूल बांधण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. आतापर्यंत चार कोटी घरकूल वाटप करण्यात आले असून आगामी काळात ३ कोटी घरे बांधण्यात येतील, त्यात महिलांचे नाव प्रथम असेल, असेही त्यांनी सांगितले.

जळगाव येथील प्राईम इंडस्ट्रीअल पार्क येथे (विमानतळ परिसर) देशपातळीवरील लखपती दीदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते. राज्यपाल डॉ. सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेन्नासानी, केंद्रीय राज्यमंत्री कमलेश पासवान, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ, आमदार सर्वश्री संजय सावकारे, सुरेश भोळे, किशोर पाटील, मंगेश चव्हाण, आमदार लता सोनवणे यांच्यासह मान्यवरांची यावेळी व्यासपीठावर उपस्थिती होती. तसेच, कार्यक्रमास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र ही राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जन्मभूमी आहे. या राज्याला मातृशक्तीचा समृद्ध आणि गौरवशाली वारसा लाभला आहे. त्याचा परदेश दौऱ्यात वेळोवेळी प्रत्यय येतो. अलीकडेच पोलंड दौऱ्यात या संस्कृतीचे दर्शन घडले. जळगाव जिल्हा सुद्धा संत मुक्ताबाई यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांची गोडी आजही प्रत्येकाच्या ओठावर असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

आपल्या देशाची विकसित राष्ट्राकडे वाटचाल सुरू आहे. यामध्ये महिलांचा सहभाग मोलाचा असून लखपती दीदी योजना ही त्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. मागील एका महिन्यात ११ लाख दीदी लखपती बनल्या आहेत, यात एक लाख दीदी महाराष्ट्रातील आहेत. त्यासाठी राज्य शासन ही पुढाकार घेत आहेत. ही अभिनंदनीय बाब आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

एकीकडे विकसित राष्ट्र म्हणून त्या दिशेने काम सुरू असताना महिलांच्या समस्या सोडविण्याचा संकल्प केंद्र शासनाने केला असल्याचे सांगून

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, महिलांसाठी ३ कोटी घरे बांधताना ती त्यांच्या नावावर केली जातील. याशिवाय केंद्र सरकारने जनधन खाते उघडले. मुद्रा योजना सुरू केली. विना तारण कर्ज दिले. यात ७० टक्के महिला आहेत. महिलांच्या कर्तृत्वावर संपूर्ण देशाला विश्वास आहे. त्यांच्यासाठी स्व-निधी योजना सुरू केली. विश्वकर्मा परिवार अंतर्गत महिलांना जोडले. सखी मंडळ मार्फत १० कोटी महिला जोडल्या गेल्या आहेत. बचत गटांना गेल्या दहा वर्षांत ९ लाख कोटींची मदत केली, असे त्यांनी नमूद केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की, बचतगटांच्या महिलांना ड्रोन पायलट बनविणार असल्याचे सांगून त्यासाठीचे प्रशिक्षण त्यांना देण्यात येईल. आधुनिक शेतीसाठी महिलांना प्रेरित क?ण्यात येईल. यासाठी महिलांना कृषी सखी करून रोजगार वाढविण्यावर भर राहील. महिलांसाठी अर्थसंकल्पात ३ लाख कोटी रूपयांची तरतूद केली आहे. सेनादलात महिलांचा समावेश केला गेला आहे. स्टार्टअप क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांबाबत कठोर कारवाई केली जाईल. या प्रकरणी दोषींना कडक शासन व्हावे, यासाठी भारतीय न्याय संहिते अंतर्गत कायद्याचा वापर केला जाईल. महिलांवर अन्याय आणि अत्याचार करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. महिलांचे सामर्थ्य वाढविण्याबरोबरच त्यांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. यासाठी आवश्यक ती मदतही प्रत्येक राज्यांना केली जाईल, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांसोबत राहील. महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे. रोजगार आणि गुंतवणूकदार यांचे लक्ष येथे असते. त्यामुळे या प्रयत्नांसाठी राज्य शासनाला सर्वतोपरी मदत केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### महिला सशक्तीकरणाचे स्वप्न पूर्ण करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १ कोटी महिलांच्या खात्यात दोन हप्ते जमा करण्यात आले. अन्नपूर्णा योजनेंतर्गत तीन गॅस सिलिंडर देण्याची योजना सुरू केली. मुलींना उच्च शिक्षण मोफत, महिलांना प्रवासात सवलत या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचे काम राज्य शासन करत आहे. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.

देशात ३ कोटी लखपती दीदी बनवण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असेल, यात राज्यातील ५० लाख दीदींचा समावेश राहील. अनेक भगिनी पुढाकार घेऊन लघु उद्योग करून कुटुंबाला पुढे नेत आहेत. राज्यात २५ हजार स्वयंसहायता गटांना ३० कोटींची कर्जे देण्यात आली आहे. त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

देशाला महाशक्ती बनवण्यासाठी महिलांची भागीदारी आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र शासनाचे सहकार्य मिळत आहे. केंद्र शासनाने ७६ हजार कोटींच्या वाढवण बंदर विकासाला सहाय्य केले. मेट्रो प्रकल्पाला मदत केली. राज्यातील कांदा, कापूस, दूध, सोयाबीन यांना चांगला दर मिळण्याच्या दृष्टीने आणि सिंचन प्रकल्पांना निश्चितपणे मदत करेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी योजना - शिवराज सिंह चौहान

लखपती दीदी ही महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी आणि विकासाला वेग देणारी योजना आहे. महिलांना त्यांच्या व्यवसायासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून त्यांना स्वावलंबी करण्याचा हा प्रयत्न असल्याचे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले. भरपावसात एवढ्या मोठ्या संख्येने महिलांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याबद्दल त्यांनी सर्व भगिनींचे आभार मानले.

### देशाच्या विकासात नारीशक्तीचे मोठे योगदान - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महिला विकासाच्या प्रवाहात आल्यास देशात प्रभावी आणि विकासात्मक बदल घडू शकतो. त्यामुळेच विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या नारीशक्तीच्या आर्थिक बळकटीकरणासाठी राज्य शासन सर्वोतोपरी सहाय्य करत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नारीशक्ती ही विविध क्षेत्रात आपले नाव कमावत आहे. देशाच्या विकासाच्या भागीदारीत महाराष्ट्र कुठेच कमी पडणार नाही. संत मुक्ताई आणि कवयित्री बहिणाबाई यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. अशा ठिकाणी हे लखपती दीदीचे संमेलन होत आहे. राज्यात बचतगटामार्फत ७५ लाख कुटुंब जोडली गेली असून दोन कोटी कुटुंब जोडण्याचा संकल्प आपण केला आहे. जळगाव जिल्हा सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या नार-पार सिंचन योजनेला आपण गती दिली. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निविदा आणि इतर प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

### राज्य शासन नेहमीच महिला भगिनींच्या पाठीशी - उपमुख्यमंत्री अजित पवार

संपूर्ण देशात सुरू असलेला विकासाचा रथ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या रूपाने जळगाव जिल्ह्यात आला आहे. केळी, कांदा उत्पादनासाठी जळगाव जिल्हा प्रसिद्ध आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनविण्याचा संकल्प केला आहे. राज्यात ५० लाख लखपती दीदी बनविण्यात येणार आहे, त्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

दरम्यान, आजच्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील वंदना पाटील, मनीषा जगताप, ज्योती तागडे, सीमा कांबळे, रमा ठाकूर यांच्यासह शीतल नारेट (हिमाचल प्रदेश), महबूबा अख्तर (जम्मू-काश्मीर), गंगा अहिरवार (मध्य प्रदेश), एस. कृष्णावेण्णी (तेलंगणा) आणि नीरज देवी (उत्तर प्रदेश), सेरिंग डोलकर (लडाख) यांना यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते लखपती दीदी झाल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बचतगटाच्या ४८ लाख महिलांना २५०० कोटी रुपयांच्या फिरत्या निधीचे वितरण करण्यात आले. ■ ■



६ डिस्टिलरीज, ६ ब्रेव्हरीज, २ देशी मद्याचे कारखाने

# महाराष्ट्राच्या मद्यनिर्मितीची राजधानी

**सातवाहनांच्या साम्राज्याची राजधानी पैठण, मोहम्मद बिन तुघलकने दिल्लीहून स्थलांतरीत केलेली देशाची राजधानी दौलताबाद, औरंगजेबाच्या काळातील मुघलांची राजधानी औरंगाबाद आणि आता महाराष्ट्राची पर्यटन राजधानी छत्रपती संभाजीनगर. अशा ४ राजधान्यांनी समृद्ध झालेले हे शहर. मात्र, इथल्या पाण्यात अशी काही नशा आहे की त्यामुळे अजून एक राजधानी होण्याचा मान या शहराला मिळाला आहे. ती म्हणजे देशाची 'बीअर राजधानी'. जगभरात नावाजलेल्या बीअर आणि मद्याचे उत्पादन करणाऱ्या तब्बल १४ कंपन्या मोठ्या दिमाखात येथे सुरू आहेत. यातून शासनाला उत्पादन शुल्काच्या रूपात वर्षाकाठी ५५७५ कोटींचा महसूल मिळतोय. तो राज्याच्या एकूण उत्पादन शुल्काच्या २४% आहे, तर या उद्योगातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष २० ते २२ हजार हातांना रोजगारही मिळालाय.**

**- प्रतिनिधी**

देशातील प्रमुख फार्मा, ऑटोमोबाइल आणि ऑटो एन्सीलरी हब अशी ओळख असणारे छत्रपती संभाजीनगर देशातील प्रमुख ब्रेव्हरीज आणि डिस्टिलरीज हबही म्हणूनही ओळख निर्माण करत आहे. येथील वाळूज, चिकलठाणा आणि शेंद्रा एमआयडीसीमध्ये ६ डिस्टिलरीज, ६ ब्रेव्हरीज आणि २ देशी मद्याचे उत्पादन करणारे कारखाने आहेत. मध्यवर्ती भौगोलिक स्थान, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि गोदावरीचे पाणी या तीन वैशिष्ट्यांमुळे शहरात जगातील प्रमुख मद्यनिर्मितीचे ब्रँड्स दाखल झाले आहेत. सहसा या सर्वांनाच मद्यनिर्मिती करणारे कारखाने म्हटले जाते. मात्र, याचे ३ प्रकार पडतात. ब्रेव्हरीजमध्ये केवळ बीअर तयार होते. शासनाच्या नियमांप्रमाणे त्यात १०% पर्यंत अल्कोहोल असते. डिस्टिलरीजमध्ये स्पिरीटचे उत्पादन होते. त्याचा अन्य मद्यात वापर होतो. या मद्यात ४२% पर्यंत अल्कोहोलला परवानगी आहे. देशी कंपन्यात देशी दारूचे उत्पादन होते.

### सिलिकामुक्त पाण्याचा फायदा

तत्कालीन औरंगाबाद शहरात सर्वात आधी उद्योजक विनय चौघुले यांनी १९९३ मध्ये पहिली बीअर कंपनी सुरू केली. त्यापाठोपाठ लिला सन्स या उद्योगात उतरले आणि मग बीअर कंपन्यांची रांगच लागली. शहरात बीअर कंपन्या असण्याचे मुख्य कारण या शहराची भौगोलिक स्थिती आहे. कच्चा माल आणणे आणि तयार मालाची देशभरात वाहतूक करण्यासाठी शहराचे मध्यवर्ती स्थान फायद्याचे ठरते. दुसरे कारण म्हणजे उत्तम दर्जाच्या बीअरसाठी मिनरल्समुक्त पाण्याची (डीमिनरलाइझ्ड) आवश्यकता असते. सहसा कोणत्याही नैसर्गिक पाण्यामध्ये सिलिका हा मिनरल प्रति लिटरमध्ये ५ ते २५ मिलीग्रॅम असतो. बीअर कंपन्यांना सिलिका काढून पाणी हलके करण्यासाठी वेगळी प्रक्रिया करावी लागते. गोदावरीचे पाणी सिलिका मुक्त असल्याने या प्रक्रियेचा खर्च वाचतो. तसेच शहरात कमी खर्चात मनुष्यबळ मिळत असल्याने कंपन्यांनी शहराला पसंती दिल्याचे लिला सन्सचे संचालक केशव लिला सांगतात.

### देशातील प्रमुख ब्रँड्सचे उत्पादन

डिस्टिलरीजमध्ये पोटेबल स्पिरीट, इथेनॉल आणि बॉटलिंगचे काम चालतात. राज्यातील १० प्रमुख ब्रेव्हरीजपैकी ५ शहरात आहेत. यात देशातील बीअरचे प्रमुख ब्रँड्स किंगफिशर, काल्सबर्ग, टूबर्ग, बडवायझर यांच्यासह स्थानिक ब्रँड खजुराहो आणि कँगारूचे उत्पादन होते. राज्यातील एकूण बीअर उत्पादनाच्या ७० टक्के उत्पादन संभाजीनगरातील कंपन्यात होते.

### पाण्याचा वापर आला अर्ध्यावर

एक लिटर बीअरच्या उत्पादनासाठी पूर्वी ८ लिटर पाणी लागायचे. नवीन

तंत्रज्ञानामुळे आता ३.५ लिटर पाणी लागतंय, तर कंपन्या पाणी बचत, पाण्याचा पुनर्वापर यावर भर देत आहेत. पाण्याची बचत करतानाच या उद्योगाचा परिसरातील शेतकऱ्यांनाही फायदा होतोय. मद्यनिर्मितीसाठी ज्वारी, गहू, बाजरी, मका, बटाटा, बार्ली इ.चा वापर केला जातो. यातून परिसरातील शेतकऱ्यांच्या मालालाही चांगला भाव मिळतोय.

### राज्यातील २५% महसूल संभाजीनगरातून

महाराष्ट्रातून १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्षात २३,२८९.६७ कोटीचे उत्पादन शुल्क जमा झाले. यात एकट्या छत्रपती संभाजीनगरचा वाटा ५४५५.५४ कोटी तर संभाजीनगर विभागाचा ५५७४.६३ कोटी रुपये आहे. म्हणजेच राज्याच्या एकूण महसुलाच्या तब्बल २३.९४%वाटा संभाजीनगरातील आहे. संभाजीनगरात गेल्या वर्षी ५१०८.५६ कोटीचा महसूल जमा झाला होता. वर्षभरात यात ३४६.९८ कोटी म्हणजेच ६.७९% ची वाढ झाली.

### शहरात बीअर, मद्यनिर्मितीचे १४ कारखाने

छत्रपती संभाजीनगर येथील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार येथील वाळूज, चिकलठाणा आणि शेंद्रा एमआयडीसीमध्ये ६ डिस्टिलरीज, ६ ब्रेव्हरीज आणि २ देशी मद्याचे उत्पादन करणारे कारखाने आहेत.

### भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्या

युनायटेड स्पिरिट्स लि., चिकलठाणा
कोकण ॲग्रो मरीन इंडस्ट्रीज, बाबरगाव
अलाईड ब्लेंडर्स ॲण्ड डिस्टिलर्स, चिकलठाणा
रेडिको एन व्ही डिस्टिलरी लि., शेंद्रा एमआयडीसी
ग्रेनॉच इंडस्ट्रिज लि. भेंडाळा, ता. गंगापूर
बीम ग्लोबल लिझी कोकण ॲग्रो, बाबरगाव

### बीअरनिर्मिती करणाऱ्या कंपन्या

युनायटेड ब्रेवरीज, (यूबी मिलेनियम), वाळूज; युनायटेड ब्रेवरीज, (यूबी अजिंठा), वाळूज; कार्ल्सबर्ग इंडिया, एमआयडीसी वाळूज; ॲनशर बुश इन बेव्ह इ., युनिट फोस्टर, वाळूज; ॲनशर बुश इन बेव्ह, युनिट पाल्स, वाळूज; लीलासन्स इंडस्ट्रिज, एम. वाळूज; देशी मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्या; ग्रेनॉच इंडस्ट्रीज, भेंडाळा, गंगापूर; कोकण ॲग्रो मरीन इंडस्ट्रीज, बाबरगाव

### पाणी टंचाईचे आव्हान

दिवसेंदिवस बीअरला मागणी वाढत आहे. ती पूर्ण करण्यासाठी जगभरातील प्रमुख कंपन्या शहरात उत्पादन करताय. अजून नवीन कंपन्यांना संधी आहे. यात आम्ही एकमेव भारतीय कंपनी तग धरून आहोत. मात्र, आमच्या मर्यादांमुळे व्यवसाय करताना अडचणी येताय. पाणी टंचाईचे संकट आहे. विकतचे पाणी घेऊन उत्पादनाची वेळ आलीय. यामुळे उत्पादन मूल्य वाढले आहे, तरी किंमत वाढवता येत नसल्याने तोटा सहन करावा लागतोय.

- **केशव लिला,** संचालक, लिला सन्स इंडस्ट्रिज

### रोजगाराची मोठी संधी

छत्रपती संभाजीनगरमध्ये तयार झालेल्या बीअरला सर्वत्र मागणी आहे. गोदावरीच्या पाण्यामुळे बीअरला वेगळी चव येते. चाहते मेड ईन छत्रपती संभाजीनगर पाहुन बीअर विकत घेतात. यातून येथील बीअर उद्योगातील क्षमता लक्षात येते. आपल्याकडे जगभरातील महत्त्वाचे ब्रँड असले तरी यातून मिळणारा महसूल राज्याच्या तिजोरीत जमा होतो आणि स्थानिक हातांना रोजगार देतो. हे या उद्योगाचे वैशिष्ट म्हणता येईल.

-संतोष झगडे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग

### बीअरची जगभरात निर्यात

आपल्या शहरातील बीअरची चव खास असल्याने त्यास नेहमीच मागणी असते. गोदावरीच्या पाण्याची अशी काही चव आहे की जगभरातील प्रमुख ब्रँड शहरात उत्पादन करतात. अनेक ब्रँड्स तर येथे विक्री करत नाहीत. ते खास निर्यातीसाठी तयार केले जातात. बीअरची मागणी वाढत चालल्याने उत्पादनाही वाढ होत आहे. ही वाढ लक्षात घेऊन भविष्यात अनेक उद्योग येथे येतील. त्यातून रोजगारनिर्मिती होईल आणि शहराच्या अर्थव्यवस्था गतीमान करण्यास हातभार लागेल.

-**शिवाजी पाटील,** अध्यक्ष, औरंगाबाद डिस्ट्रिक्ट हॉटेल रेस्टॉरंट ओनर्स असोसिएशन

### मद्यनिर्मितीचा झोन व्हावा

डिस्टिलरी, ब्रेव्हरीजचा प्रकल्प सुरू करण्याची प्रक्रिया किचकट आणि वेळखाऊ आहे. अनेक परवानग्या, एनओसी लागतात. पर्यावरणीय मंजुऱ्या मिळवताना दमछाक होते. प्रकल्पाचा मोठा खर्च रासायनीक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ईटीपी) टाकण्यावर होतो. या उद्योगात सुलभता आणण्यासाठी शासनाने खास मद्यनिर्मितीचे झोन किंवा क्लस्टर विकसीत करायवेत. यामुळे कमीत कमी कागदोपत्री प्रक्रियेतून उद्योग उभारता येईल. सामायिक ईटीपी असेल. हा झोन आपल्या शहरातच तयार झाला तर येथे मोठी गुंतवणूक येऊन रोजगारही निर्माण होईल.

- **श्रीधर पाटील,** निवृत्त मद्यनिर्मिती उद्योग अधिकारी

### आकडे बोलतात

१२ मद्यनिर्मितीचे उद्योग छत्रपती संभाजीनगरात

६ डिस्टिलरीजमध्ये ७६.१.५३ लाख लिटरचे उत्पादन

६ ब्रेव्हरीजमध्ये ३७७८.२८ लाख लिटरचे उत्पादन

२ देशी दारूचे कारखान्यात ३.६६ लाख लिटरचे उत्पादन

५५७४.६३ कोटीचा संभाजीनगर विभागाचा महसूल, २३,२८९ कोटीचा राज्याचा महसूल, २४% महसूल एकट्या संभाजीनगरातून

६.७९% वाढला वर्षभरात महसूल २२ हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार

३.५ लिटर पाण्यातून १ लिटर बीअरची निर्मिती

■ ■



## 'यूएलआय' कर्जप्रणाली

# समृध्द बळीराजाचा आधार

**भारताची अर्थव्यवस्था आजही कृषिप्रधान म्हणून ओळखली जाते. भारताला तिसऱ्या क्रमांकावर नेण्यासाठी कृषी क्षेत्र बळकट करणे, या क्षेत्राचा पाया विस्तार करणे आणि बळीराजा सुखी-समाधानात राहावा यासाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि देशातील लाखो शेतकऱ्यांसाठी कृषी कर्जामध्ये सुलभता निर्माण व्हावी म्हणून युनिफाईड लेंडिंग इंटरफेस अर्थात यूएलआय ही नवी सर्वसमावेशक कर्ज प्रणाली सुरू केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यात विधायक बदल होणार आहे.**

**- प्रसाद घारे**

भारताची अर्थव्यवस्था सध्या जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. लवकरच ती जपानला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर झेपावणार आहे. त्यादृष्टीनेच सध्या तिची वाटचाल चालू आहे. असे असूनही भारताची अर्थव्यवस्था आजही कृषिप्रधान म्हणूनच ओळखली जाते. भारताला तिसऱ्या क्रमांकावर नेण्यासाठी कृषिक्षेत्र बळकट करणे, या क्षेत्राचा पाया विस्तारणे आणि बळीराजा सुखी समाधानात राहावा यासाठी प्रयत्न करणे याला प्राधान्य असणे आवश्यक आहे. याचा सारासार विचार करून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील लाखो शेतकऱ्यांसाठी कृषी कर्जामध्ये सुलभता निर्माण व्हावी म्हणून युनिफाईड लेंडिंग इंटरफेस (यूएलआय) ही नवी सर्वसमावेशक कर्ज वितरण प्रणाली सुरू केली आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश पेरणारी ही जीवनदायी तसेच क्रांतिकारी डिजिटल सुविधा ठरणार आहे.

**जणू क्रांतीच** : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने काही वर्षांपूर्वीच सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा क्षेत्रात निर्माण केलेल्या युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) यंत्रणेला अभूतपूर्व यश मिळाले. आज देशाच्या कानाकोपऱ्यातील छोट्यातील छोटी व्यक्ती आणि श्रीमंतातील श्रीमंत व्यक्ती याच्याच आधारे सर्व खरेदी-विक्रीचे व्यवहार करीत आहे. इतके घवघवीत यश मिळवणारा भारत हा जागतिक पातळीवरील एकमेव लोकशाही देश ठरला आहे. याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला हवा. भारतात जागतिक पातळीवर काहीतरी भव्यदिव्य घडत आहे, ही नक्कीच सकारात्मक गोष्ट म्हणायला हवी.

भारताने डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रात जणू क्रांतीच घडवून आणली आहे. याद्वारे शून्य मिनिटात पैसे पाठवले जात आहेत. त्यामुळेच या डिजिटल यंत्रणेचा वापर करून डिजिटल क्रेडिटमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. रिझर्व बँक ऑफ इंडियाची बंगलोर येथे 'रिझर्व बँक इनोव्हेशन हब' ही उपकंपनी कार्यरत आहे. या उपकंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश बंसल यांनी या नव्या माहिती प्रणालीचा तपशील जाहीर केला. नावीन्यतेचा सतत संशोधन व शोध घेणाऱ्या माहिती तंत्रज्ञान विभागाने यूपीआयच्याच माध्यमातून या नवीन युनिफाईड लेंडिंग इंटरफेस (यूएलआय) सुविधा प्रणालीचा प्रारंभ करत असल्याचे जाहीर केले आहे. याचा लाभ देशभरातील लाखो छोट्या-मोठ्या शेतकऱ्यांना तसेच छोट्या-मोठ्या उद्योजकांनाही कर्ज मिळवण्यासाठी सुलभ ठरणार आहे.

एक प्रकारे संपूर्ण बँकिंग क्षेत्रात 'यूएलआय'मुळे एक प्रकारची क्रांती होणार असल्याचे यूपीआयच्या यशावरून तरी वाटते. रिझर्व बँकेने ही प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर ऑगस्ट २०२३ मध्ये दोन राज्यांमध्ये राबवली होती. त्यावेळी त्याचे नाव 'एफसीपी' म्हणजे 'फ्रिक्शनलेस क्रेडिट प्लॅटफॉर्म' असे होते. त्याला अधिकृतपणे 'यूएलआय' नाव देण्यात आले आहे. त्यापूर्वी सप्टेंबर २०२२ मध्ये रिझर्व्ह बँकेने किसान क्रेडिट कार्डाचे डिजिटलायझेशन करून एक लाख साठ हजार पेक्षा कमी रकमेची कर्जे मध्य प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर शेतकऱ्यांना दिली होती. त्याचा अनुभव चांगला आल्यानेच नवीन 'यूएलआय' चा वापर करून कृषी कर्ज सुलभ करण्याची योजना रिझर्व बँकेने आखलेली आहे.

प्रत्येक शेतकऱ्याच्या किंवा कर्ज घेणाऱ्या व्यक्तीच्या पूर्वपरवानगीने त्याची सर्व व्यक्तिगत माहिती यामध्ये नोंदवली जाणार आहे. त्यात त्याच्या मालकीच्या विविध राज्यांतील जमिनीची नोंद असणार आहे. ही सर्व माहिती कर्ज देताना किंवा घेताना उपयोगी पडणार असून ती विविध स्रोतांकडून संकलित केली जाणार आहे. सुरुवातीस छोट्या रकमेची कर्जे घेणारे ग्रामीण भागातील शेतकरी यांच्यासाठी ही योजना सुरू केली जाणार आहे. प्रत्येक कर्जदाराची आर्थिक आणि बिगर आर्थिक माहिती तपासून त्याला कर्ज देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. देशातील शेतकरी वर्गाबरोबरच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांनाही त्यांच्या कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी या यंत्रणेचा वापर केला जाणार आहे. यामुळे छोट्या व ग्रामीण भागातील शेतकरी तसेच उद्योजक यांची कर्ज

घेण्याची क्षमता तपासण्याचा कालावधी अत्यंत कमी होणार आहे. बँकांच्या दृष्टिकोनातून कोणतेही छोटे, मोठे कर्ज द्यावयाचे झाले तर त्याची सर्व प्रकारची तपासणी केली जाते. त्यास पतपुरवठा मूल्यांकन असे म्हणतात. या यंत्रणेमध्ये सर्वसाधारण व प्रमाणित 'ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग संवेदकाचा' म्हणजे 'एपीआय'चा अंतर्भाव केलेला असल्याने ही सर्व प्रक्रिया अत्यंत सुलभ होणार आहे.

**'प्लग ॲण्ड प्ले'** : विविध स्रोतांकडून मिळणाऱ्या माहितीशी त्वरित जोडता यावे यासाठी 'प्लग ॲण्ड प्ले' या पद्धतीचा वापर बँका, बिगर बँकिंग वित्त संस्था किंवा पतसंस्थांना करता येणार आहे. यामध्ये सर्व तांत्रिक प्रक्रिया जलद गतीने पूर्ण होणार असल्याने कर्ज मागितल्यापासून कर्ज मिळण्यापर्यंतचा कालावधी काही तासांचा होऊ शकेल इतकी कार्यक्षमता या यंत्रणेमध्ये आहे. कर्ज घेणाऱ्या व्यक्तीची सर्व माहिती अगोदरच उपलब्ध असल्याने त्यांच्या कर्ज प्रक्रियेची पूर्तता करण्यासाठी अन्य कागदपत्रांची आवश्यकता लागणार नाही. यामध्ये मल्टिपल डेटा प्रोव्हाइडर्ससह कर्ज देणाऱ्या संस्था, बँका किंवा वित्त संस्था यांच्याकडे विविध राज्यातील जमिनींची नोंदणी उपलब्ध होणार आहे. त्यामध्ये कर्ज घेणाऱ्याची तपशीलवार माहिती उपलब्ध असेल त्यामुळे ग्रामीण भागातील कर्जदारांना शेतकऱ्यांना कमी रकमेचा कर्ज पुरवठा 'यूपीआय'च्या माध्यमातून त्वरित केला जाऊ शकेल. कर्जदारांनी एकदा कागदपत्रे दिल्यानंतर पुन्हा कधीही कर्ज घेताना हीच कागदपत्रे आधारभूत ठरणार आहेत. त्यामुळे कृषी व छोट्या लघु उद्योग क्षेत्रातील ग्राहकांना कर्ज मिळवणे अत्यंत सोपे होणार असून त्यांना पुन्हा कागदपत्रे दाखवायला लागणार नाहीत व त्याची आजवर घेतलेल्या सर्व कर्जांची माहिती कर्ज देणाऱ्या संस्थांना सहजपणे उपलब्ध होणार आहे. दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याला कर्ज हवे असेल तर त्याची सर्व माहिती या यंत्रणेमध्ये सहकारी दूध संघाकडून उपलब्ध होऊन तो शेतकरी कशाप्रकारे कर्ज फेडू शकेल याचा ठोकताळा सहज उपलब्ध होईल. शेतकऱ्याच्या मालकीची एकूण जमीन, त्यावर त्यांनी घेतलेली गेल्या काही वर्षातील पिके व त्याचा आर्थिक व्यवहार सर्व माहिती यामध्ये उपलब्ध होणार आहे. परिणामतः बँकांनाही कर्ज वाटप करताना त्या शेतकऱ्याची सर्व माहिती तपशीलवार मिळणार आहे. एकूणच शेतकऱ्यांच्या व कर्ज देणाऱ्या बँकांच्या दृष्टिकोनातून ही संपूर्ण यंत्रणा अधिक कार्यक्षमपणे काम करेल अशी अपेक्षा आहे. या यंत्रणेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला गेल्यामुळे कर्ज मागणी केल्यापासून केवळ काही मिनिटांमध्येही कर्जाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होऊ शकेल असा अंदाज आहे. ज्या शेतकऱ्यांकडे स्वतःची जमीन नाही पण ते कोणाकडे तरी भाडेपट्ट्याने शेती करतात किंवा कसतात त्यांनाही या प्रक्रियेमध्ये सामावून घेऊन कृषी कर्ज सुलभरीत्या मिळेल याची व्यवस्था करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाच्या पैशाचा वापर योग्य प्रकारे केला जातो किंवा कसे याचीही माहिती या यंत्रणेमध्ये बँकांना किंवा कर्जदात्यांना उपलब्ध होणार आहे.

कोणताही शेतकरी किंवा शेतमजूर हा कर्ज घेण्यासाठी बँकेकडे गेला तर त्याला सुलभपणे कर्ज मिळणे खरोखरच अवघड किंवा कठीण आहे. मात्र या यंत्रणेच्या माध्यमातून या सर्व अडचणी दूर होऊन खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ विनासायास लाभेल अशी शक्यता निर्माण झाली आहे. एकूणच यात जास्तीत जास्त पारदर्शकता निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून ही यंत्रणा निश्चितच उपयुक्त ठरेल.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने सर्वसामान्य ग्राहक व जनतेसाठी व खातेदारांसाठी राबवलेल्या 'जनधन खाते-आधार-मोबाइल' ज्याला जॅम (JAM) असे संबोधले जाते त्याचा वापर करून युनिफाईड पेमेंट इंटरफेस म्हणजे यूपीआय याचा लाभ देशभरातील ग्राहक वर्ग घेत आहे. त्याचीच पुढची पायरी म्हणजे यूएलआय ही यंत्रणा असून भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक गतिमान करण्याच्या दृष्टिकोनातून ही जास्त उपयुक्त ठरेल अशा अर्थतज्ज्ञांचा दावा आहे. आज देशामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील, सहकार क्षेत्रातील तसेच खासगी क्षेत्रातील विविध बँका कृषी कर्ज देण्यासाठी एकमेकांशी मोठी स्पर्धा करत आहेत. अत्यंत कमी व्याजदराने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा होणे ही गोष्ट अजूनही फारशी सुलभ झालेली नाही. छोट्या शेतकऱ्यांना बँकांच्या पायऱ्या सतत झिजवाव्या लागतात. काही वेळा शेतकऱ्यांची फसवणूक होते असेही प्रकार अनेक वेळा उघडकीस आलेले आहेत. लहरी हवामानावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्याला वेळेवर आर्थिक मदतीचा हातभार लावणे ही काळाची गरज आहे. जरी गेली काही दशके छोट्या मोठ्या शेतकऱ्यांना कृषी कर्ज मिळत असली तरी ग्रामीण भागात त्याचा प्रसार आणि विस्तार अपेक्षेएवढा झालेला नाही. त्यामुळेच यूपीआयच्या धर्तीवर अशा प्रकारची कर्ज मंजुरीची एकात्मिक किंवा एकीकृत व्यवस्था निर्माण झाली तर खऱ्या अर्थाने कमी वेळामध्ये ग्राहकांना कर्ज उपलब्ध होणे शक्य होणार आहे. विशेषतः किरकोळ किंवा छोटी कर्जे घेणाऱ्यांना याचा लाभ होऊ शकेल. रिझर्व बँकेने अलीकडे सर्व सहकारी बँकांना त्यांच्या एकूण कर्जाच्या पन्नास टक्के कर्जे ही एक कोटी किंवा त्यापेक्षा कमी रकमेची असावीत असा आदेश दिलेला आहे. मे २०२४ अखेर देशातील सर्व बँकिंग क्षेत्राने एकूण २४ लाख कोटी रुपयांचे कृषी कर्ज शेतकऱ्यांना वाटले होते. त्यात दरवर्षी सरासरी दहा ते पंधरा टक्के वाढ होत आहे. त्यावरून देशातील कृषी कर्जातील मोठ्या संधीचा यामुळे अंदाज येऊ शकतो. त्यामुळेच छोट्या कर्जांच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बँकिंग क्षेत्रात स्पर्धा वाढत असताना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ही सर्व यंत्रणा कर्ज घेणारे व कर्ज देणारे या दोघांनाही उपयुक्त ठरेल यात शंका नाही. त्यामुळेच यूएलआयची सुविधा डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर व डिजिटल पायाभूत सुविधा यांच्यात मैलाचा दगड ठरेल असे वाटते.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आणलेली ही कर्जप्रणाली आकर्षक, पारदर्शक आणि वेगवान आहे याची अंमलबजावणी कशी होते हा खरा प्रश्न आहे. यामध्येच गैरप्रकार शिरणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. ऑनलाइन चाच्यांना (हॅकर) नवनव्या युक्त्या शोधून सावज गाठण्यात यश मिळत आहे. अशा मोहांना बळी पडू नका अशा आशयाच्या असंख्य जाहिराती सध्या वाचायला, बघायला मिळत आहेत, तरी देखील ऑनलाइन चाचे आपला डाव साधण्यात यशस्वी होत आहेत. अर्थ साक्षरता, साधन साक्षरता आणि तंत्रज्ञानाची डोळस साथ हेच चाच्यांना नामोहरम करू शकतात असे सध्याचे वास्तव आहे. शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारक ठरणाऱ्या यूएलआय या प्रणालीचे स्वागत करायलाच हवे. शेवटी काळाबरोबर चालणाऱ्या सकारात्मक बदलातूनच नवी पहाट उदयास येईल.

*(या लेखाचे लेखक मुक्त पत्रकार असून त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९३७३००५४४८ असून ई-मेल prasad.ghare@gmail.com आहे.)*



### उत्तम व्यवस्थापन देईल यश

# यशस्वी उद्योजक होण्याची सप्तपदी

**उद्योजक होणे हे काम अतिशय आव्हानात्मक आहे. यासाठी उद्योगातील सप्तपदीचा आवर्जून उपयोग करणे अत्यंत गरजेचे असते. जसे की, आपल्याला कायमस्वरूपी नफा देईल अशा मार्गाचा अवलंब करावा लागेल. रुळलेल्या वाटेवर चालण्यापेक्षा एखादे नवे उत्पादन किंवा सेवा क्षेत्र विकसित करण्याचा प्रयत्न करावा. आपल्या उत्पादनाची किंवा सेवेची यथार्थता तपासून घेणे अत्यंत गरजेचे आहे. याशिवाय उद्योगाच्या आखणीला रेखांकित करणे, उद्योग-व्यवसायाचे चांगले व्यवस्थापन करणे आणि योग्य वेळेस योग्य मुहूर्तमेढ करणे तसेच अर्थपुरवठा सातत्याने कसा उपलब्ध राहील याचा अंदाज घेत राहणे, या काही प्राथमिक गोष्टी केल्यास उद्योगात यश जरूर मिळू शकते.**

**- डॉ. सुधीर राशिंगकर**

उद्योजक होणे म्हणजे काही अवघड काम असते, ती आपली 'लाइन' नाही असे अनेकांना वाटते; पण जरा विचार केला आणि निरीक्षण केले तर आपल्यासारखेच असणारे पण उद्योगात यशस्वी झाले अनेक जण दिसतील. फक्त डोळे उघडे ठेऊन आणि 'मला उद्योजक व्हायचेच आहे' अशी ऊर्जा मनात बाळगली तर हे अशक्य नसते. त्याकरिता लग्नात असते तशी 'सप्तपदी'च खाली सांगितली आहे. ती अशी -

**१. नफ्यात येऊ शकेल अशा उद्योगाच्या एखाद्या मार्गाच्या शोधात राहा.**

तुम्ही निवडत असलेले उत्पादन किंवा सेवा हा तुमच्या उद्योग-व्यवसायाचा गाभा असतो. आणि तो निश्चित करणे हा एक महत्त्वाचा निर्णय असतो. जर असे उत्पादन किंवा सेवा सध्या अस्तित्वात नसली तरी त्यातील जोखीम कमी करण्याचे अनेक मार्ग असतात. खाली दिलेले निकष यांचा मार्गदर्शक वाटावेत म्हणून उपयोग करा. त्यामुळे तुम्हाला तुमच्या संभाव्य उद्योग-व्यवसायाच्या जमेच्या बाजू लक्षात येतील. आणि तुमच्या यशाचा मार्ग सुलभ करतील.

जसे- तुमचे उत्पादन किंवा सेवा समाजातील एखादी निकड किंवा समस्या सोडवणार आहे का? असे केल्याने तुमच्या विक्री किंवा विपणनाच्या खर्चात बरीच बचत होऊ शकते; कारण तुमचे संभाव्य नवीन ग्राहक अशांच्या शोधातच असतात. जरा विचार केला तर असे दिसेल की अशी बरीचशी उत्पादने किंवा सेवा समाजातील अशा आवडी निवडी किंवा गरजां मुळेच निर्माण झालेली असतात. आणि याला मर्यादा नसते. हेही पहा की हा एक नवा कल, नवी लहर किंवा उभरत्या उत्पादनाचा प्रकार आहे का? लहर असेल तर ती किती टिकेल याला मर्यादा असतात. अशा वेळी तिचा कमीत कमी वेळात फायदा मिळवणारे तुमचे उत्पादन किंवा सेवा हवी. त्यासाठी मजबूत अशा पायावर आपला उद्योग उभा करणे सोईचे असते.

तुमच्या संभाव्य बाजारपेठेला किती स्थैर्य आहे हेही पाहायला हवे. ते झपाट्याने वर किंवा खाली जाणारे नसावे.

कल हा दूरच्या पल्ल्याचा असू शकतो. तो लहरीसारखा लवकर वर खाली जाणारा नसतो. वाढती बाजारपेठ ही स्थिर असणारी,वाढती बाजारपेठ असते, बाजारपेठेतील स्पर्धा किती आहे,त्यांत वाढ होणार आहे का ती कमी होणार आहे, नवे स्पर्धक त्याच क्षेत्रात किती येऊ शकतील (कदाचित तुमचे उत्पादन किंवा सेवा पाहून) हेही पाहायला हवे. अशा स्पर्धेत टिकण्यासाठी तुमच्या उत्पादन किंवा सेवेचा दर्जा, त्यातील सातत्य आणि त्याची किंमत या निकषांना महत्त्व असते. यासाठी आपल्या उत्पादन किंवा सेवेचे असे काही वैशिष्ट्य निर्माण करायला हवे की ते संभाव्य स्पर्धेवरही मात करेल.

## २. एखादे उत्पादन किंवा सेवा क्षेत्र विकसित करा.

इथे उत्पादन म्हणजे केवल वस्तू किंवा पदार्थच नव्हे तर सेवा क्षेत्रही असू शकते. तुम्ही कशाची विक्री करणार आहात हे एकदा ठरले की ते स्वहस्ते आधी तयार करायचा प्रयत्न करा किंवा तसे करून देणारा मार्ग पहा. किंवा तुम्ही एखादा बाजारात तयार असलेले उत्पादन किंवा सेवा पहा, जी तुम्ही लगेच विक्रीसाठी घेऊ शकाल. जसे T शर्ट किंवा अन्य कपडे घाऊक विकत घेऊन त्यावर निरनिराळ्या चित्रांचे, संदेशाचे ठसे उमटवणे आणि मग ते विकणे हा एक व्यवसाय आहे. क्रिकेट किंवा अन्य खेळांच्या मोठ्या स्पर्धेत याना प्रचंड मागणी असते.

## ३. तुमच्या उत्पादनाची किंवा सेवेची यथार्थता तपासून घ्या.

पुढची पायरी म्हणजे आपल्या उद्योग-व्यवसायाच्या कल्पनेची यथार्थता तपासून घेणे. यात तुमचे उत्पादन किंवा सेवेची ग्राहकांना खरोखर किती गरज आहे हे तपासून घेणे. कित्येक वेळा आपणच त्यांच्यात अशी आवड निर्माण करू शकतो.

काही उत्पादने किंवा सेवा विशिष्ठ कालावधीत अधिक मागणीच्या असतात, जसे शालेय विद्यार्थ्यांना. विधार्थीनींना लागणारे साहित्य; पण ते शाळा सुरू व्हायच्या आधी कित्येक महिने तयार करून ठेवावे लागते. म्हणजे शाळा सुरू व्हायच्या सुमारास ते बाजारात आणता येते.

## ४. हे झाले की आपल्या उद्योगाच्या आखणीला रेखांकित करा. तिचा ढाचा लिहून काढा.

यानंतर आपल्या प्रायोजित उद्योग वा व्यवसायाच्या पूर्ण आराखडा लिहून काढा. त्यांत उत्पादन किंवा सेवा कोणती, त्याचे संभाव्य ग्राहक कोण, ते कुठे आहेत आणि त्यांच्यापर्यंत कसे पोहोचायचे, याला मानव संसाधने आणि आर्थिक गरजा किती आहेत, किती जागा लागेल आणि ती कुठे आणि कशी मिळवायची, किती माणसे कामासाठी लागतील, विपणन किंवा विक्री कशी करणार, एकूण खर्च किती येईल हे सर्व लिहून काढायला हवे. असा आराखडा पैशाची उभारणी करण्यासाठी आणि आपल्यालाच एकूण कामाचा आवाका लक्षात येण्यासाठी आवश्यक असतो.

## ५. यासाठी अर्थ पुरवठा कसा आणि कोठून मिळू शकेल याचा अंदाज घ्या.

पैसे किंवा अर्थ पुरवठा कसा आणि कुठून मिळवायचा हेही पाहायला हवे. त्यात आपले स्वतःचे पैसे किती घालू शकता हे पाहायला हवे. अन्य मार्ग म्हणजे आपले आप्त किंवा परिचित किती देऊ शकतात हे पाहणे. त्यासाठी तुमची तेवढी पत आणि त्यांना त्यांच्या पैशाची सुरक्षितता हे पाहणे महत्त्वाचे असते.

आता शासकीय, संभाव्य उद्योजकांना अर्थसहाय्य पुरवणाऱ्या योजना अमलात आल्या आहेत. यात विना तारण पैसे मिळू शकतात. बँका आता सुलभ अटीवर नवीन उद्योगांना कर्ज देऊ शकतात. लघु आणि मध्यम आकाराच्या व्यवसायाकरिता आता शासकीय अर्थपुरवठा योजना आहेत. त्याचाही उपयोग करून घेता येऊ शकतो. काही अर्थ पुरवठा करणाऱ्या अन्य संस्था किंवा व्यक्ती असतात; पण त्यांना त्यांच्या गुंतवणुकीच्या परतफेडीची खात्री पटवून द्यावी लागते.

## ६. आपल्या उद्योग-व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवा, सुरुवात करा.

हे झाले की आपल्या उद्योग-व्यवसायाचा श्रीगणेशा करण्याची वेळ येते. जशी एखादी भव्य इमारत टिकवायची असेल तर तिचा पाया भक्कम असावा लागतो आणि नंतर वरचे बांधकामही तसेच उद्योग-व्यवसायाचे असते. अगदी लहान प्रमाणावर चालू होऊन मोठे झालेले अनेक उद्योग-व्यवसाय आपल्याला नजर टाकली तर दिसतील. तसाच आपला असावा ही आपली इच्छा आणि आकांक्षा हवी. त्यासाठी 'शुभस्य शिघ्रम' हे तत्त्व पाळायला हवे कारण काय सांगावे, अन्य कोणी तशीच कल्पना लढवून आपला उद्योग-व्यवसाय करायची तयारी करीत असेल आणि तो तुमच्या आधी बाजारात पदार्पण करू शकेल.

## ७. आपल्या उद्योग-व्यवसायाचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे सांभाळा.

उद्योग किंवा व्यवसाय चांगला आणि दीर्घकाळ टिकणारा हवा तर त्याचे व्यवस्थापनही चांगले असावे लागते. एकखांबी तंबू उपयोगी नाही. काही आधीच अनुभव असलेली आणि काही तुम्हाला हवी तशी घडवून तयार केलेली माणसे त्याकरिता हवीत. उद्योजकाने सर्व कामे मीच करेन, माझा कोणावरही विश्वास नाही अशी मानसिकता ठेवली तर त्याच्या उद्योग-व्यवसायाच्या वाढीला मर्यादा येतील. त्याऐवजी मी नेता होईन आणि माझ्या हाताखाली मला पाहिजे ती कामे करणारी माणसे घडतील असे व्यवस्थापन मी निर्माण करेन अशी भूमिका घेतली तर तो यशस्वी उद्योजक होईल.

महाराष्ट्र उद्योजकता विकास महामंडळ उद्योजकता आणि उद्योजक वाढावेत म्हणून अखंड कार्यरत आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात त्याच्या शाखा आहेत. तिथे काही शेकडो उद्योग-व्यवसायांसाठीचे प्रकल्प अहवाल आहेत.

शिवाय उद्योजकांना मदतनीस ठरणाऱ्या शासकीय योजनांची माहिती तिथे मिळते. आपल्या जवळच्या त्याच्या शाखेत जाऊन आपण अधिक माहिती मिळवू शकता. त्यामुळे तुमचा वेळ आणि त्रास वाचेल आणि स्वतःचा उद्योग-व्यवसाय करण्याची प्रेरणा मिळेल, मदत मिळेल.

आसपास नजर टाकली तर यशस्वीरीत्या आपापले उद्योग-व्यवसाय चालवणारे अनेक दिसतील. त्यांनी अशीच वर दिलेली काही प्रक्रिया करून ते वाढवले आहेत. आपणही त्यापैकीच एक होऊ शकता. आपल्यात तशी क्षमता आहे याचा आत्मविश्वास वर दिलेल्या प्रक्रियेतून आपल्याला मिळू शकेल असे वाटते. त्यासाठी या दिवाळीच्या निमित्ताने माझ्या शुभेच्छा. आणि हेही लक्षात ठेवा की आपल्या अशा यशोगाथा उद्योजक मासिकाला अवश्य कळवा. त्यातून इतरांना प्रेरणा मिळेल.

*(या लेखाचे लेखक उद्योजक असून रोटेरियन आहेत. एमसीसीआयए, पुणेचे सीएसआर कमिटीचे अध्यक्ष असून त्यांचा ई-मेल sudhirr@vsnl.com असून भ्रमणध्वनी ९८२२०२२०१४ आहे.)*

■■

## चौकटीबाहेरचा विचार देऊ शकतो यश

# स्पर्धात्मक युगात एक पाऊल पुढे



**व्यावसायिक जीवन असो अथवा वैयक्तिक जीवन, प्रत्येक क्षेत्रात सध्या खूप स्पर्धा आहे. हे युग स्पर्धात्मक युग म्हणून ओळखले जाते. लोकसंख्या वाढल्याने प्रत्येक हाताला काम गरजेचं असल्याने स्पर्धेमध्ये भर पडताना दिसते. आपल्या स्पर्धकांपेक्षा आगळावेगळा विचार करून पुढचे पाऊल उचलले तरच यश-अपयशातील फरक समजू शकतो. नावीन्यपूर्ण आणि चौकटीबाहेरचा विचार करून उद्योग-व्यवसाय केला तर यशाचा मार्ग प्रशस्त होऊ शकतो.**

**- जीवन मुळे**

'आला सास (श्वास), गेला सास, जीवा तुझे रे तंतर (तंत्र)
अरे जगणं-मरणं, एक सासाचं (श्वासाचं) अंतर'

*(बहिणाबाईंची गाणी)*

मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध प्रतिभावंत कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी वरील चार ओळींतून मानवी जीवनाचं महान सत्य आणि तत्त्व अगदी सोप्या, सुलभ शब्दातून सांगितले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण सत्कारणी लावला पाहिजे. कृतज्ञता वृत्तीने कृतार्थ जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक काम करताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवून यशस्वी होण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे.

ज्याप्रमाणे 'जगणं-मरणं' यात फक्त एका श्वासाचं अंतर असते, त्याप्रमाणेच 'यश-अपयश' यांच्यामध्येसुद्धा फक्त 'एका पावलांचं' अंतर असते. नुकत्याच संपन्न झालेल्या पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत पुरुष १०० मीटर शर्यतीमध्ये यशस्वी ठरलेल्या स्पर्धकाने केवळ ०.००५ सेकंदाच्या वेळ अंतराने स्पर्धा जिंकली. जगात अशी अनेक उदाहरणे सापडतात, जेथे एक समान बिंदूवरून सुरुवात करूनही एखादी व्यक्ती, एखादा उद्योजक आपल्या स्पर्धकांपेक्षा 'अधिक' लवकर प्रगती करतो. या यशाचे गुपित त्या 'अधिक' (Extra) च्या पाऊल (प्रयत्न, वेगळेपणा, योगदान, कौशल्य, ज्ञान, दृष्टिकोन, इत्यादी) मध्ये असते.

हे 'अधिक (Extra) चे योगदान तुमची नवी ओळख निर्माण करण्यास कारण बनते. यामुळे तुम्ही इतरांच्या तुलनेत अधिक लवकर आणि अधिक चांगले यश मिळवू शकता. इतरांपेक्षा अधिक गतीने विकास करणे तुम्हाला शक्य होते. यामुळे तुम्हाला इतरांपेक्षा अग्रेसर (onward) आणि उच्चस्थानी (upward) राहणे शक्य होते.

'Extraordinary personality (असामान्य व्यक्तिमत्त्व)' आणि 'Ordinary personality (सामान्य व्यक्तिमत्त्व)' यांच्यामध्येही नेमका हाच फरक 'Extra (एक्स्ट्रा)' चाच असतो. ज्या व्यक्ती आपल्या व्यावसायिक, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात इतरांपेक्षा काही एक्स्ट्रा (अधिक, खास, वैशिष्ट्यपूर्ण, इतरांपेक्षा वेगळे) काम करतात, त्या व्यक्ती जगात असामान्य म्हणून ओळखल्या जातात. आपल्या कार्यक्षेत्रात इतरांपेक्षा एक पाऊल राहत आपल्या गुणवत्तेच्या बळावर आपलं वेगळेपण सिद्ध करून ते स्वतःचे खास स्थान निर्माण करतात. हे 'अधिक (Extra) चे कार्य त्यांची नवी ओळख निर्माण करते. यशाच्या मार्गावर वाटचाल करताना थोडासा जास्त (little extra) प्रयास त्रासाचा वाटला, तरी तो भविष्यात सफलता देणारा, नवजीवन देणारा असू शकतो. याच यशदायी तत्त्वाला इंग्रजीमध्ये 'extra mile' (अतिरिक्त मैल, एक अधिकचे पाऊल) पुढे जाणे म्हणतात.

'One of the most important principles of success is developing the habit of going Extra mile.' (अतिरिक्त मैल पुढे जाण्याची सवय विकसित करणे, हे एक महत्त्वाचे यशदायी तत्त्व आहे.) - (नेपोलियन हिल)

**व्यावसायिक यश मिळवण्यासाठी :** व्यावसायिक जीवन असो वा वैयक्तिक जीवन, प्रत्येक क्षेत्रात सध्या खूप स्पर्धा आहे. हे युगच स्पर्धात्मक म्हणून ओळखले जाते. आपल्या स्पर्धकांपेक्षा आगळावेगळा विचार करून पुढचे पाऊल उचलले तरच यश-अपयशातील फरक समजू शकतो. नावीन्यपूर्ण, चौकटीबाहेरचे विचार (out of box thinking) करून उद्योग-व्यवसाय केला तरच यशाचा मार्ग प्रशस्त होतो.

**ग्राहक सेवेसाठी एक पाऊल पुढे :** एक उद्योजक म्हणून तुमचे सर्वांत पहिले काम म्हणजे तुमच्याकडे येणाऱ्या प्रत्येक ग्राहकांचे सस्मित

चेहऱ्याने स्वागत करा. अनेक व्यवसायात हे कमी घडताना दिसते. उद्योजक/विक्रेता आणि ग्राहक यांच्यात परस्पर स्नेहाचा, विश्वासाचा पूल बांधण्यासाठी हे अत्यावश्यक असते. याबाबतीत तुम्ही इतरांपेक्षा एक पाऊल पुढे राहण्यासाठी खालील सेवा तत्त्वांची अंमलबजावणी करा, वेगळेपणाचा ठसा उमटवा.

सर्वसामान्य ग्राहकाला उत्तम, निरपेक्ष सेवा देण्याची बांधीलकी जपा. विनम्रता हा सेवेचा आत्मा आहे. अधिक चांगले ग्राहक संगोपन हे तुमचे ध्येय हवे. तसेच मूल्याधारित सेवेवर अधिक भर हवा.

सध्याच्या सेवेपेक्षा एक पाऊल पुढे कसे जाता येईल याचा विचार करा. त्यासाठी ग्राहकांच्या गरजा, अपेक्षा माहीत करून घेतल्या पाहिजेत.

ग्राहकांच्या अधिकाधिक समाधानासाठी नवे-निर्माणक्षम मार्ग शोधणे अधिक श्रेयस्कर ठरते. ग्राहकांना त्यांच्या अपेक्षाच्यावर आणि पलीकडे (above & beyond) देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची व्यवसायाप्रतिची बांधीलकी आणि निष्ठा वाढते.

- कोणत्याही व्यवसायात उत्तम मानवी संबंध नेहमीच महत्त्वपूर्ण ठरतात. त्यासाठी भावनिक नाते जोपासा. ग्राहकाला इतरांपेक्षा अधिक वैशिष्ट्यपूर्ण सेवा देण्याचा प्रयत्न करा. या कृती करताना आदर, शिष्टाचार, सेवाभाव यांचा विसर पडू देऊ नका. ग्राहकाला गृहीत धरू नका. ग्राहक उद्योजक/विक्रेत्यापेक्षा अधिक चाणाक्ष, स्मार्ट असतात.

उद्योग-व्यवसायात काही एक्स्ट्रा मिळवण्यासाठी प्रथम आपण काही जास्तीची गुंतवणूक करावी लागते. ही गुंतवणूक केवळ पैसा, कच्चा माल एवढ्यापुरतीच मर्यादित नसते. जरा चौकटीबाहेर जाऊन विचार केला तर एकविसाव्या शतकात उपलब्ध असलेले अनेक वैध मार्ग, क्रिया, पद्धती, जीवन कौशल्ये त्यासाठी तुम्हाला मदत करू शकतील. आपल्याला माहीत असेल की, 'यूनिकनेस' हा उद्योग-व्यवसायाचा 'यूएसपी' असतो. उत्पादन आणि सेवेचे 'मूल्यवर्धन', ब्रँडिंग याकामी महत्त्वाची भूमिका बजावतात.

दररोज सकाळी उठल्यावर स्वतःला विचारा, मी असे काय एक्स्ट्रा करू शकतो, ज्यामुळे माझा ग्राहक नेहमी मला लक्षात ठेवील? व्यवसायासाठी मला एकनिष्ठ राहील? त्यासाठी ग्राहक अपेक्षा ओलांडण्याबाबत कृतीशील आराखडा तयार करा.

**अपेक्षा ओलांडण्याचे मार्ग :** ग्राहकांच्या अपेक्षा कशा ओलांडायच्या आणि सेवा अधिक ग्राहककेन्द्रित कशाप्रकारे करणे शक्य आहे, यावर सहकाऱ्यांशी विचारमंथन करा. त्यासाठी पुढील मुद्दे तुम्हाला मार्गदर्शक ठरतील.

**अ. पुढाकार :** आपणहून (Proactive) ग्राहक गरजा किंवा समस्या निराकरण, मदत करण्यासाठी पुढाकार घ्या. ग्राहकांनी सांगण्यापूर्वी/तक्रार करण्यापूर्वी तुम्ही पूर्वानुमानाने कृती केल्यास ग्राहक राजा खूश होईल; कारण तुम्ही याप्रकारची सेवा आपणहून कराल यांची ग्राहक अपेक्षा ठेवता नाहीत.

**आ. कमीचा वायदा, जास्त देणार फायदा (अंडर कमिट, ओव्हर डिलिव्हर) :** आधी ग्राहकांच्या अपेक्षा वाढवून नंतर त्या पूर्ण न करण्यापेक्षा, सुरुवातीला कमीचा वायदा (आश्वासन) करून, प्रत्यक्ष देतेवेळी मात्र आधीच्या वायद्यापेक्षा जास्त देणे उत्तम असते. याबाबत सुप्रसिद्ध उद्योगपती नारायण मूर्ती म्हणतात, 'शब्द (आश्वासन) देताना थोडं कमी कबूल करा आणि प्रत्यक्ष देताना कबूल केल्यापेक्षा अधिक द्या.' यामुळे ग्राहकांच्या तक्रारी, नाराजीला स्थान उरत नाही. उलट अपेक्षेपेक्षा अधिक मिळाल्यामुळे ग्राहक सुखावतो. कमीत कमी पैशात जास्त समाधान, सेवा प्राप्त करण्याकडे ग्राहकांचा कल असतो. आपल्या गरजा कमीत कमी पैशात समाधानकारकरीत्या पूर्ण करू शकणाऱ्या उत्पादन/उत्पादकाला ते प्रथम प्राधान्य देतात.

ग्राहकांना अनपेक्षित आनंद आणि समाधान देऊ शकणाऱ्या अशा विविध सेवांचा अभ्यास आणि अवलंब करा. त्यासाठी तुमची नव-निर्माणवृत्ती, सर्जनशीलता, व्यासंग यांचा आधार घ्या. त्याला सेवेच्या मूल्यवर्धनाची जोड द्या. हे एक अधिकचे पाऊल तुम्हाला यशस्वी होण्यास मदत करील.

**अपेक्षापूर्तीचे सीमोल्लंघन, ग्राहकांचे समाधान :** या महिन्यात आपण विजयादशमी अर्थात दसरा सण साजरा करीत आहोत. विजयादशमी म्हणजे सीमोल्लंघनाचा दिवस. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा दिवस नवीन कार्य सुरू करण्यासाठी, कार्यपूर्तीसाठी शुभ मानला जातो. काही लोक पूर्वी केलेल्या संकल्पाची पूर्तता करण्यासाठीही या दिवशी सुरुवात करतात.

आपल्या कार्यक्षेत्रात इतरांपेक्षा एक पाऊल पुढे रहात आपल्या गुणवत्तेच्या बळावर आपलं वेगळेपण सिद्ध करून दाखवावे, स्वतःचे खास स्थान निर्माण करावे, असं अनेकांना वाटते. नव-उद्योजकही याला अपवाद नसतात. आपल्या ग्राहकाला इतरांपेक्षा अधिक चांगली सेवा देण्याचा ते वर्षारंभाला संकल्प करतात; परंतु त्यासाठी नेमकं काय करावं, कोणतं पाऊल उचलावं हे ठरवता येत नाही. उद्देश स्तुत्य असला तरी मार्ग सापडत नाही.

वर्षाच्या सुरुवातीला केलेला हा संकल्प दसरा जवळ आला, तरी संकल्पसिद्धीच्या दिशेने एक पाऊलही पुढे वाटचाल करत नाही. आपल्या क्षमतांपेक्षा (strength), आपल्या सीमा, मर्यादावर (weakness) अधिक लक्ष केंद्रित करण्याचा हा परिणाम असतो. आता अधिक वेळ वाया न घालवता, आपली ताकद, क्षमता (ज्ञान, कौशल्य, अनुभव) यांच्या जोरावर यंदाच्या दसऱ्याला 'सीमोल्लंघन' करा. विजयी होण्यासाठी कार्यपूर्तीच्या दिशेने आत्मविश्वासाने पावले टाका. तुम्ही सध्या ग्राहकाला ज्याप्रकारे सेवा देता, त्यांच्या अपेक्षाची पूर्तता करण्याचा प्रयत्न करता, त्यांच्या एक पाऊल पुढे जाण्याचा निश्चय करा. ग्राहकांच्या अपेक्षाच्या 'वर आणि पुढे' (above and beyond) सेवा देण्यासाठी काय करता येईल यांचा विचार करा. सध्याच्या स्पर्धात्मक युगात तुमचे आजचे ग्राहक पुढे टिकवण्यासाठी, अधिक समाधानी ठेवण्यासाठी आणि नवे ग्राहक मिळवण्यासाठी तुम्हाला ही पावले उचलणे अत्यावश्यक आहे, तरच तुमच्या उद्योग-व्यवसायांची प्रगती, अधिक भरभराट होऊ शकते. यादृष्टीने अधिक वेळ न घालवता आजच सुरुवात करा. यशस्वी भव!

*(या लेखाच्या लेखकांनी लिहिलेली उद्योजकता, व्यवस्थापन यासह इतर विषयांवरील एकूण १० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. लेखक शासकीय तंत्रनिकेतनचे माजी प्राचार्य आहेत. त्यांचा मो. क्र. ९८२३२३९३४० असून ई-मेल jeevanmuley@gmail.com आहे.)*

## जिद्द, सातत्य, संयम

# यशाचा गुरुमंत्र!



**आयुष्यात प्रत्येकालाच यशस्वी व्हायचे असते. मात्र, अनेकदा भरपूर कष्ट घेऊनही यशाचा मार्ग हुलकावणी देऊन जातो. यशस्वी होण्यासाठी जिद्द आवश्यक आहे. जे काम आपण करतोय त्यात प्रचंड सातत्य असायला हवे. थोड्याशा अपयशाने खचून न जाता पुन्हा तेवढ्याच उमेदीने उभे राहण्याचा संयम हवा. लक्ष विचलित न होता मार्गोत्क्रमण करत राहायला हवे. अपयशातून यशाकडचा प्रवास नक्कीच जीवनाची दिशा बदलून टाकू शकतो.**

**- प्रतिनिधी**

**अयशस्वीता ही यशस्वीतेच्या प्रवासातील मुख्य घटक आहे :**

मानव हा बुद्धिजीवी आहे, तो विचार करू शकतो, व्यक्त होऊ शकतो. या पृथ्वीतलावरील प्रत्येक व्यक्ती हा अद्वितीय आहे, सक्षम आहे, तो कोणतेही कार्य यशस्वीपणे करू शकतो पण चढउतार हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक जण चांगला काळ, आनंदी काळ अनुभवतो तसाच खडतर काळ, दुःखद काळ ही अनुभवतो.

बऱ्याच वेळेला आपल्या महत्त्वाकांक्षी कामात यश मिळवण्यासाठी आपण प्रयत्न करतो, कष्ट करतो, कठोर मेहनत घेतो पण यश मिळत नाही, अश्यावेळी बरेच जण आपले प्रयत्न थांबवतात आणि आता माझ्याकडून हे शक्य नाही म्हणून ते अति महत्त्वाकांक्षी काम सोडून देतात. मी अयशस्वी झालो असे म्हणून स्वतःच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह, शंका निर्माण करतात.

**अयशस्वी ते यशस्वी होण्यासाठी गुरुमंत्र :**

When we feel down, it feels like it's all over, that's when we need to be the most positive, brave and fearless.

जेव्हा आपण मनाप्रमाणे इच्छित परिणाम नाही मिळाले तर खूप निराश होतो, असे वाटते, आता सर्व संपले, खरे तर यावेळी आपणास सर्वांत जास्त सकारात्मक, धाडसी, नीडर राहण्याची गरज असते. कोणतेही काम असो, ते तडीस नेण्यासाठी योग्य नियोजन, अपार मेहनत करण्याची तयारी, कितीही अडथळे आले तरी न थांबता कार्यरत राहणे, हाती घेतलेल्या कामात सातत्य ठेवल्यास यश हे निश्चितच. खडक आणि पाणी यांच्या युद्धात नेहमी पाणी जिंकते, ते फक्त आणि फक्त सातत्याच्या जोरावर जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही हाती घेतलेल्या कार्यात तुम्ही अयशस्वी होत आहात तर खालील नमूद गोष्टी आत्मसात करा :

**१. जिद्द :** मी जे काम हाती घेतले आहे, ते काही झाले तरी, कितीही संकटे आली तरी, कठोर मेहनत घ्यावी लागणार असेल तरी, कोणीही कितीही motivate केले तरी, तुला हे जमणार नाही असे कितीही लोकांनी म्हटले तरी मी माझे काम यशस्वी करीन, पूर्ण करीनच ही जिद्द मनात बाळगा.

जिद्दीचे जबरदस्त उदाहरण म्हणजे दशरथ मांझी, त्यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर एक मोठा डोंगर फोडून रस्ता तयार केला. याचे मुख्य कारण, त्यांची पत्नी कुटुंबाकरिता पाणी आणण्यासाठी डोंगरावर गेली असता घसरून खाली पडली, तिला लवकर हॉस्पिटलला नेणे जरूरी होते पण डोंगर मध्ये असल्याने फिरून जावे लागल्याने वेळीच हॉस्पिटलमध्ये पोहोचू न शकल्याने त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला, हे इतर लोकाबरोबर होऊ नये म्हणून दशरथ मांझी यांनी सतत २२वर्ष मेहनत आणि जिद्दीने डोंगर फोडला.

**जिद्द :** स्वतःला सिद्ध करण्याचे सूत्र. जिद्द ठेवल्यास तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

**२. अयशस्वीतेत स्वतःला सावरण्याची कला :**

जेव्हा भरपूर कष्ट करून सुद्धा मी अयशस्वी होतोय अशी भावना मनात येताच तुम्हाला त्यावर मात करता आली पाहिजे. म्हणजेच वेळेत स्वतःला सावरण्याची कला शिकली पाहिजे.

ते कसे, तर तुम्ही आतापर्यंत जेही लोक अयशस्वीतेतून ते यशस्वी बनले त्यांच्याबाबत अभ्यास केला पाहिजे.

या जगात मी एकटाच नाहीये जो अयशस्वी होतोय, अजून मेहनत करून माझ्या कामात मी सातत्य ठेवल्यास मी निश्चितच यशस्वी होईन हा ठाम विश्वास मनात सतत तेवत ठेवला पाहिजे.

जेव्हा आपण खूप कष्ट करून, ते काम मध्येच सोडण्याचा निर्णय घेतो, त्यावेळेस खरेतर आपण यशस्वीतेच्या जवळ आलेलो असतो त्यामुळं Never Give Up.

**३. धीर ठेवा, ही वेळही जाईल :**

प्रत्येकालाच लगेच यशस्वी व्हायची घाई लागलेली असते; परंतु यशस्वी ही १०० मीटर शर्यत नसून लांब पल्ल्याची marathon शर्यत आहे, त्याकरिता आपणास दीर्घकाळ काम करायचे आहे ही मानसिकता आधी तयार केली पाहिजे.

या दीर्घ पल्ल्याच्या शर्यतीत मला धीर ठेवावा लागेल आणि असे वाटेल की या कामात खूप अडचणी, अडथळे येतात तेव्हा ही वेळही जाईल असा विश्वास

मनात सारखा जागृत ठेवला पाहिजे. ठोकर ही आपणास लागण्यासाठी नाही तर आपल्याला सावरण्यासाठी लागते.

अब्राहम लिंकन हे त्यांच्या जीवन प्रवासात अनेकदा अयशस्वी झाले, वयाच्या २२व्या वर्षी त्यांनी व्यवसाय सुरू केला पण ते अयशस्वी झाले, २३व्या वर्षी विधायक इलेक्शन हरले, २४व्या वर्षी परत व्यवसाय चालू केला त्यातही अयशस्वी झाले, २९व्या स्पीकरपदासाठी आणि ३१व्या एलेक्टरपदासाठी इलेक्शन लढले पण परत हरले आणि अयशस्वी झाले, नंतर ते अमेरिकेच्या उपराष्ट्रपती पदासाठी इलेक्शन लढले आणि परत एकदा अयशस्वी झाले, इतक्या वेळेस अयशस्वी झाल्यानंतरही ते तुटले नाहीत, आपली जिद्द हारले नाही, त्यांनी धीर ठेवला आणि ही वेळही जाईल असा विश्वास ठेवल्याने ५१व्या वर्षी अमेरिकेचे अध्यक्ष बनले, असा त्यांनी अयशस्वी ते यशस्वी प्रवास त्यांनी पूर्ण केला.

**४. तुमचे लक्ष्य बदलू नका, काम करण्याची पद्धत बदला :**

जेव्हा आपण एखादे लक्ष्य हाती घेतो त्यावेळेस एक रणनीती आखतो आणि मग त्यावर कृती करण्यास सुरुवात करतो. मग पुढे लक्षात येते या रणनीती नुसार काम करत असताना ही रणनीती अयशस्वी होताना दिसते तेव्हा बरेच लोक आपले लक्ष्य सोडून देतात आणि दुसरे लक्ष्य साध्य करण्यासाठी प्रयत्न सुरू करतात; पण असे न करता म्हणजेच आपले लक्ष्य न बदलता आपली रणनीती बदला आपली काम करण्याची पद्धत बदला.

जे तुम्हाला आतापर्यंत मिळाले आहे ते तुम्ही आतापर्यंत केलेल्या कामामुळे मिळाले आहे पण जर तुम्हाला जर अधिक परिणामकारक आणि अधिक यश मिळवायचे असेल तर तुम्ही आतापर्यंत जे केले नाही असे काहीतरी वेगळे करा

**५. अयशस्वी होण्याच्या भीतीवर मात करा :**

आपण एखादे कार्य हाती घेण्याआधी सुरवातीलाच मी अयशस्वी झालो तर अशी भीती आपण मनात निर्माण करतो. हेच खरे तर आपण हाती घेतलेल्या कार्यात अयशस्वी होण्याचे मुख्य कारण आहे असे पाहण्यात आले आहे.

तेव्हा जेव्हाही कोणतेही करू हाती घ्याल, हे काम मी करू शकतो, मी करीन, माझ्याकडून हे यशस्वी झाले आहे असा ठाम विचार करूनच सुरुवात करा. मग बघा अयशस्वी होण्याची भीती कशी पळून जाईल आणि पूर्ण आत्मविश्वासाने कार्य सुरू करून निश्चितच यशस्वीतेकडे कूच कराल नव्हे यश मिळवाल.

भीती ही खरी अस्तित्वात नसतेच, ही एक अदृश्य भिंत आपण आपल्या मनात निर्माण केलेली असते ही अदृश्य रुपी भिंत हिम्मत ठेवून मोडीस काढल्यास, यश निश्चितच समजा.

**६. अयशस्वीतेची कारणे आणि यशस्वी होण्याचे मार्ग :**

कोणतेही कार्य नीटपणे समजून न घेता इतर लोक त्यामध्ये यशस्वी आहेत म्हणून मी करतोय हे असफल होण्याचे प्रमुख कारण होय. असे न करता तुम्ही कोणत्या क्षेत्रात तज्ञ आहात हे जाणून त्या क्षेत्रात तुम्ही काम केले पाहिजे.

**आपले बलस्थान निवडून, आवडते क्षेत्र निवडा**

**कामात चालढकल :** बरीच लोकं अतिशय मोठी कामे, महत्त्वाकांक्षी कामे जोश मध्ये येऊन सुरू तर करतात; पण जसजसा वेळ पुढे सरकतो ते आपल्या कामात चालढकल करतात, हे सुद्धा कोणतेही काम असफल होण्याचे कारण आहे.

**चालढकल थांबवा, आजचे काम आज करा**

**सतत कार्यरत राहा :**

बरीच लोकं काम सुरू केल्यानंतर, त्यात ते बरोबर लक्ष देत नाहीत, त्यामुळे ते काम ते रोज, दररोज मन लावून करत नाहीत त्यामुळे त्यांच्या कामात नेहमी दिरंगाई, चुका होतात आणि मी ते काम टाळू लागल्याने कामात व्यत्यय येतो. त्यामुळे आपण हाती घेतलेल्या कामात संपूर्णतः झोकून दिले पाहिजे, समरस झाले पाहिजे असे केल्यास तुम्ही सतत कार्यरत राहाल 'आराम हराम है' तुम्हाला अतिशय कठीण वाटणाऱ्या गोष्टींशी समरूप झाल्यास यश हमखास मिळालेच म्हणून समजा.

मी विजयी होणारच हा विश्वास तुम्हाला विजयपथावर नेईल मी यशस्वी होणारच असा निर्धार अयशस्वी होऊ देणार नाही.

एकदा अयशस्वी, दोनदा अयशस्वी, अनेकदा अयशस्वी होऊनसुद्धा प्रयत्न न सोडणे हाच खरा यशस्वी होण्याचा गुरुमंत्र आहे. ■■




*मा.श्री. राजेंद्र निंबाळकर, व्यवस्थापकीय संचालक, MSSIDC, मुंबई व श्रीमती फरोख मुकादम, अतिरीक्त व्यवस्थापकीय संचालक, MSSIDC, मुंबई यांना सप्टेंबर २०२४ चा उद्योजक मासिकाचा अंक देताना MCED चे समन्वय विभाग प्रमुख श्री. विवेक तोंडरे व श्री.सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर सोबत श्री.संजय बांगर उद्योग उपसंचालक, पुणे दिसत आहेत.*



## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

**"नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा", असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेस मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी व मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारने या योजनेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय नुकताच घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख, तर सेवा व कृषिपूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. योजनेचे लक्षांक सहापटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५४१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे ३०,००० घटकांना होणार आहे. या सुधारित तरतुदींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे, तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वयंरोजगार उभारण्यासाठी आजच मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमाचा (सीएमईजीपी) लाभ घ्या व उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार करा. - संतोष बोर्डे**



मा.श्री. उदय सामंत
उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)**

**Chief Minister Employment Generation Programme**

**स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!**

**उद्देश** : राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात

स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद :**

**पात्रता अटी :** राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक) ५ वर्षांची अट शिथिल.

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :** उत्पादन व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु. ५० लाख व सेवा/कृषिपूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. १० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :** अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**पात्र मालकी घटक :** वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले स्वयंसहाय्यता गट.

**प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :**

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयंगुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के कर्ज पुरवठा बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका, सुधारित तरतुदींनुसार काही जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका, इत्यादीमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थी निवड :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष सीएमईजीपी पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजुर प्रकल्प किमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्षे कालावधीसाठी लॉक इन राहील. प्रकल्प यशस्वीरीत्या अंमलबजावणी झाल्याची खात्री लावल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :** योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी निःशुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषिपूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकसित होणारे, क्षमतावृद्धी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

**(अ) सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा; - शैक्षणिक पात्रतेसंबंधीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे; - आधार कार्ड; - नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल; - जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी.प्रवर्गासाठी); - विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक); - वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना; - स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTAL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे :**

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाइन अर्ज सादर.

- महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

- जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

- बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिन मनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश. अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजुर रकमेचे पूर्ण कर्ज वितरण.

- प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

- ३ वर्षे प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

**सुधारित शासन निर्णय ११/११/२०२२ :** मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशींनुसार, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**मुद्दा क्र.१ (ब) पात्र मालकी घटक :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

**सुधारित तरतूद :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी,

भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी).

**मुद्दा क्र. २ (२.१)** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल. घटकाचा प्रवर्ग/प्रभाग - अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

**घटकाचा प्रवर्ग/प्रभाग :**

| घटकाचा प्रवर्ग/प्रभाग | घटकाची स्वगुंत-वणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| घटकाचा प्रभाग | --- | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरित प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

**मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.



मा.श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह,
विकास आयुक्त (उद्योग)

**मुद्दा क्र. ३ (३.२.२) :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत तरतूद.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवास खर्च, पुरस्कार, कार्यशाळा/शिबीर/प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याकरिता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरिता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षाची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल.

**उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना/उपक्रम :**

१) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम, २) सुधारित बीज भांडवल योजना, ३) जिल्हा उद्योग केंद्र योजना, ४) महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ५) केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ६) महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना, ८) निवासी/अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, ९) काथ्या प्रोत्साहन योजना, १०) औद्योगिक अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९. ११) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योगक्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना. १२) उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने/दाखले ऑनलाइन उपलब्ध होण्यासाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी (CMEGP) योजनेचे लक्षांक पाचपटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५५० कोटींची तरतूद करण्यात आली असून याचा लाभ सुमारे २५,००० घटकांना होणार आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :**

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**

**विकास आयुक्त (उद्योग),** उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**राज्यस्तरीय समन्वय : हेल्पलाइन नंबर :** २२ २२०२ ३९१२.

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)

**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ** - www.maha-cmegp.gov.in
www.di.maharashtra.gov.in

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)* ■■



### जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग राज्यासोबत करार

# मुंबईत जर्मन भाषेचे मोफत प्रशिक्षण

**कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग राज्यासोबत करार केला आहे. यानुसार बाडेन वुटेनबर्ग येथे विविध ३० प्रकारच्या क्षेत्रांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. त्याकरिता आवश्यक असणारे जर्मन भाषेचे प्रशिक्षण गोथ्ये या जर्मनीतील प्राधिकृत संस्थेमार्फत मोफत दिले जाणार आहे.**

**- प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील होतकरू तरुणांना जर्मनीत रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. यासाठी आवश्यक असलेले जर्मन भाषेचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम शालेय शिक्षण विभागाने हाती घेतला असून मुंबईमध्ये १५ केंद्रांवर असे प्रशिक्षण मिळणार असल्याची माहिती, मुंबई प्रादेशिक विद्या प्राधिकरणच्या प्राचार्य मनीषा पवार यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

राज्य शासनाने कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग राज्यासोबत करार केला आहे. यानुसार बाडेन वुटेनबर्ग येथे विविध ३० प्रकारच्या क्षेत्रांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. त्याकरिता आवश्यक असणारे जर्मन भाषेचे प्रशिक्षण गोथ्ये या जर्मनीतील प्राधिकृत संस्थेमार्फत दिले जाणार आहे. या प्रशिक्षणासाठी राज्यातील तरुणांनी नोंदणी करण्याचे आवाहन राज्य शासनामार्फत करण्यात आले आहे.

पथदर्शी तत्त्वावर सुरुवातीला महाराष्ट्र शासनातर्फे बाडेन वुटेनबर्ग राज्याला १० हजार कुशल मनुष्यबळ तातडीने पुरविण्यात येणार आहे. यासाठी आरोग्य सेवा, आदरातिथ्य, विविध क्षेत्रातील कारागीर आदी ३० क्षेत्र निवडण्यात आली आहेत. जर्मनीमध्ये रोजगाराच्या संधीसाठी इच्छुक तरुणांनी नोंदणी केल्यानंतर त्यांना राज्य शासनामार्फत मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणाकरिता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांनी सुरू केलेल्या https://www.maa.ac.in/GermanyEmployment/ या लिंकवर नोंदणी करता येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. जर्मन भाषा शिकविण्यासाठी आवड असणाऱ्या शिक्षकांनी सुद्धा आपली नोंदणी करण्याचे आवाहन या निमित्ताने करण्यात आले आहे.

आजचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान वापरण्याचे युग आहे. नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून युवा पिढी एकापेक्षा अधिक कौशल्य विकास प्राप्त करू शकते. जर्मनी येथे संधी मिळालेले विद्यार्थी स्वतःच्या उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण कामगिरीने आपल्या देशाची, राज्याची वेगळी ओळख निर्माण करू शकतील.

प्रादेशिक विद्या प्राधिकरण अंतर्गत मुंबई जिल्ह्यातील पुढील १५ केंद्रांवर जर्मन भाषा प्रशिक्षण दिले जाणार आहे. श्रीराम वेल्फेअर सोसायटी हायस्कूल, अंधेरी पश्चिम; आई.ई.एस. न्यू इंग्लिश स्कूल, वांद्रे पूर्व; पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले पूर्व; वेसावा विद्यामंदिर, अंधेरी पूर्व; सेठ चुनीलाल दामोदरदास बर्फीवाला हायस्कूल, अंधेरी पश्चिम; सेंट कोलंबा स्कूल, ग्रँड रोड; डी.एस. हायस्कूल, सायन पश्चिम; वालीराम बेहरूमल मेलवाणी मॉडेल हायस्कूल, ग्रँड रोड पश्चिम; अहिल्या विद्यामंदिर, काळाचौकी; एस.एस.एम.एम.सी.एम. गर्ल्स हायस्कूल, काळाचौकी; ओ.एल.पी.एस. हायस्कूल, चेंबूर; वाणी विद्यालय हायस्कूल, मुलुंड पश्चिम; पंत वालावलकर माध्यमिक विद्यालय, कुर्ला पूर्व; सेठ धनजी देवशी राष्ट्रीय शाळा, घाटकोपर पूर्व आणि संदेश विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, विक्रोळी पूर्व या ठिकाणांचा समावेश आहे. ■■




## महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)

# उद्योजकतेच्या दीपस्तंभाची ३६ वर्षांची वाटचाल

**महाराष्ट्र हे औद्योगिक विकासात देशातील अग्रगण्य राज्य आहे. महाराष्ट्र हे देश-विदेशातील उद्योजक, गुंतवणूकदारांच्या पसंतीचे राज्य ठरले आहे. राज्याच्या उद्योजकता विकासासाठी १९८८ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या (एमसीईडी) स्थापनेस या ऑक्टोबरला ३६ वर्षे पूर्ण झाली आहेत. गतकाळात संस्थेने राज्याच्या उद्योजकता विकास कार्यात भरीव योगदान दिले आहे. संस्थेने प्रशिक्षण दिलेले व यशस्वीपणे आपला उद्योग, व्यवसाय चालवत असलेले हजारो उद्योजक राज्याच्या कानाकोपऱ्यांत विखुरलेले आहेत. अशा या उद्योजक घडविणाऱ्या संस्थेच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा.**

**- संतोष बोर्डे**



**श्री. बी. टी. यशवंते,**
कार्यकारी संचालक, एमसीईडी
तथा उद्योग सहसंचालक

**संस्थेची रचना :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) ही संस्था राज्याच्या उद्योजकता विकासासाठी महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केलेली, उद्योग संचालनालयाच्या अंतर्गत स्वायत्त संस्था आहे. १ ऑक्टोबर १९८८ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेचा हेतू शास्त्रोक्त प्रशिक्षणाच्या माध्यमातून उद्योजकीय संस्कृती रुजविणे व संवर्धन करणे; कौशल्य व प्रशिक्षणाच्या माध्यमातून मनुष्यबळ विकास, उद्योजकतेविषयक माहिती संकलन आणि या क्षेत्रात संशोधन करणे हा आहे. या संस्थेच्या संचलनासाठी मा. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची कार्यकारिणी असून मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (एमएसएसआयडीसी) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीचे कामकाज चालते. संस्थेच्या दैनंदिन कामकाजासाठी कार्यकारी संचालक यांच्याकडे संस्थेच्या संचालनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या दोन्ही समित्यांमध्ये विविध औद्योगिक विकास महामंडळांचे सनदी अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असून त्यांच्या मार्गदर्शनानुसार व दिशानिर्देशनानुसार संस्थेचे कामकाज चालते. सध्या मा.श्री.दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से., विकास आयुक्त (उद्योग) तथा अध्यक्ष, सुकाणू समिती, एमसीईडी; मा.श्री.राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (एमएसएसआयडीसी) तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, एमसीईडी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.बी.टी.यशवंते, उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल सुरु आहे.

**उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम संचालन :** संस्थेचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे असून ६ विभागीय कार्यालये व ३६ जिल्हा कार्यालये आहेत. स्थापनेपासून आजतागायत संस्थेने अनेक उपलब्धी मिळविल्या आहेत. संस्थेला नावीन्यपूर्ण प्रशिक्षणासाठी २०२० चा स्कॉच पुरस्कार मिळाला असून, २०१४ मध्ये मॅक्सेल अवॉर्डने गौरविण्यात आले आहे. संस्थेच्या अनेक वरिष्ठ प्रेरक प्रशिक्षकांना (प्रकल्प अधिकाऱ्यांना) उद्योजकता प्रशिक्षण क्षेत्रातील शिखर संस्था ईडीआयआय, अहमदाबाद; विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार यांच्यातर्फे 'उत्कृष्ट प्रेरक प्रशिक्षक' म्हणून गौरविण्यात आले आहे.

**'उद्योजक' मासिक :** संस्थेच्या विविध उपक्रमांप्रमाणे समाजाची मानसिकता उद्योजकतेला पोषक व्हावी, उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्यांना माहिती, मार्गदर्शन

व प्रेरणा देण्याच्या दृष्टीने संस्था 'उद्योजक' मासिक प्रकाशित करते. यामध्ये उद्योग, व्यापार, व्यवसायाद्वारा स्वयंरोजगार मिळविण्यासाठी प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, शासनाच्या ध्येयधोरणानुसार व मार्गदर्शक तत्त्वानुसार समाजातील युवक-युवतींचे उद्योजकीय मन घडविण्याचा गेल्या ३४ वर्षांपासून प्रयत्न करीत असून या मासिकाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली 'उद्योजक' मासिक दर्जेदार लेख, गुणवत्तापूर्ण माहिती चार रंगांमध्ये छपाई करून प्रकाशित करीत आहे. उद्योजकता या विषयास वाहिलेले आणि उद्योजकीय मन घडविणारे हे मराठीतील एकमेव मासिक आहे.

**'उद्योजक' मासिकाचा गौरव :** या मासिकाच्या दिवाळी विशेषांकांना एम.डी. भांड स्मृती प्रतिष्ठान, अहमदनगर यांचा 'प्रेरणा पुरस्कार', मुंबई वृत्तपत्र लेखक संघाचा दिवाळी विशेषांकांना अनेक वेळेस 'दर्पण' पुरस्कार मिळालेले आहेत. नुकताच मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांचा २०२० च्या दिवाळी विशेषांकासाठी 'जगन्नाथ शंकरशेठ स्मृती सर्वोत्कृष्ट अंकाचा पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक संतोष बोर्डे यांनी स्वीकारला.

**उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम :** 'उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम' प्रशिक्षण वर्गामध्ये प्रत्येक प्रशिक्षणार्थीच्या आशा, अपेक्षा त्यांचा प्रशिक्षणात प्रवेश घेण्यामागील हेतू समजावून घेतला जातो.त्यानंतर उद्योजकतेचा पर्याय का व कशासाठी यावर विचारमंथन, मार्गदर्शन केल्यावर उद्योग निवडीपासून उद्योग-व्यवसाय सुरु करण्यापर्यंतचे विविध टप्प्यांसंबंधी मार्गदर्शन केले जाते. याटप्प्यांमध्ये ज्यामध्ये उद्योगाची निवड, बाजारपेठ पाहणी, व्यवस्थापन, कर्मचारी, कच्चा माल, जागा, इमारत, तंत्रज्ञान, प्रकल्प अहवाल, विविध योजना, अर्थसाह्य, उद्योगाची अस्थायी नोंदणी यापासून उद्योग कसा सुरु करावा येथपर्यंत आणि सुरु झालेला उद्योग यशस्वीपणे कसा चालवावा येथपर्यंतचे मार्गदर्शन विविध तज्ज्ञ व्याख्याते, प्रकल्प अधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी यांच्या माध्यमातून करण्यात येते. सिद्धी प्रेरणा प्रशिक्षण (Achievement Motivation Training) माध्यमातून स्वयंपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी या प्रशिक्षण कार्यक्रमाची मदत होते. उद्योगाला भेटी देण्यात येते. प्रकल्पाची निवड, त्यांच्याकडून प्रकल्प अहवाल तयार करून घेणे, प्रकल्पाची नोंदणी करणे अशी उद्योग उभारणीची प्रक्रिया सुरू करण्यात येते. उद्योजकतेचे आणि उद्योजकतेचे संस्कार रुजविण्याचे कार्य प्रकल्प अधिकारी जरी काम करीत असला तरी या संपूर्ण प्रक्रियेत तो त्या भावी उद्योजकाच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने दिशादर्शकाच्या भूमिकेत वावरत असतो. अशा प्रकारच्या विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून आतापर्यंत १६ लाखांहून अधिक प्रशिक्षणार्थींनी याचा लाभ घेतलेला आहे. हे प्रशिक्षण कार्यक्रम निवासी वा अनिवासी स्वरुपात होत असतात. तसेच छत्रपती संभाजीनगर मुख्यालयाच्या ठिकाणी सुसज्ज वसतिगृहाची व्यवस्था असून नागपूर येथेही ही सेवा उपलब्ध आहे. अशा प्रकारे प्रशिक्षण कार्यक्रमांतून प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थींपैकी सुमारे ३५ ते ४० टक्के लाभार्थी यशस्वीपणे आपला उद्योग-व्यवसाय सुरु करतात असा संस्थेचा अनुभव आहे. ज्यांनी उद्योग-व्यवसाय केला नाही तरीही ते ज्या क्षेत्रात जातात तेथे त्यांचे वेगळेपण सिद्ध करतात हा संस्थेचा अनुभव आहे. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे हे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**राष्ट्रीय पातळीवरील अग्रेसर संस्था :** ईडीआयआय, अहमदाबाद उद्योजकतेच्या क्षेत्रातील शिखर संस्था असून एमसीईडी संस्थेसारख्या देशातील इतर विविध राज्यांत १८ उद्योजकता विकास प्रशिक्षण संस्था आहेत; पण या सगळ्यांमध्ये स्वयंनिर्भर झालेली आणि अनेकविध आगळे वेगळे उपक्रम राबविणारी एमसीईडी ही संस्था राष्ट्रीय पातळीवर क्रमांक एकची संस्था आहे. या संस्थेचा दैनंदिन खर्च व कर्मचाऱ्यांचे पगार हे संस्थेला प्रशिक्षण कार्यक्रमांच्या उत्पन्नातून भागवावे लागतात. यासाठी शासन संस्थेला कुठल्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देत नाही. हे कार्यक्रम संस्थेला बाजारपेठेत स्पर्धा करून मिळवावे लागतात. अशा प्रकारे संपूर्णपणे स्वायत्त असलेली आणि स्वयंपूर्ण झालेली शासन पुरस्कृत अशी ही एकमेव संस्था आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने एससी-एसटी हब अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे; नाबार्ड अंतर्गत (ग्रामीण उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम-आरईडीपी, ड्रिप); सिडबी (ईडीपी, आरआयपी); एनआयएमएसएमई, केव्हीआयसीअंतर्गत (ग्रामीण उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, पीएमईजीपी योजनेचे सर्वेक्षण); कॉयर बोर्ड, आसाम उद्योग संचालनालयाचे निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी.

**राज्य पातळीवरील प्रशिक्षण कार्यक्रम :** उद्योग संचालनालयामार्फत "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१६" अंतर्गत १८ दिवसीय "निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम" तसेच "तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम" राबविण्यात आले. नगरविकास विभागातर्फे एनयूएलएमअंतर्गत उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम; महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाअंतर्गत अन्नप्रक्रियेवर आधारित उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमन; उद्योजकता विकास मिशन जालना-२०११-१२ आणि २०१२-१३ राबविण्यात आले. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसाठी व्यवस्थापन विकास कार्यक्रम; १९९९ मध्ये एम्प्लॉयमेंट कार्यालयातील नवीन वर्ग-१ व वर्ग दोनच्या नियुक्त अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम; मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (CMEGP) एमएसएसआयडीसी पुरस्कृत क्राफ्ट बाजार- २०११-१२ चे आयोजन केले असून ऑल इंडिया इंडस्ट्रियल सेनसस-२००१ व २००७ मध्ये संस्थेने योगदान दिले आहे.

**संस्थेला पुरस्कृत प्रशिक्षण कार्यक्रम देणाऱ्या प्रमुख संस्था :** यामध्ये प्रामुख्याने उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन; महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी); एससी-एसटी हब, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय (एनएसआयसी-एनएसएसएच), भारत सरकार; राष्ट्रीय सौर ऊर्जा संस्था (एनआयएसई); विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार (डीएसटी); राष्ट्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय (एनआय-एमएसएमई); अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालय (एमएफपीआय), भारत सरकार; ईडीआयआय, अहमदाबाद; नाबार्ड; खादी ग्रामोद्योग आयोग (केव्हीआयसी); क्वायर बोर्ड; बार्टी, पुणे; लघु उद्योग विकास बँक (सिडबी); महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (एमएसएसआयडीसी); कृषी विभाग; आदीवासी विभाग; वित्तीय विकास संस्था; नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (एनआयडी); जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा नियोजन समितीअंतर्गत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम; जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (डीआरडीए); महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी); महिला आर्थिक विकास

महामंडळ (माविम); उद्योग संचालनालय, आसाम शासन आदी.

**प्रमुख प्रशिक्षण कार्यक्रम :** १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (आरईडीपी); २ ते १२ आठवडे कालावधीचे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (ईडीपी); तांत्रिक उद्योजकता विकास कार्यक्रम (टीईडीपी); महिलांसाठी उद्योजकता विकास कार्यक्रम (डब्ल्यूईडीपी); २ आठवड्यांचा स्वयंरोजगारासाठी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम (डीपीएसई); ग्रामीण उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम (रुरल ईडीपी); उद्योजकांसाठी सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण; ६ महिने कालावधीचा इन्क्युबेशन प्रशिक्षण कार्यक्रम; २ ते २४ आठवड्यांचा उद्योजकता कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम (ईएसडीपी); तीन दिवसीय उद्योजकता परिचय कार्यक्रम; फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम, व्यवस्थापन विकास कार्यक्रम (एमडीपी); संस्था विकास कार्यक्रम (ओडीपी) इत्यादी.

**विविध शाखांनिहाय तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण / कौशल्यावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण :** यामध्ये वस्त्रोद्योग, हातमाग, गार्मेंट, कृषी व अन्नप्रक्रिया, वाहन व अभियांत्रिकी, अभियांत्रिकी, प्लास्टिक, रबर, औषधी व रसायन; इंडस्ट्री ४.०, ऑटोमेशन, रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल, ई-व्हेइकल, सौर ऊर्जा; पॅकेजिंग, प्रिंटिंग व लेबलींग; फाऊंड्री, दूध व दुग्धजन्य पदार्थ, चर्मोद्योग, सुगंधीद्रव्य उत्पादने, बांबूवर आधारित उद्योग, काथ्या प्रक्रिया, कॉस्मेटिक अँड हर्बल; मनोरंजन व चित्रपट निर्मिती; कार डिझायनिंग अँड डेकोरेशन, आर्किटेक्चर अँड इंटेरिअर डिझाईन इत्यादी.

संस्थेचे प्रशिक्षण कार्यक्रम हे निवासी व अनिवासी स्वरूपाचे असून प्रत्यक्ष वा ऑनलाइन पद्धतीने होतात. संस्था पुरस्कृत व अपुरस्कृत प्रशिक्षणाच्या माध्यमातून चालवली जाते. प्रशिक्षणार्थींची संख्या कमीत कमी २० व जास्तीत जास्त ४० पर्यंत असून उद्योजकता परिचय कार्यक्रमासाठी ७५ पर्यंत मर्यादा ठेवण्यात आली आहे. प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी संस्थेकडे ईडीआय-आय, अहमदाबाद व निसबूड या संस्थेतून प्रशिक्षण घेतेलेले २५ प्रेरक प्रशिक्षक असून ३९५ कार्यक्रम आयोजक आहेत. १६८५ अभ्यागत व्याख्याते असून ३५० संस्था एम्पॅनेल झालेल्या आहेत. तसेच १६५० पेक्षा जास्त शैक्षणिक संस्थांमध्ये उद्योजकता विकास कक्ष (ईडी सेल) ची स्थापना झालेली आहे. याशिवाय आयडीईएमआय, सीएफटीआरआय, आयआयपी, सिपेट, आयजीटीआर, सीएलआरआय, सीएफटीआय, टाटा पॉवर यांच्याशी तांत्रिक प्रशिक्षणासाठी सहकार्य करार झालेले आहेत.

ऑनलाइन ट्रेनिंग प्रोग्रामच्या आयोजनासाठी पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे डिजिटल स्टुडिओ सुरू केला असून नागपूर, नाशिक, अमरावती व नांदेड येथील काम प्रगतीपथावर आहे. एमसीईडी व उद्योग संचालनालयाच्या अधिकाऱ्यांसाठी ऑनलाइन ओरिएंटेशन कार्यक्रम राबविण्यात आला आहे. राष्ट्रीय संस्था जसे ईडमी, मुंबई; आयआयपी, मुंबई; सिपेट, औरंगाबाद; आयजीटीआर, औरंगाबाद; सीएफटीआरआय; म्हैसूर यांच्यासोबत तांत्रिक प्रशिक्षणाबाबत सहकार्य करार करण्यात आले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, औरंगाबाद आणि अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे यांच्यासोबत विद्यार्थ्यांसाठी उद्योजकतेवर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस आहे. एमसीईडीने आपले नवीन पोर्टल www.mced.co.in सुरू केले आहे.

**उद्योजकता विकासासाठी नवीन पर्यायी मार्ग :** ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करणे, अपुरस्कृत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, समूह विकास कक्ष, ई-उद्योजक, प्रकल्प सल्ला व सहकार्य कक्ष, होतकरू उद्योजकांसाठी इन्क्युबेशन अँड मेंटॉरिंग सपोर्ट; विद्यापीठांच्या सहकार्याने शैक्षणिक अभ्यासक्रमांसोबतच उद्योजकतेचे प्रशिक्षण देणे आदी.

**"निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम" :** "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१६" अंतर्गत १८ दिवसीय "निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम" तसेच "तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम" राबविण्यात आले असून या प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल स्कॉच अवॉर्ड २०२० ने गौरविण्यात आले. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) आदी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

**उद्योजक निवास :** मागील ३-४ वर्षात एमसीईडीने मोठ्या प्रमाणात निवासी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी एमसीईडीच्या विस्तारीत वसतीगृहाच्या इमारतीचा निश्चितच फायदा होत आहे. डिजिटल क्लासरूममुळे जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातून तज्ज्ञ येथे मार्गदर्शन करत आहेत.

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (CMEGP) :** "नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा", असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे.

**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) अंतर्गत महाराणी सईबाई सारथी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम :** ही संस्था कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत कलम ८ अन्वये नॉन-प्रॉफिट सरकारी कंपनी म्हणून स्थापन आहे. समाजसुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावावरून या संस्थेचे नाव ठेवण्यात आलेले आहे. सारथीची स्थापना मराठा, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा, कुणबी समुदाय आणि महाराष्ट्रातील कृषीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांचे सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक विकास करण्यासाठी आणि संस्थेमध्ये क्षेत्रांचा समावेश आहे. संशोधन, सरकारची धोरणे, प्रशिक्षण इ. आणि ग्रामीण जनतेस मार्गदर्शन, विशेषतः जे शेतकरी शेतीवर अवलंबून असतात त्यांच्यासाठी मार्गदर्शन करणे. सदर उद्योजकता प्रशिक्षणामध्ये जास्तीत जास्त सारथीच्या लक्षित गटातील (मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा- -कुणबी) उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामध्ये १) बीड, २) गडचिरोली, ३) वाशीम, ४) नाशिक, ५) सोलापूर, ६) सातारा, ७) पुणे, ८) कोल्हापूर. ९) रत्नागिरी. १०) पालघर. ११) नागपूर. १२) नांदेड १३) छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीनुसार निवड केलेल्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण सारथीच्या लक्षित गटातील (मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी) उमेदवाराकरिता एमसीईडी मार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण देत आहे.

**पंतप्रधान विश्वकर्मा योजना :** पंतप्रधान विश्वकर्मा ही केंद्रीय क्षेत्र योजना १७ सप्टेंबर २०२३ रोजी पंतप्रधानांनी कारागीर आणि कारागीरांना शेवटपर्यंत समर्थन देण्यासाठी सुरू केली होती जे त्यांच्या हातांनी आणि साधनांनी काम करतात. या योजनेत १८ व्यापारांमध्ये गुंतलेले कारागीर आणि कारागीर समाविष्ट आहेत, उदा. सुतार (सुथार/बढाई), बोट बनवणारा, चिलखत बनवणारा, लोहार (लोहार), हातोडा आणि साधन किट बनवणारा, कुलूप

तयार करणारा, सोनार (सोनार), कुंभार (कुम्हार), शिल्पकार (मूर्तिकार, दगड कोरणारा), दगड तोडणारा, मोची (चर्मकार) / शूस्मिथ / पादत्राणे कारागीर, गवंडी (राजमिस्त्री), बास्केट/चटई/झाडू बनवणारा/कोयर विणकर, बाहुली आणि खेळणी बनवणारा (पारंपारिक), नाई (नाई), हार घालणारा (मलाकार), धुलाई (धोबी), शिंपी (दरजी) आणि फिशिंग नेट मेकर यांना एमसीईडीमार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण देत आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) :** अनुसूचित जाती युवक-युवतींनां उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम एमसीईडी मार्फत राबविण्यात येत असतात.

**रॅम्प (RAMP) :** महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रामध्ये नवीन रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या क्षमता वाढीसाठी २ महत्त्वाकांक्षी सामंजस्य करार केले. राष्ट्रीय उद्योजकता आणि लघुउद्योग विकास संस्थेसह नियोक्ता महासंघ व भारतीय उद्योग संघासोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांमुळे उद्योगांच्या वाढीस वेग येणार आहे, तर जागतिक बँक व सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय, भारत सरकार यांचा सहयोग असलेल्या रॅम्प कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी तब्बल १३ औद्योगिक संघटनांसोबतही करार करण्यात आले. योग्य कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची उपलब्धतता ही सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना भेडसावणारी मोठी समस्या आहे. या समस्येवर मात करण्यासाठी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने २२ ऑगस्ट २०२४ रोजी नियोक्ता महासंघ (ईएफआय) आणि भारतीय उद्योग संघ (सीआयआय) यांच्यासोबत सामंजस्य करार केला. या कराराद्वारे पुढील वर्षभरात महाराष्ट्रातील १०,००० नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी अल्प कालावधीचे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांना नियुक्ती-प्रशिक्षण-उपयोजन या मॉडेल अंतर्गत सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रात रोजगार दिला जाईल. एमसीईडी मार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण देत आहे.

**काथ्या उद्योग धोरण २०१८ :** काथ्या व काथ्यावर आधारित उत्पादकांना राज्यात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC) ही नोडल एजन्सी असून, कोकणात मोठ्या प्रमाणात नारळाचे उत्पादन घेण्यात येते व दरवर्षी त्यामध्ये वाढ होताना दिसते. राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत काथ्या उद्योगाचा विकास नगण्य असून, कच्च्या मालाच्या मोठ्या प्रमाणावरील उपलब्धतेमुळे काथ्या उद्योगाच्या वाढीसही वाव भरपूर आहे. राज्यातील औद्योगिक विकास व वातावरण अधिक सक्षम करण्यासाठी व जागतिक स्पर्धात्मक होण्यासाठी तसेच या उद्योगाची जागतिक स्तरावर मान्यता मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्याने आपल्या वेळोवेळी जाहीर औद्योगिक धोरणामध्ये काथ्या धोरणाला विशेष महत्त्व दिले आहे.

**कौशल्य व उद्योजकता विकास :** काथ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व सेंट्रल कॉपर रिसर्च इन्स्टिट्यूट अल्लेपी, केरळ यांच्यामार्फत उद्योजकांच्या गरजांनुसार अद्ययावत अभ्यासक्रम तयार केले जातील आणि या संस्थांमार्फत उद्योजकता विकास, व्यवस्थापन, व्यावसायिक व तांत्रिक कौशल्याशी संबंधित विविध कार्यशाळा व प्रशिक्षणांचे आयोजन निवासी व अनिवासी पद्धतीने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अल्लेदी (केरळ) येथे आयोजित करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. या प्रशिक्षणासाठी तसेच उद्योगासाठी लागणारे आर्थिक व तांत्रिक साहाय्य देण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजनांचा समन्वय करण्यात येईल.

**प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (PMFME) :** कृषिप्रधान भारत देशात मोठ्या प्रमाणात शेतीमाल प्रक्रिया न केल्याने वाया जातो. यात प्रामुख्याने नाशवंत भाजीपाला आणि फळांचा समावेश असतो. हे नुकसान टाळण्यासाठी या मालावर प्रक्रिया करणे गरजेचे आहे. मात्र, यासाठी लागणारे मार्गदर्शन व गुंतवणुकीची माहिती नसल्याने शेतकरी कानाडोळा करतात. शेतमालाची गुणवत्ता व पोषक मूल्य वाढवून ते निर्यातक्षम केले, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होऊ शकते. या हेतूनेच केंद्र शासनाने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेची सुरुवात केली आहे. याविषयी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितचा (LIDCOM) उपक्रम २५ हजार युवक-युवतींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण :** चर्मकार समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुविधा मिळणे आवश्यक आहे. याच हेतूने महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा (लिडकॉम) स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लिडकॉम आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) यांच्यात चर्मकार समाजातील युवक-युवती आणि महिलांना उद्योजकता विकास आणि स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण पुढील ३ वर्षे २५ हजार युवक-युवतींना स्वयंरोजगाराची संधी मिळणार आहे.

वरिष्ठ व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाखाली एमसीईडी संस्था प्रशिक्षण क्षेत्रातील उत्तुंग शिखर गाठण्यासाठी विविध पर्यायांचा शोध घेऊन श्री.बी.टी.यशवंते, कार्यकारी संचालक, एमसीईडी तथा उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या नेतृत्वाखाली वाटचाल करीत असून भारतातील अग्रगण्य संस्थांमध्ये तीचे नांव घेतले जाईल याबद्दल शंकाच नाही.

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४० २०७८७७९ आहे.)*



*श्रीमती चेतना मोरे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांचेसोबत प्रशिक्षणाच्या प्रस्तावाबाबत चर्चा करून त्यांना सप्टेंबर २०२४ चा उद्योजक मासीकाचा अंक देत असताना श्री. सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर तसेच सोबत जिल्हा प्रकल्प समन्वयक श्री. विनोद तुपे व श्री. एस. एन. जावळेकर, विकास शाखा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर दिसत आहेत.*



यशोगाथा

**सतीश पवार**

संस्थापक,
स्टर्लिंग सिस्टीम्स

# हार नहीं मानूंगा...।

**‘कैसे आकाश में सूराख नहीं हो सकता, एक पत्थर तो तबीयत से उछालो यारो’ प्रख्यात हिंदी कवी दुष्यंत कुमार यांचा हा शेर स्टर्लिंग सिस्टीम्सचे संस्थापक सतीश पवार यांच्या बाबतीत चपखलपणे लागू होतो. सुखाची नोकरी सोडून व्यवसायाला सुरुवात करताना पहिल्याच टप्प्यात कर्जबाजारी झालेले सतीश आज पूर्णतः कर्जमुक्त होऊन आपल्या व्यवसायात स्थिरावले आहेत. कंपनीचा हळूहळू विस्तार सुरू असून विविध क्षेत्रात ते सेवा देत आहेत; पण हा प्रवास एवढा सोपा नव्हता. सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा ते यशस्वी कंपनीचा संस्थापक या प्रवासाचे टप्पे उलगडून सांगणारा हा लेख.**

**- सुधीर साबळे**

युवा उद्योजक असणाऱ्या सतीश पवार यांची यशोगाथा नव्याने व्यावसायिक क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या मंडळींना दिशा देणारी ठरणार आहे. आपण जेव्हा नोकरीत असतो तेव्हा सगळे उत्तम सुरू असते. वेळच्या वेळी पगार होत असतो, चार पैसे शिल्लक पडत असतात

कधी आपण आपल्याला आवडणाऱ्या तंत्रज्ञानावर काम करणारी कंपनी सुरू करावी, व्यवसाय करून पाहावा, असे जर डोक्यात आले तर मात्र, सगळीच आर्थिक गणिते बिघडून जातात. आपण सुरू केलेला व्यवसाय यशस्वी करायचाच, अशी महत्त्वाकांक्षा आपोआपच जागी होते. मग ते करण्यासाठी आवश्यक असणारे सगळे गुण म्हणजे, जिद्द, चिकाटी इथपासून ते अगदी मार्केटिंग, विक्री, पडेल ते काम करण्याची तयारी सुरू होते; पण इतके करून जर तो व्यवसाय फेल झाला तर मात्र, होणारा मनस्ताप, झालेले आर्थिक नुकसान, अशा एक नाही तर अनके गोष्टी मनात घर करतात आणि त्यामुळे मन विचलित होऊन जाते. स्टर्लिंग सिस्टिम्स या कंपनीचे सर्वेसर्वा असणारे सतीश पवार यांचा अनुभव देखील तसाच आहे.

कॉम्प्युटर सायन्समध्ये एम.एस्सी. ची पदवी घेतल्यानंतर पुण्यातल्या नावाजलेल्या आयटी कंपनीमध्ये त्यांची चांगल्या पदावर नियुक्ती झाली होती. नोकरी उत्तम सुरू होती, नवनवे तंत्रज्ञान शिकायला मिळत होते, अनुभवात दररोज नवी भर पडत होती; पण काही वर्षातच नोकरीला रामराम ठोकून स्वतःची सॉफ्टवेअर कंपनी सुरू करण्याचे धाडशी पाऊल सतीश यांनी टाकले होते.

**अन् या क्षेत्राकडे ओढा निर्माण झाला...**

ती सन २०१२ मधीली गोष्ट असेल, तेव्हा ऑगमेंटेड रियॅलिटीचे क्षेत्र हे भारतामध्ये फार मोजक्या लोकांना माहित होते. त्यामुळे त्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत निर्माण झालेल्या आकर्षणापोटी ते त्याच्या प्रेमात पडले. इतकेच नाही तर या क्षेत्रात काम करणारी कंपनी उभी करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. लहान मुलांसाठी आभासी जगाचा वापर करून तंत्रज्ञानावर आधारित ‘ए टू झेड’ पर्यंतच्या इंग्रजी आद्याक्षरांची ओळख करून देणारे एक पुस्तक तयार करण्याचे सतीश यांनी निश्चित केले होते. आपल्या ‘स्टर्लिंग सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड’ या कंपनीच्या माध्यमातून सुमारे ५० लाख रुपये खर्चून त्यांनी हे पुस्तक तयार केले. दक्षिण मुंबईमध्ये त्याचे प्रकाशन देखील केले, हा भाग उच्चभ्रू मंडळींचा आहे, त्यामुळे या पुस्तकाची येथे चांगली विक्री होईल, असा विश्वास त्यांना होता. त्यामुळे पहिल्याच वेळी पुस्तकाच्या तब्बल सहा हजार प्रती तयार केल्या गेल्या. हे पुस्तक तयार करण्यासाठी त्यांनी आवश्यक असणारे पैसे उभे करण्यासाठी त्यांनी जवळची मित्र मंडळी, पतसंस्था यांची मदत घेतली. आपला हा प्रोजेक्ट शंभर टक्के यशस्वी होईल, असा दांडगा विश्वास त्यांना होता, म्हणूनच की काय त्यांनी या प्रकल्पासाठी १३ जणांची टीम तयार केली. पुस्तक तयार झाले, त्याचे जोरदार लॉन्चींग झाले; पण त्याला अपेक्षित असणारा प्रतिसाद मिळाला नाही. पुस्तक लॉन्चींगच्या दोन दिवसांमध्ये सर्वच पुस्तके विकली जातील व देणेकरांचे सर्व पैसे आपण परत करू असे वाटत असताना, दोन दिवसात सहा हजार पैकी केवळ २६ पुस्तकांची विक्री झाली. त्यामुळे प्रोजेक्ट करण्यासाठी घेतलेले पैसे कसे द्यायचे, याचे डोक्यावर असलेले टेन्शन पुढे वाढत चालले होते. ही पुस्तके विकण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू होता; पण त्याला काही केल्या यश मिळत नव्हते. कोणताही मार्ग जेव्हा दिसत नव्हता, तेव्हा पुन्हा नोकरीमध्ये

जाण्याचा विचार सतीश यांच्या डोक्यात घोळू लागला होता.

आता काय करायचे हा विचार डोक्यात सुरू असताना सतीश यांनी ते ज्या कंपनीत काम करत होते, त्या कंपनीचे चेअरमन आनंद देशपांडे यांची भेट घेऊन त्यांना आपली कैफियत सांगितली. त्यावर त्यांनी सतीश यांना मोलाचा सल्ला दिला.

**स्वतःची कंपनी सुरू करण्याचा विचार नव्हता; पण...**

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करताना आपण स्वतःची कंपनी सुरू करावी, असे ध्येय सतीश यांनी ठेवले नव्हते; पण ते घडण्याच्या एक कारण निमित्त ठरले. सतीश यांनी बारामती येथून बीसीएस पदवीचे शिक्षण पूर्ण केले, तेव्हा तिन्ही वर्ष ते टॉपर राहिले होते. त्यानंतर पुण्यात त्यांना फर्ग्युसन महाविद्यालयात एमएस्सीला प्रवेश मिळाला. यावेळी एक गोष्ट त्यांना प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रात्यक्षिक आणि थिअरीचे ज्ञान यामध्ये फरक होता. एमएस्सीचे शिक्षण घेताना सतीश यांनी पुन्हा एकदा बीसीएस्सी कॉम्प्युटर सायन्सचा अभ्यास केला होता. पुण्यातला फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असल्यामुळे इथल्या स्पर्धेच्या जगात आपण टिकलो पाहिजे, आपण मागे पडता काम नये, अशी त्यांची कायम भावना असायची. कॉम्प्युटरचे शिक्षण घेत असताना आपण तांत्रिकदृष्ट्या सक्षम असायलाच हवे, या विचाराने सतीश यांच्या मनात उचल खाल्ली होती. सेकंड सेमिस्टरला विजय गोखले सरांच्याकडे त्यांनी डिझायनिंग ऑफ ऑपरेटिंग सिस्टिम्स चा क्लास लावला, त्यामधून त्यांना भरपूर काही शिकायला मिळाले होते. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात पुढे जाण्याचा मार्ग त्यांना तिथेच गवसला. कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांचा पूर्णपणे बदलून गेला. एमएस्सीला असताना सतीश यांना पुण्यातील पर्सिस्टंट कंपनीत नोकरी मिळाली; परंतु माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करण्यासाठी, नोकरी मिळविण्यासाठी त्यामध्ये विशेष स्किलसेट असणे आवश्यक आहे व यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपण तयार केले पाहिजे, असे त्यांना मनापासून वाटत होते. माहिती-तंत्रज्ञानाच्या बाजारपेठेला नेमके काय हवे आहे, ते त्यांना शहरामध्ये येण्याच्या आधीच समजायला हवे, या ध्येयातून सतीश यांना ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण संगणकाचे शिक्षण देण्याच्या ओढीने पुरते झपाटले होते आणि यासाठीच त्यांनी पर्सिस्टंटमध्ये जॉईन होण्यापूर्वी स्वतः मास्टर्सचे विद्यार्थी असताना बारामतीमध्ये विद्यार्थ्यांना ऑपरेटिंग सिस्टिम्स इंटर्नल्स शिकविण्याचा श्रीगणेशा केला. बारामतीमध्ये 'स्टर्लिंग स्कुल ऑफ कॉम्प्युटर सायन्स'ची सुरुवात अशी झाली. नोकरी करता करता शनिवार-रविवार हा उपक्रम सुरू होता, त्यामधून सतीश यांना आनंद मिळत होता. याच काळात त्यांच्याकडे बारामतीच्या 'एमआयडीसी'मधून काही प्रोजेक्ट देखील यायचे, व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देण्यासाठी या प्रोजेक्ट्सचा उपयोग होत होता. त्यांचे हे काम नोकरी सांभाळून अर्धवेळ स्वरूपात सुरू होते. या कामातली त्यांची रुची वाढत होती, म्हणून की काय त्यांनी २०११ मध्ये हे काम पूर्णवेळ करण्याचा निर्णय घेतला होता. ज्या ठिकाणी नोकरी सतीश यांची नोकरी सुरू होती, तिथे त्यांनी 'लाँग लिव्ह'वर (दीर्घ रजेवर) जाण्याचे ठरवले. नव्या मुलांना घडवण्याचा त्यांच्या विचाराने गती घेतली होती, त्यासाठी त्यांच्याकडून हा सगळा खटाटोप सुरू झाला होता. मुलांना अपेक्षित असणारे ज्ञान मिळत नव्हते, त्यामुळे त्यांना घडवण्यासाठी, त्यामध्ये उत्तम प्रकारचे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशातून हे काम सुरू झाले होते. मुलांनी प्रॅक्टिकली सक्षम व्हावे, यासाठी हा सगळा घाट त्यांनी घातलेला होता. ९ नोव्हेंबर २०११ रोजी त्यांनी ही कंपनी सुरू केली, तेव्हा हळूहळू कामे मिळण्यास सुरुवात झाली होती, त्यामुळे आता आपण नोकरीमधून बाहेर पडावे आणि पूर्ण वेळ व्यवसायाकडेच लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. कंपनीकडे कामे सुरू होती; पण त्यामधून अपेक्षित असणारे पैसे मिळत नव्हते; पण आता आपण यामध्ये उतरलो आहोत तर काहीतरी नवा प्रयोग करायला हवा, असा विचार सतीश यांच्या मनात सुरू होता. तेव्हा ऑगमेंटेड रियॅलिटी (आभासी जगाचे) क्षेत्र नव्याने येऊ घातले होते.

त्यामुळे यानंतर २०१४ पासून कंपनीने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कामे पुन्हा घ्यायला सुरुवात केली. हातात आलेले कोणतेही काम उत्तम प्रकारे करायचे, हे ध्येय ठेवल्यामुळेच अगदी अल्पावधीत पुन्हा यांच्याकडील कामाचा ओघ मोठ्या प्रमाणात वाढत गेला. त्यामुळे बंद पडलेली व्यवसायाची गाडी पुन्हा एकदा रुळावर येऊ लागली. काम वाढत होते, त्यामधून पैसे जमा होत गेले, सगळ्यात पहिल्यांदा आपण ५० लाख रुपयांच्या कर्जातून मुक्त व्हायचे हे निश्चित केल्यामुळे देणेकरी मंडळींचे पैसे त्यांनी देऊन टाकले. आर्थिक स्थिती बळकट होऊ लागली होती; परंतु या दीड-दोन वर्षाच्या काळामध्ये व्यवसायामध्ये अतिशय मोठे अनुभव मिळाले. ऑगमेंटेड रियल्टी (आभासी जगाचे) तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेली ३० लाख रुपये किमतीची सहा हजार पुस्तके विकली गेलीच नाहीत व शेवटी पुस्तके मोफत दिली. ग्राहकाला काय हवे हे न पाहता आपल्याला आवडणाऱ्या व तंत्रज्ञानाच्या प्रेमात पडल्याची इतकी मोठी किंमत वयाच्या पंचविशीत चुकवावी लागली होती. पुस्तके मोफत वाटल्यानंतर त्यासाठी घेतलेले कर्ज मात्र पुन्हा नवीन काहीतरी सेवा ग्राहकांना देऊनच पैसे कमवून फेडावे लागणार होते, याची पूर्ण कल्पना होती. व त्यातूनच ते कर्ज फेडले. व त्या ५० लाखांचा खड्डा कायमस्वरूपी माझ्यासोबत राहिला. सर्व कर्ज फेडून झाल्यानंतर घरच्यांना किती कर्ज फेडले हे त्यांनी सांगितले.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांसाठी सॉफ्टवेअरची निर्मिती करण्याचे काम सतीश यांच्या कंपनीला मिळाले, त्याच्याबरोबरच काही खासगी क्षेत्रातील कंपन्यांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांच्या कंपनीला काम दिले, त्यामुळे कंपनीची स्थिती भक्कम होत गेली. मोठे कर्ज झाल्यावर कंपनी बंद करण्याची वेळ आल्यानंतर आज कंपनीमध्ये जवळपास १२५ कर्मचारी काम करत आहेत. हा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे.

*(या लेखाचे लेखक वरिष्ठ पत्रकार असून विविध नियतकालिकांसाठी विविध विषयांवर लिखाण करीत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९४२१०८००७२ असा आहे.)*

■■




छोटी बचत, मोठी स्वप्ने

**भिमाई**

**स्वयंसहायता महिला बचतगट**

शेतमजूर ते यशस्वी उद्योजक,
'तेजस'ची उत्पादने सातासमुद्रापार

# मुसळीने दिला जगण्याचा आधार

**शेतमजूर महिला ते यशस्वी उद्योजिका होण्याची किमया सुनगावच्या महिलांनी साधली आहे. त्यांनी उत्पादित केलेली तेजस मुसळी पावडर आज गावाच्या सीमा ओलांडून सातासमुद्रापार परदेशातही पोहोचली आहे. आर्युवेदिक गुणवत्ता असणाऱ्या मुसळीच्या उत्पादनाने महिलांच्या आयुष्याला कलाटणी दिली आहे.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

कधीकाळी दिवसाकाठी ५० रुपयांसाठी शेतमजूर म्हणून राबणाऱ्या महिला आज लाखो रुपयांची उलाढाल करत आहेत. बुलडाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातल्या सुनगाव येथील भिमाई स्वयंसहायता महिला बचतगटाच्या शेतमजूर महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून हे यश मिळवले आहे. थोडी बचत होईल, पैसा मागे पडेल या हेतूने गावातील १० महिलांनी एकत्र येत बचत गटाची स्थापना केली. दरमहा १०० रुपये बचत करण्यास सुरुवात केली. गरजेप्रमाणे अंर्तगत कर्ज देऊ लागल्या.

### शेतीचे ज्ञान व्यवहारात

महिलांना शेती व्यवस्थापनाचे ज्ञान अनुभवातून प्राप्त झालेले होतेच. याचाच फायदा त्यांना उद्योगातही झाला. सुरुवातीच्या काळात या महिला बटाईने १ एकर शेतात मुसळीची लागवड करत होत्या. लागवड केलेली मुसळी काढून थेट व्यापाराला देत होत्या. मुसळीचे फायदे महिलांना माहीत नव्हते. महिला मुसळीची लागवड करत असल्याची माहिती जळगाव जामोदच्या कृषी विज्ञान केंद्राला मिळाली. त्यांनी या महिलांच्या उत्कर्षासाठी मदतीचा हात पुढे केला. त्यांना मुसळीच्या विविध चाचण्या करत त्याची गुणवत्ता महिलांना समजावून सांगितली. मुसळीच्या लागवडीपुरते मर्यादीत न राहता स्वतः त्याची विक्री करण्याबाबत मार्गदर्शन केले. मग महिलांना ५ दिवसांचे प्रशिक्षणही दिले. मुसळीची पावडर कशी करावी, सुकलेली मुसळी कशी विकावी, त्याचे आकर्षक पॅकेजिंग कसे करावे याबाबत सविस्तर माहिती दिली. केवळ एवढ्यावरच न थांबता मुसळी उत्पादनाच्या उद्योगासाठी बँकेकडून कर्ज घेण्यासही मदत केली. त्याचा महिलांनी फायदा घेतला. संपूर्णपणे व्यावसायिक दृष्टिकोन ठेवत मुसळीचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली. मुसळी व्यापाऱ्यांना न देता भांडवल गुंतवून पावडर करण्याची चक्की, स्टिकर, डबे, अन्न व औषधी प्रशासनाचा परवाना, उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र काढले.

### थक्क करणारा प्रतिसाद

महिलांनी मोठी गुंतवणुक केली, मुसळी पावडर तयार केली; पण ही उत्पादने विकायची कुठे हा प्रश्न सुरुवातीला होता. मेहकरमध्ये एकदा एकदिवसीय प्रदर्शन भरले होते. प्रदर्शन नेमके





कसे असते, त्यात आपली उत्पादने कसे ठेवावी याबाबत बचत गटाच्या सदस्यांना काडीमात्र माहिती नव्हती. मात्र, ही अडचणही कृषिविज्ञान केंद्राने सोडवली. त्यांच्या मदतीने गटाच्या अध्यक्ष विजयमाला वानखेडे यांनी मेहकर येथे पहिल्यांदा प्रदर्शनात आपली उत्पादने विक्रीसाठी ठेवली. उत्पादनाचे पोस्टर कसे लावावे, माल कसा रचवा हे विजयमाला येथेच शिकल्या. माल विकल्यावर पेसे ठेवण्यासाठी पर्स लागते, हेसुद्धा त्यांना माहिती नव्हते. एका पिशवीत त्या विक्री झालेल्या मालाची रक्कम ठेवत गेल्या. कृषी विज्ञान केंद्राच्या सदस्यांनीच ग्राहकांना मुसळीचे महत्त्व समजावून सांगितले. बघता-बघता ६ तासांत विजयमाला यांचा सगळा माल संपला. पिशवी पैशांनी गच्च भरली होती. नंतर हे सर्व पैसे माजले तर तब्बल ३५ हजारांचा माल विक्री झाला होता. हा आनंद गगनात मावत नव्हता. मेहकरच्या प्रदर्शनाने बचतगटाचा आत्मविश्वास वाढवला. बचतगटाच्या माध्यमातून सुनगावच्या महिला महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेदला जोडल्या गेल्या. वेगवेगळ्या प्रदर्शनात त्यांचा सहभाग वाढला. केवळ जळगाव जिल्हा नाही तर परराज्यात अगदी जम्मू-काश्मिरपर्यंत या महिला आपली उत्पादने घेऊन पोहोचल्या.

### सर्व कामे महिला करतात

मुसळीसाठी उष्ण, दमट हवामान तसेच मध्यम व कमी पावसाचा प्रदेश गरजेचा आहे. योग्य जमिनीच्या निवडीनंतर जमिनीची मशागत केली जाते. जून महिन्यात मुसळीची लागवड करण्यात येते. तण व्यवस्थापन, खत व्यवस्थापन करून सहा ते सात महिन्यांनी मुसळीची काढणी करावी लागते. त्यानंतर मुळांना वेगळे करून पाण्याने धुऊन घ्यावे लागते. मुळांची साल काढून उन्हात सुकवणे, काढणी झालेल्या मालाला थंड खोलीत स्टोअर करावे लागते. मुसळीच्या मुळांपासून पावडर तयार करावी लागते. यासाठी त्यांच्याकडे चक्की आहे. यानंतर वजनानुसार पावडर पॅक करणे, त्यावर लेबल लावणे, नंतर मागणीप्रमाणे कुरिअरमार्फत माल पाठववा लागतो. ही सर्व कामे बचत गटातील महिला करतात.



### प्रदर्शन ते परदेशवारी

उमेदच्या प्रदर्शनातून परराज्यात आपल्या उत्पादनाचा ठसा उमटविणाऱ्या सुनगावच्या महिलांचे मुसळी उत्पादन आता लंडनवारीसाठी सज्ज झाले आहे. लंडनला तब्बल ६५ किलो मुसळी निर्यात होणार आहे. सध्या मुसळीचा भाव १०० ग्रॅमला ३०० रुपये तर किलोला ३००० रुपये आहे. आयुर्वेदिक कंपन्या, वैद्य यांच्याकडून मुसळीची पावडर, खोड खरेदी करतात. याचा लाभ महिलांना होतो.

### शेतमजूर ते मालक झालेल्या महिला

विजयमाला कैलास वानखेडे-अध्यक्ष, उज्जवला बाळू हिवराळे-सचिव, शितल संदेश वानखेडे-उपाध्यक्ष, अनिता सुनील वानखेडे, छाया प्रकाश हिवराळे, रमाबाई मिलिंद वानखेडे, जिजाबाई सिद्धार्थ वानखेडे, जनाबाई पांडुरंग वानखेडे, अर्चना राहुल तायडे, वर्षा गौतम तायडे या भिमाई स्वयंसहायता महिला बचतगटाच्या सदस्य आहेत.

### गुणकारी सफेद मुसळी

सफेद मुसळी ही देखील एक शक्तिवर्धक वनस्पती आहे. आयुर्वेदानुसार ही एक उपयुक्त औषधी मानली जाते. सफेद मुसळीच्या मुळांमध्ये पोटॅशियम, प्रथिने, कार्बोहायड्रेट, फायबर, मॅग्नेशियम, कॅल्शियम इत्यादी घटक मुबलक प्रमाणात आढळतात. सफेद मुसळीच्या सेवनाने आरोग्याला अनेक फायदे मिळतात. स्त्रियांमध्ये होणाऱ्या ल्युकोरिया या आजारामध्ये सफेद मुसळी उपयुक्त ठरते. यासह असंतुलित आहार किंवा इतर कारणांमुळे शरीरातील कमजोरी दूर करण्यासाठीही मुसळीचे सेवन फायदेशीर ठरते. मुसळीने लैंगिक समस्या देखील दूर होते. गर्भार स्त्रियांना स्तनांमध्ये दूध वाढवण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे. अशक्तपणा, लठ्ठपणा, मूळव्याध, श्वसनाचे आजार, हृदयाशी संबंधित समस्या आणि मधुमेहावर सफेद मुसळी लाभदायी ठरते. अतिसार, पोटाचे आजार, लघवीसंबंधी समस्या दूर करण्यासाठी हे खूप प्रभावी मानले जाते. सफेद मुसळी पुरुषांमधील शुक्राणू दोष कमी करण्यासाठी देखील उपयुक्त ठरू शकते.

*(या लेखाच्या लेखिका उद्योजक मासिकामध्ये कनिष्ठ प्रकल्प अधिकारी (से.पू.) म्हणून कार्यरत असून त्यांना मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा सतरा वर्षांचा अनुभव आहे.)*

■■



अमृत महोत्सवी फळझाड,
वृक्ष व फुलपीक लागवड कार्यक्रम

# फळबाग लागवडीतून बळीराजा होणार लक्षाधीश

**शेतकऱ्यांचा विविध नवीन फळ, फूलपिकांची सलग जमिनीमध्ये तसेच बांधावर व पडीक जमिनीमध्ये लागवड करण्याकडे कल वाढत आहे. इतर राज्येही नवनवीन फळपिकांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समावेश करून शेतकऱ्यांना फळबाग लागवड करण्यासाठी मदत करीत आहेत. ही बाब लक्षात घेऊन राज्यात फळबाग योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी, शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून तसेच भविष्यात फलोत्पादन विकास असलेला वाव लक्षात घेऊन नवीन फळपिके व फूलपिके यांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तो शेतकऱ्यांचा जीवनमान बदलण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. योजनेमुळे बळीराजा लक्षाधीश होणार आहे.**

**- प्रतिनिधी**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने भारतातील कृषी अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. त्यामुळे देशाची आर्थिक वृद्धी ही ग्रामीण विकासाला गतिशील करते. ग्रामीण विकास हा विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा एक महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण विकासाचा अर्थ ग्रामीण भागाचा एकूण विकास ज्यामुळे जीवनमानाच्या गुणवत्तेत सुधारणा होते. २०११ च्या जनगणनेनुसार, देशातील ग्रामीण लोकसंख्या ८३.२५ कोटी इतकी आहे. त्यामुळे ग्रामीण विकास होणे आवश्यक आहे. ग्रामीण विकास हा सर्वसाधारणपणे दारिद्र निर्मूलन करणारा सर्वसमावेशक व शाश्वत असणे अपेक्षित आहे. भारत सरकारी दरवर्षी विविध मार्गातून हा विकास करण्याचा प्रयत्न करत असते. त्यासाठी विविध उपाययोजना सुद्धा आखते. अमृत महोत्सवी फळझाड/वृक्ष व फूलपीक लागवड कार्यक्रम त्यापैकीच एक.

गेल्या वर्षी भारत देशाने स्वातंत्र्याचा अमृतकाळ साजरा केला. अशातच महाराष्ट्र राज्याने दारिद्र्याच्या उच्चाटनासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक लाभार्थ्यांना सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर अमृत महोत्सवी फळझाड/वृक्ष व फूलपीक लागवड कार्यक्रम' ठरवला आहे. याचे उद्दिष्ट म्हणजे पुढील २५ वर्षे दरवर्षी सरासरी एक लक्ष हेक्टर फळझाड/ वृक्ष किंवा फूलपिकाची लागवड होईल. स्वातंत्र्याचे १०० वर्षे पूर्ण होतील तेव्हा या योजनेअंतर्गत एकूण २५ लक्ष हेक्टर लागवड झाली असेल. तसेच या माध्यमातून देशाच्या शताब्दी वर्षी राज्याला अधिकाधिक शेतकऱ्यांना लक्षाधीश करण्यात यश आले असेल, असे उद्दिष्ट आहे.

## फलोत्पादनात महाराष्ट्र अग्रेसर

१९९०-९१ मध्ये राज्यात प्रथमतः रोजगार हमी योजनेद्वारे फळबाग लागवड योजना राबविण्यात आली. सदर योजनेमुळे राज्यात फळबाग पिकाखाली क्षेत्र वाढविण्यास मदत झाली व योजनेस शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. फळपिकांच्या उत्पादन वाढीसाठी सूक्ष्म सिंचनाचा वापर तसेच व्यावसायिक पद्धतीने फळबागांचे नियोजन केल्यामुळे उत्पादनात वाढ होऊन निर्यातीस चालना मिळाली. त्यामुळे आज महाराष्ट्र फलोत्पादन पिकांचे उत्पादन व निर्यातीमध्ये अग्रेसर आहे. शेतकऱ्यांचा विविध नवीन फळ/फूलपिकांची सलग जमिनीमध्ये तसेच बांधावर व पडीक जमिनीमध्ये लागवड करण्याकडे कर वाढत आहे. इतर राज्येही नवनवीन फळपिकांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये समावेश करून शेतकऱ्यांना फळबाग लागवड करण्यासाठी मदत करीत आहे. सदर वस्तुस्थिती लक्षात घेऊन राज्यात फळबाग योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी, शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून तसेच भविष्यात फलोत्पादन

पिकास असलेला वाव लक्षात घेऊन नवीन फळपिके व फूलपिके यांचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत समावेश करण्याचा निर्णय मार्च २०२२ मध्ये घेण्यात आला. तो शेतकऱ्यांचा जीवनमान बदलण्यासाठी उपयोगी ठरणार आहे.

### रोहयोमध्ये फळबाग योजनेचा समावेश

शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या शेतीतून रोजगार व आर्थिक उत्पन्न मिळवून देण्याच्या उद्देशाने तसेच शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. यात फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत वैयक्तिक बांधावर, सलग शेतावर व पडीक जमिनीवर फळझाड व फूलपीक लागवड करता येते. यामध्ये सगल फळबाग लागवडीअंतर्गत वैयक्तिक लाभार्थीला आंबा, चिकू, पेरू, डाळिंब, लिंबू, संत्री, सीताफळ, ड्रॅगनफ्रूट, अव्हाकडो, केळी, द्राक्ष आदि फळ पिकांची लागवड करता येते, तसेच, पडीक जमिनीवर लागवड आंबा, बोर, नारळ, सीताफळ आदि फळ झाडांची लागवड करता येते. तसेच गुलाब, मोगरा, निशिगंध आदी फूलझाडांची लागवड करता येते.

### शासनातर्फे अनुदान

योजनेत लाभार्थीनी क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर कमी जास्त करण्यास परवानगी आहे; परंतु देय अनुदान फळपीक लागवडीचे निकष कृषी विद्यापीठ शिफारसीनुसार अंतर मर्यादितच देय राहते. अतिरीक्त कलमे रोपे यांचे अनुदान देय नसते. लागवड वर्षासह सलग तीन वर्षात मंजूर अंदाजपत्रानुसार अनुदान देय राहते. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी बागायती वृक्ष पिकांच्या बाबत जे लाभार्थी कमीत कमी २० टक्के आणि कोरडवाहू वृक्षपिकांच्या बाबत किमान ७५ टक्के झाडे रोपे जिवंत ठेवतील, अशाच लाभार्थीना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहील. सन २०२२-२३ मध्ये मजुरीचा दर २५६ रुपये मनुष्यदिन राहील.

**लाभार्थीचे निकष :** कमीत कमी ०.०५ हे. व जास्तीत जास्त २ हेक्टर प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा आहे. इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास व ७/१२ च्या उताऱ्यावर कुळाचे नाव असेल तर योजना राबवत असताना कुळाची संमती आवश्यक आहे. अल्प व अत्यल्प लाभार्थी, महिला लाभार्थी, दिव्यांग व्यक्ती कुटूंब प्रमुख असलेल्या कुटुंबीयांना तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, निरधिसूचित जमाती, दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीस व पंतप्रधान आवास योजनेला प्राधान्य राहील. लाभार्थी शाश्वत उत्पन्नाची साधने उपलब्ध नसावीत. तसेच तो नोकरदार व्यक्ती नसावा. लाभार्थी ऑनलाइन रोजगार कार्डधारक असावा. लाभार्थीस ग्रामसभेची मंजुरी असावी व ग्रामपंचायत लेबर बजेटमध्ये त्याचा समावेश असावा व ग्रामसभेचा ठराव आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र इच्छुकांनी अधिक माहितीसाठी कृषी सहायक व तालुका कृषी अधिकारी कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाद्वारे करण्यात आले आहे.

### असा करा अर्ज

ग्रामपंचायत कार्यालयात तसेच प्रत्येक महसुली गावात अर्ज करता येईल अशा सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी (उदा. अंगणवाडी शाळा ग्रामपंचायत समाजमंदिर इ.) अर्ज पेटी ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ऑनलाइन अर्जाची व्यवस्थाही आहे. अर्ज वर्षभर करता येतो. मात्र १५ जुलै ते ३० नोव्हेंबर या कालावधीत आलेले अर्ज मंजूर करून त्या वर्षाच्या लेबर बजेट मध्ये समाविष्ट केले जातात. ज्या लाभार्थ्यांचे नाव वरील लेबर बजेटमध्ये समाविष्ट झाले नाही व सदर लाभार्थी योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक आहेत, अशा लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याकरिता पूरक लेबर बजेट तयार करण्यात येते. त्याकरिता १ डिसेंबर ते पुढील वर्षाचे १४ जुलैपर्यंत प्राप्त अर्ज त्या त्या महिन्याच्या पंचायत सभेत मान्यता घेऊन पंचायत समितीस मान्यतेसाठी पाठवले जातात. व त्यापुढील होणाऱ्या ग्रामसभेस सदर यादी अवलोकनार्थ ठेवण्यात येते.

**योजनेत समाविष्ट फळपीके/वृक्ष/फूलपिके -** १) आंबा २) काजू ३) चिकू ४) पेरू ५) डाळिंब ६) संत्रा ७) मोसंबी ८) कागदी लिंबू ९) नारळ १०) बोर ११) सिताफळ १२) आवळा १३) चिंच (विकसित जाती) १४) कवठ १५) जांभूळ १६) कोकम १७) फणस १८) अंजीर १९) सुपारी २०) बांबू २१) साग २२) जट्रोफा २३) गिरिपुष्प २४) कढीपत्ता २५) कडूलिंब २६) सिंधी २७) शेवगा २८) हादगा २९) पानपिंपरी ३०) केळी (३ वर्ष) ३१) ड्रैगन फ्रुट ३२) अव्हाकडो ३३) द्राक्ष ३४) चंदन ३५) खाया ३६) निम ३७) चारोळी ३८) महोगनी ३९) बाभुळ ४०) अंजन ४१) खैर ४२) ताड ४३) सुरू ४४) रबर ४५) महारुख ४६) मैंजियम ४७) मिलियाडुबीया ४८) तूती ४९) ऐन ५०) शिसव ५१) नीलगिरी ५२) सुबाभूळ ५३) शमी ५४) महुआ ५५) गुलमोहर ५६) बकान निब ५७) चिनार ५८) शिरीष ५९) करवंद

**फूलझाडे -** १) गुलाब २) मोगरा ३) निशिगंध ४) सोनचाफा

**औषधी वनस्पती -** १) अर्जुन, २) असन, ३) अशोक, ४) बेहडा, ५) हिरडा, ६) बेल, ७) टेटू, ८) डीकेमाली, ९) रक्त चंदन, १०) रिठा, ११) लोध्रा, १२) आइन, १३) शिवन, १४) गुग्गुळ, १५) बिब्बा, १६) करंज

**मसाला पिके -** १) लवंग २) मिरी ३) दालचीनी ४) जायफळ

■ ■







## स्पर्धात्मक बाजारपेठेत शोधा नावीन्य

# अन्नप्रक्रियेतील संधी

**जागतिक बाजारातील ट्रेंड आणि स्थानिक ग्राहकांच्या मागणीनुसार अन्नप्रक्रिया उद्योगात लक्षणीय वाढ झालेली आहे. वेगवेगळ्या कंपन्या नवीन ठिकाणी संधी शोधून त्या संधीमध्ये नावीन्य आणून शाश्वत यश मिळवताना आपल्याला दिसत आहेत. स्थानिक अनुकूलनासह जागतिक अंतर्दृष्टी संतुलित केल्याने व्यवसायांना विविध प्रेक्षकांशी एकरूप होणारी उत्पादने तयार करता येऊ शकतात. मजबूत स्थानिक भागीदारी निर्माण होते आणि वाढत्या स्पर्धात्मक बाजारपेठेत पुढे राहता येते. असा दुहेरी दृष्टिकोन स्वीकारल्यास भरभराट होते.**

**- निलाक्षी नितीन पवार**

अन्नप्रक्रिया उद्योग एका गतिशील क्रॉसरोडवर उभा आहे जिथे जागतिक ट्रेंड आणि स्थानिक गरजा एकमेकांना छेदतात. जसजशी ग्राहकांची प्राधान्ये विकसित होत आहेत आणि तांत्रिक प्रगती उत्पादन पद्धतींना आकार देत आहेत, तसतसे या क्षेत्रातील संधी वेगाने विस्तारत आहेत. या संधींना प्रभावीपणे नेव्हिगेट करण्यासाठी, व्यवसायांनी जागतिक बाजारातील ट्रेंड आणि स्थानिक बारकावे या दोन्ही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत, स्थानिक मागण्या पूर्ण करताना जागतिक अंतर्दृष्टीचा फायदा घेणारी धोरणे तयार केली पाहिजेत. या दोन महत्त्वाच्या परिमाणांमध्ये समतोल साधून कंपन्या यश कसे मिळवू शकतात हे या लेखात मांडले आहे.

**अन्नप्रक्रिया उद्योगाला आकार देणारे जागतिक बाजाराचे ट्रेंड -** आरोग्य आणि निरोगीपणा ट्रेंड अन्नप्रक्रिया उद्योगात आरोग्य आणि निरोगीपणावर जागतिक लक्ष केंद्रित केले आहे. पौष्टिक फायदे देणारे, कृत्रिम घटकांपासून मुक्त असलेले आणि ग्लूटेन-मुक्त किंवा कमी-साखर पर्यायासारख्या विशिष्ट आहाराच्या गरजा पूर्ण करणारे अन्न ग्राहक वाढत्या प्रमाणात शोधत आहेत. या बदलामुळे फूड प्रोसेसर्सना त्यांच्या उत्पादनांमध्ये प्रोबायोटिक्स, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स आणि वनस्पती-आधारित प्रथिने यासारख्या कार्यात्मक घटकांचा समावेश करून नवनिर्मिती करण्यास प्रवृत्त केले आहे.

ज्या कंपन्या या ट्रेंडचा प्रभावीपणे वापर करतात त्या स्वतःला आरोग्याबाबत जागरूक अन्नप्रक्रियेत नेते म्हणून स्थान देऊ शकतात. उदाहरणार्थ, वनस्पती-आधारित आहाराच्या वाढीमुळे वनस्पती-आधारित मांस पर्याय, दुग्ध-विरहित पर्याय आणि इतर आरोग्याभिमुख उत्पादने तयार करण्यासाठी मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**टिकाऊपणा आणि पर्यावरणविषयक चिंता :** पर्यावरणाविषयी जागरूकता जसजशी वाढत जाते, तसतसे अन्नप्रक्रियेतील शाश्वत पद्धतींकडे लक्षणीय वाढ होत आहे. यामध्ये कार्बन फूटप्रिंट्स कमी करणे, कचरा कमी करणे आणि इको-फ्रेंडली पॅकेजिंग वापरणे समाविष्ट आहे. जागतिक ग्राहक अधिकाधिक अशा ब्रँडला पसंती देत आहेत जे टिकाऊपणासाठी वचनबद्धतेचे प्रदर्शन करतात, ज्यामुळे कंपन्या त्यांच्या ऑपरेशन्सशी कसे संपर्क साधतात यावर प्रभाव पडतो.

जल-कार्यक्षम प्रक्रिया तंत्रज्ञान, नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोत आणि बायोडिग्रेडेबल पॅकेजिंग साहित्य यासारख्या नवकल्पना स्पर्धात्मक धोरणांचे महत्त्वपूर्ण घटक बनत आहेत. या पद्धती एकत्रित करणाऱ्या कंपन्या त्यांची ब्रँड प्रतिष्ठा वाढवू शकतात आणि पर्यावरणाबाबत जागरूक ग्राहकांना आवाहन करू शकतात.

**तांत्रिक प्रगती :** तंत्रज्ञान अन्नप्रक्रिया उद्योगात क्रांती करत आहे. ऑटोमेशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा ॲनालिटिक्स हे ऑपरेशन्स सुव्यवस्थित करतात, कार्यक्षमता सुधारतात आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढवतात. इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) उपकरणांसारखी तंत्रज्ञान रीअल-टाइम मॉनिटरिंग आणि उत्पादन प्रक्रियेचे नियंत्रण, उच्च सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी आणि डाउनटाइम कमी करण्यास अनुमती देते. शिवाय, ट्रेसिबिलिटीसाठी ब्लॉकचेन आणि गुणवत्ता नियंत्रणासाठी प्रगत सेन्सर यासारख्या अन्न सुरक्षा तंत्रज्ञानातील प्रगती अधिक महत्त्वाची होत आहे. या तंत्रज्ञानाचा अवलंब करणारे व्यवसाय त्यांच्या पुरवठा साखळी चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करू शकतात, उत्पादनाची सुरक्षितता सुनिश्चित करू शकतात आणि बाजाराच्या मागणीला अधिक जलद प्रतिसाद देऊ शकतात.

**जागतिकीकरण आणि बाजार विस्तार :** अन्न बाजाराचे जागतिकीकरण आव्हाने आणि संधी दोन्ही सादर करते. कंपन्या उदयोन्मुख बाजारपेठेत प्रवेश करून त्यांचा आवाका वाढवू शकतात, ज्यात अनेकदा वेगाने वाढणारा मध्यमवर्ग आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांची मागणी वाढत आहे. यशस्वी मार्केट एंट्रीसाठी स्थानिक प्राधान्ये आणि नियामक आवश्यकता समजून घेणे महत्त्वाचे आहे.

याव्यतिरिक्त, जागतिकीकरण जगभरातील विविध कच्चा माल आणि उत्पादन तंत्रांमध्ये प्रवेश सुलभ करते. जे व्यवसाय धोरणात्मकरीत्या

घटक आणि तंत्रज्ञानाचा स्रोत करतात ते त्यांच्या उत्पादनाच्या ऑफर वाढवू शकतात आणि स्पर्धात्मक धार राखू शकतात.

**अन्नप्रक्रियेतील स्थानिक यश घटक, स्थानिक प्राधान्ये समजून घेणे :** जागतिक ट्रेंड प्रभावशाली असताना, स्थानिक ग्राहक प्राधान्ये यश निश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. प्रत्येक प्रदेशात विशिष्ट अभिरुची, आहाराच्या सवयी आणि सांस्कृतिक पद्धती असतात जे अन्न निवडीवर प्रभाव टाकतात. उदाहरणार्थ, एका देशात लोकप्रिय असलेले फ्लेवर्स आणि घटक दुसऱ्या देशात गुंजत नाहीत.

या प्राधान्यांना समजून घेण्यासाठी संपूर्ण मार्केट रिसर्च करणे आणि स्थानिक ग्राहकांशी संवाद साधणे ही आवश्यक पावले आहेत. यामध्ये चव चाचण्या, फोकस गट आणि ग्राहक सर्वेक्षण यांचा समावेश असू शकतो. स्थानिक अभिरुची आणि आहाराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादने तयार करून, कंपन्या चांगली बाजारपेठ स्वीकारू शकतात आणि ग्राहकांची निष्ठा प्राप्त करू शकतात.

**स्थानिक नियमांशी जुळवून घेणे :** अन्नप्रक्रिया नियम एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात लक्षणीयरीत्या बदलतात. या नियमांमध्ये घटक सुरक्षितता आणि लेबलिंग आवश्यकतांपासून ते पर्यावरणीय मानके आणि कामगार पद्धतींपर्यंत सर्वकाही समाविष्ट आहे. अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी आणि कायदेशीर समस्या टाळण्यासाठी या नियमांचे नेव्हिगेट करणे महत्त्वाचे आहे.

स्थानिक नियामक संस्थांसोबत मजबूत संबंध प्रस्थापित करणे आणि स्थानिक कायदेशीर तज्ज्ञांमध्ये गुंतवणूक करणे व्यवसायांना नियामक बदलांबद्दल माहिती ठेवण्यास आणि त्यांची उत्पादने सर्व आवश्यक मानकांची पूर्तता करतात याची खात्री करण्यास मदत करू शकतात. अनुपालन केवळ दंड टाळत नाही तर ग्राहक आणि स्थानिक प्राधिकरणांमध्ये विश्वास निर्माण करतो.

**स्थानिक पुरवठा साखळी तयार करणे :** कार्यक्षम स्थानिक पुरवठा साखळी विकसित केल्याने उत्पादनाची गुणवत्ता वाढू शकते आणि खर्च कमी होऊ शकतो. साहित्य आणि सामग्रीच्या स्थानिक सोर्सिंगमुळे नवीन उत्पादने आणि कमी वाहतूक वेळ होऊ शकतो. हे स्थानिक अर्थव्यवस्थेला देखील समर्थन देते आणि लांब-अंतराच्या शिपिंगशी संबंधित पर्यावरणीय प्रभाव कमी करते.

स्थानिक पुरवठादार आणि शेतकरी यांच्याशी सहकार्य केल्याने अधिक लवचिक पुरवठा साखळी निर्माण होऊ शकते, उत्पादन शोधण्यायोग्यता सुधारू शकते आणि सकारात्मक समुदाय संबंध वाढवू शकतात. याव्यतिरिक्त, स्थानिक भागीदारी प्रादेशिक बाजार गतिशीलता आणि ग्राहक प्राधान्यांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी देऊ शकतात.

**सांस्कृतिक संवेदनशीलता आणि विपणन :** मार्केटिंग स्ट्रॅटेजीज स्थानिक प्रेक्षकांशी जुळण्यासाठी स्वीकारल्या पाहिजेत. यामध्ये उत्पादन माहितीचे अचूक भाषांतर करणे, सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित प्रतिमा वापरणे आणि स्थानिक मूल्ये आणि परंपरांशी संरेखित करणे समाविष्ट आहे. विपणनातील चुकांमुळे गैरसमज किंवा नकारात्मक समज होऊ शकतात.

यशस्वी विपणन मोहिमांमध्ये अनेकदा स्थानिक प्रभावशाली आणि प्रादेशिक मूल्यांशी संरेखित भागीदारी यांचा समावेश होतो. स्थानिक रीतिरिवाज आणि ग्राहक वर्तन प्रतिबिंबित करण्यासाठी प्रचारात्मक धोरणे तयार केल्याने ब्रँडची स्वीकृती वाढू शकते आणि विक्री वाढू शकते.

**स्थानिक नावीन्य आणि सानुकूलन :** स्थानिक नवोपक्रमाचा लाभ घेतल्यास स्पर्धात्मक फायदा मिळू शकतो. स्थानिक उद्योजक आणि व्यवसायांना अनेकदा प्रादेशिक गरजा आणि प्राधान्यांबद्दल अद्वितीय अंतर्दृष्टी असते. स्थानिक नवोन्मेषकांसोबत सहयोग करणे किंवा प्रादेशिक R&D मध्ये गुंतवणूक केल्याने विशिष्ट स्थानिक मागण्या पूर्ण करणारी सानुकूलित उत्पादने होऊ शकतात.

उदाहरणार्थ, एखादी अन्नप्रक्रिया करणारी कंपनी प्रामाणिकपणाला महत्त्व देणाऱ्या स्थानिक ग्राहकांना आवाहन करणारी, पारंपरिक प्रादेशिक चव किंवा घटक असलेले उत्पादन विकसित करू शकते. स्थानिक सौंदर्यशास्त्र आणि सांस्कृतिक प्राधान्ये प्रतिबिंबित करणाऱ्या डिझाईन्ससह कस्टमायझेशन पॅकेजिंगपर्यंत देखील वाढू शकते.

**जागतिक आणि स्थानिक धोरणांचा समतोल साधणे :** अन्नप्रक्रिया उद्योगातील संधी प्रभावीपणे नेव्हिगेट करण्यासाठी कंपन्यांनी जागतिक आणि स्थानिक धोरणांमध्ये संतुलन राखले पाहिजे. यामध्ये उत्पादन विकास, पुरवठा साखळी व्यवस्थापन आणि विपणनासाठी स्थानिक दृष्टिकोनांसह जागतिक बाजार अंतर्दृष्टी एकत्रित करणे समाविष्ट आहे.

**स्थानिक अंमलबजावणीसह जागतिक दृष्टी :** कंपन्यांनी एक जागतिक दृष्टी विकसित केली पाहिजे जी स्थानिक अनुकूलनासाठी लवचिकतेला अनुमती देताना व्यापक ट्रेंड आणि संधींशी संरेखित होते. यामध्ये प्रादेशिक प्राधान्ये पूर्ण करण्यासाठी स्थानिकीकृत रूपे ऑफर करताना जागतिक मानके आणि ट्रेंडचे पालन करणारी कोर उत्पादन लाइन तयार करणे समाविष्ट असू शकते.

**धोरणात्मक भागीदारी आणि युती :** स्थानिक व्यवसाय, पुरवठादार आणि संशोधन संस्थांसोबत धोरणात्मक भागीदारी केल्याने बाजारपेठेतील प्रवेश आणि विस्ताराचे प्रयत्न वाढू शकतात. या भागीदारी मौल्यवान स्थानिक अंतर्दृष्टी प्रदान करतात, नियामक अनुपालन सुलभ करतात आणि पुरवठा साखळी विकासास समर्थन देतात.

**सतत शिकणे आणि अनुकूलन :** अन्नप्रक्रिया उद्योग सतत विकसित होत आहे आणि पुढे राहण्यासाठी सतत शिक्षण आणि अनुकूलन आवश्यक आहे. कंपन्यांनी त्यांचे धोरण सुधारण्यासाठी आणि स्पर्धात्मक धार राखण्यासाठी जागतिक आणि स्थानिक बाजारातील कल, ग्राहक अभिप्राय आणि तांत्रिक प्रगती यांचे नियमितपणे मूल्यांकन केले पाहिजे.

**निष्कर्ष :** जागतिक बाजारातील ट्रेंड आणि स्थानिक ग्राहकांच्या मागणीनुसार अन्नप्रक्रिया उद्योग लक्षणीय वाढीसाठी सज्ज आहे. हे परिमाण प्रभावीपणे समजून घेऊन आणि नेव्हिगेट करून, कंपन्या नवीन संधी अनलॉक करू शकतात, नावीन्य आणू शकतात आणि शाश्वत यश मिळवू शकतात. स्थानिक अनुकूलनासह जागतिक अंतर्दृष्टी संतुलित केल्याने व्यवसायांना विविध प्रेक्षकांशी एकरूप होणारी उत्पादने तयार करता येतात, मजबूत स्थानिक भागीदारी निर्माण होते आणि वाढत्या स्पर्धात्मक बाजारपेठेत पुढे राहता येते. या दुहेरी दृष्टिकोनाचा स्वीकार करणे अन्नप्रक्रियेच्या सतत विकसित होत असलेल्या लँडस्केपमध्ये भरभराट होण्यासाठी महत्त्वाचे असेल.

*(या लेखाच्या लेखिका कार्यालयीन कार्यकारी, एमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई येथे कार्यरत असून त्यांचा भ्रमणध्वनी ९९३०९४०४९० आहे.)*



सीताफळाच्या गरापासून करा टॉफी, श्रीखंड, मिल्कशेक, रबडी, आइस्क्रीम

# सीताफळ प्रक्रिया उद्योगातून अर्थार्जन

**सीताफळ हे एक कोरडवाहू फळपीक असून बाजारपेठेत त्याला मागणी वाढते आहे. या पिकासाठी लागणारी हलकी जमीन, हवे असणारे हवामान व कमी पाणी अशा प्रकारची उपलब्धता महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे महाराष्ट्रात या पिकाखालील क्षेत्र वाढले आहे. ज्या शेतकऱ्यांना कायम पाणी समस्येला तोंड द्यावे लागते त्यांच्यासाठी सीताफळ शेती हा उत्तम पर्याय होऊ शकतो. हे नाशवंत वर्गातील फळ असल्याने फार काळ टिकत नाही; परंतु त्यावर प्रक्रिया करून त्याचा आस्वाद वर्षभर घेता येतो. शिवाय अर्थार्जनातही भर पडते.**

**- प्रतिनिधी**

कोरडवाहू फळपिकातील महत्त्वाचे पिक म्हणजे सीताफळ. सीताफळांचा हंगाम सप्टेंबर ते नोव्हेंबरपर्यंत या कालावधीत असतो. सीताफळ हे एक नाशवंत वर्गातील फळ आहे. जास्त नाशवंत फळ असल्यामुळे ते जास्त दिवस साठवता येत नाही. सीताफळाच्या हंगामात सीताफळाची आवक मोठ्या प्रमाणावर झाल्यानंतर फळांचे भाव कोसळतात व शेतकऱ्यांचे नुकसान होते.

सीताफळ हे पक्व झाल्यानंतर जास्त दिवस साठवून ठेवू शकत नाही. त्यामुळे त्यावर प्रक्रिया करून त्याचा गर वेगळा करून त्याची साठवणून करून त्याचा वापर विविध प्रक्रियायुक्त पदार्थ बनविण्यासाठी करता येतो. याकडे शेतकरीवर्गाने व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे वर्षभर सीताफळाचा आस्वाद घेता येऊ शकतो. या प्रक्रियेमध्ये सीताफळ गर, गराची पावडर, टॉफी, जॅम, सरबत, सीताफळ, टॉफी, श्रीखंड, मिल्कशेक, रबडी, सीताफळ आइस्क्रीम सीताफळ पेये असे पदार्थ तयार करणे ही एक नवीन व्यवसाय संधी उपलब्ध झाली आहे. त्यातून अधिक नफा शेतकऱ्यांनाही कमावता येऊ शकतो.

### सीताफळ गर

सीताफळाचा गर कुठलाही पदार्थ करताना महत्त्वाचा असतो. पिकलेली चांगली मोठी सीताफळे निवडून घेऊन पाण्याने स्वच्छ धुऊन घ्यावीत. नंतर फळांचे दोन भाग करावेत. बियांसहित गर अलगदपणे चमच्याने काढून घ्यावा. एका भांड्यावर चाळणी ठेवून चमचा अथवा रवीने घुसळा. हळूहळू सगळा गर भांड्यात पडतो. फक्त बिया वर राहतात. दोरी चॉपरमध्ये हा गर फिरवला तर लवकर बिया आणि गर मोकळा होतो. हा काढलेला गर मिक्सरमधून काढून घ्या. म्हणजे एकजीव होईल. त्यामध्ये ५०० पीपीएम सायट्रिक आम्ल व ७०० पीपीएम पोटॅशियम मेटाबायसल्फाइड मिसळून गरम करावा. हा गर निर्जंतुक केलेल्या बाटल्यांमध्ये किंवा रिटॉर्टेबल पाऊचेसमध्ये भरून हवाबंद करावा. दोन ते तीन महिने सहज हा गर टिकतो. पाश्चराईज करून थंड करून लेबल लावून थंड ठिकाणी शितगृहात -१८०० से.ग्रे. तापमानात साठवून ठेवावा. सीताफळाच्या गरापासून पावडर, जॅम, पेये, सिरप, मिल्कशेक, रबडी, आइस्क्रीम, श्रीखंड हे पदार्थ तयार करता येतात.

### रबडी

१ लिटर दूध एका नॉनस्टिक पॅनमध्ये घ्या व दूध अर्धे झाले की २ चमचे साखर टाका. साखर विरघळली की, चिमूटभर सोडा टाका व हलवून घ्या. आवडीप्रमाणे सुकामेवा टाका. वेलची पुड टाका. शेवटी १ कप सीताफळ पल्प टाकून मिसळून घ्या. पुढे १ मिनिटात गॅस बंद करा. थंड होऊ द्या. तयार झालेले मिश्रण फ्रीजमध्ये १ तास ठेवावे. साखरेचे प्रमाण कमीच असावे; कारण साखर जास्त टाकली की सीताफळाची चव निघून जाते. थंड झालेली रबडी खाण्यास अतिशय चविष्ट लागते.

### गराची पावडर

फळांचा काढलेला गर घेऊन त्यामध्ये ५०० पीपीएम सायट्रिक आम्ल व ७०० पीपीएम पोटॅशियम मेटाबायसल्फाईड व २-३ टक्के माल्टोडेक्स्ट्रीन मिसळून स्प्रे ड्रायरमध्ये किंवा ड्रम डायरमध्ये ५-८ टक्के पाण्याचा अंश येईपर्यंत वाळवावा. यानंतर तयार झालेली पावडर निर्वात केलेल्या पिशवीमध्ये भरून थंड ठिकाणी साठवून ठेवावी. अशा प्रकारे तयार झालेली पावडर आइस्क्रीम, कन्फेक्शनरी तसेच श्रीखंड, मिल्कशेक, टॉफी इ. पदार्थ तयार करताना वापरता येते. औद्योगिकस्तरावर गराची पावडर हा महत्त्वपूर्ण घटक म्हणून वेगवेगळे पदार्थ बनविण्यासाठी उपयोग होतो. तसेच त्यात पाण्याचा अंश कमी असल्यामुळे ते जास्त काळ टिकून राहते.

### जॅम

गराच्या वजनाएवढी साखर मिसळून तो गरम करावा, सतत ढवळत राहावे. खाली लागू देऊ नये. नाही तर जळण्याचा दर्प मिश्रणाला येतो. नंतर २-५ ग्रॅम प्रतिकिलो गर या प्रमाणात सायट्रिक आम्ल मिसळून ते मिश्रण घट्ट होईपर्यंत म्हणजेच तुकड्यांत पडेपर्यंत शिजवावे. या वेळी मिश्रणाचा टीएसएस ६८-६९ टक्के असतो. तयार झालेला जॅम निर्जतुक केलेल्या काचेच्या बाटल्यांमध्ये भरून बाटल्या थंड करून, त्यावर मेणाचा थर देऊन किंवा ॲल्युमिनियम फॉईल लावून, हवाबंद करून झाकण लावावे. बाटल्या थंड जागी साठवाव्यात.

### सरबत

गर १५ टक्के साखर, १५ टक्के सायट्रिक आम्ल, ०.२५ टक्के घेऊन उत्तम प्रकारे सरबत करता येते. प्रथम गर घेऊन त्यामध्ये प्रमाणात मोजून घेतली साखर, सायट्रिक आम्ल व पाणी मिसळून ते चांगले ढवळून घ्यावे. हे मिश्रण मलमलच्या कापडातून गाळावे. जर हे सरबत जास्त काळ साठवून ठेवायचे असल्यास ते गरम करून त्यामध्ये १०० पीपीएम पोटॅशियम मेटाबायसल्फाईड मिसळून निर्जतुक केलेल्या २०० मि.ली. च्या काचेच्या बाटल्यांमध्ये भरून झाकण लावावे. हे मिश्रण १-२ महिने टिकते.

### सीताफळ टॉफी

सीताफळाचा १ किलो गर घेऊन त्यात २ किलो साखर व १ किलो द्रव ग्लुकोज टाकावी. हे मिश्रण साधारण ९५ टक्के साखरेचे प्रमाण येईपर्यंत किंवा गोळी तयार होईपर्यंत उकळावे. थंड होत असतांनाच साच्यात टाकून वड्या पाडाव्यात, तयार झालेली टॉफी थंड झाल्यावर सिलोफेनच्या वेष्टणात टाकावी.

### श्रीखंड

सीताफळाचा गर १०० ग्रॅम, साखर ५०० ग्रॅम व ४०० ग्रॅम चक्का मिसळून मिश्रण चांगले एकजीव करून घ्यावे. त्यामध्ये ड्रायफ्रुट्स टाकून फ्रीजमध्ये ठेवून थंड करावे.

### मिल्कशेक

गाईचे किंवा म्हशीचे स्वच्छ दूध गाळून घेऊन गरम करून ते प्रमाणित करावे. नंतर ते ७०० से. तापमानास १५ मिनिटे गरम करावे. त्यामध्ये ०.४० टक्के सोडियम ऐल्जिनेट मिसळून १० टक्के साखर आणि १० टक्के गर किंवा पावडर मिसळून हे मिश्रण चांगले गाळून घ्यावे. त्यानंतर ७०० सेल्सिअस तापमानास ३० मिनिटे गरम करावे. नंतर ते १००० सेल्सिअस तापमानास तीन तास थंड करून घ्यावे. परत ते २०० अंश सेल्सिअस ते ४०० अंश सेल्सिअस तापमानाला सात मिनिटे थंड करून मिक्सरला घुसळवून घ्यावे.

### सीताफळ आइस्क्रीम

दूध, साखर, दूध पावडर एकत्र करा. दूध नामांकित कंपनीचे अथवा ताजे वापरावे. गॅसवर ठेवून सतत ५ मिनिटे हलवत रहा. थंड झाले की फ्रीजमध्ये १० तास ठेवा. १० तासाने विप करून घ्या नंतर अर्धा सीताफळाचा पल्प टाका व १० मिनिटे विप करा. नंतर अर्धा सीताफळाचा पल्प टाका व एकत्र करा. हवा बंद डब्यात ठेवा. डब्बा १२ तास फ्रीजरमध्ये ठेवा.

### सीताफळ पेये (आरटीएस)

आरटीएसमध्ये १० टक्के रस, १० टक्के टीएसएस आणि आम्लतेचे प्रमाण ०.३ टक्के असते. एक लिटर गाळून घेतलेल्या रसामध्ये पाणी १.२ कि. साखर आणि २० ग्रॅम सायट्रीक आम्ल मिसळावे. मिश्रण विरघळेपर्यंत हलवत राहावे. चांगले ढवळून तयार आरटीएस निर्जतुक केलेल्या बाटल्यांमध्ये भरून सीलबंद करावे.

### गुणकारी सीताफळ

सीताफळात कॅल्शियम, लोह, थायमिन, रिबोफ्लेविन, नियासिन, क जिवनसत्त्व, बी वन, बी टू जीवनसत्त्व, असते. सीताफळ गोड, थंड, कफवर्धक, पौष्टिक, बलवर्धक, पित्तशामक असते. सीताफळाच्या बिया बारीक वाटून रात्री डोक्याला केसांच्या मुळांना लावाव्या. नंतर डोक्याला घट्ट फडके बांधावे. सकाळी डोक्यावरून नहावे. म्हणजे डोक्यातील उवांचा नायनाट होतो; पण ते केस धुतल्याचे पाणी डोळ्यात अजिबात जाऊ देऊ नये. अपायकारक आहे. लघवी अडणे, लघवी साफ न होणे, लघवीची आग यावर झाडाची मुळी उगाळून चाटावी. खूप तहान लागणे, कितीही पाणी प्याले तरी समाधान न होणे यावर सीताफळे खावीत. सीताफळाची पाने वाटून त्याचे पोळीस गळवांवर बांधता येते. त्यामुळे गळू लवकर पिकते. तसेच आतली घाण स्वच्छ होण्यास मदत होते. सीताफळाचे सेवन जपून करावे; कारण ते अत्यंत थंड आहे. अतिसेवन केल्याने थंडी वाजून ताप येतो. ज्यांना अपचनाचा त्रास आहे आणि सर्दी झाली असेल त्यांनी सीताफळाचे सेवन जपूनच करावे.

■ ■



उत्पादित वीज
खुल्या बाजारात विकणार

# 'साक्री' महानिर्मितीचे सोलर हब

**साक्री येथे महानिर्मितीचा १२५ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प मागील सुमारे दहा वर्षांपासून कार्यरत आहे. त्यात साक्री-१,२,३ सौर प्रकल्प पूर्ण झाल्यावर एकाच ठिकाणी सुमारे १९५ मेगावॅट स्थापित क्षमता असलेल्या या सौर प्रकल्पामुळे साक्री महानिर्मितीचे 'सोलर हब' म्हणून नावारूपास येणार आहे.**

**- प्रतिनिधी**

सूर्यापासून जी ऊर्जा मिळते तिला सौरऊर्जा म्हणतात. सौरऊर्जा ही अक्षय म्हणजेच कधीही न संपणारी ऊर्जा आहे; कारण जोपर्यंत सूर्य आहे तोपर्यंत ती कधीही संपणार नाही. सौरऊर्जा देखील प्रदूषणमुक्त आहे; कारण सौरऊर्जेपासून कोणतेही हानिकारक वायू, रसायने तयार होत नाहीत हे आपण जाणता.

महानिर्मितीने धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील शिवाजीनगर येथे एकूण ७० मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये साक्री-१ (२५ मेगावॅट), साक्री-२ (२५ मेगावॅट) आणि साक्री-३ (२० मेगावॅट) चा समावेश आहे. यापैकी साक्री-१ येथे २५ मेगावॅटचा सौरऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम मेसर्स गोदरेज आणि बॉयस या विकासकाने ई.पी.सी. (अभियांत्रिकी खरेदी आणि उभारणी तत्त्वावर) हा प्रकल्प विकसित केला असून क्रिस्टलाइन पद्धतीचे सौर पॅनेल आहेत. या प्रकल्पाची कॅपॅसिटी युटिलायझेशन फॅक्टर (सी.यू.एफ.) २०.५९ टक्के असून वार्षिक वीजनिर्मिती ४५.०९ दशलक्ष युनिट अपेक्षित आहे.

२१ ऑगस्ट रोजी हा सौर प्रकल्प कार्यान्वित करून २२०/३३ के.व्ही. शिवाजीनगर, साक्री उपकेंद्राशी यशस्वीरीत्या जोडण्यात आला. साक्री-१ प्रकल्पामुळे ५० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आता महानिर्मितीची एकूण सौरऊर्जा स्थापित क्षमता ४२८ मेगावॅट इतकी झाली आहे.

**साक्री-१ प्रकल्पाची वैशिष्ट्ये** : या प्रकल्पासाठी ५२ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून याचा प्रकल्प खर्च ९३.१२ कोटी इतका आहे. या प्रकल्पातून उत्पादित वीज ही खुल्या बाजारात विकण्यात येणार आहे.

**'साक्री' महानिर्मितीचे सोलर हब** : साक्री येथे महानिर्मितीचा १२५ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प मागील सुमारे दहा वर्षांपासून कार्यरत आहे. त्यात साक्री-१,२,३ सौर प्रकल्प पूर्ण झाल्यावर एकाच ठिकाणी सुमारे १९५ मेगावॅट स्थापित क्षमता असलेल्या या सौर प्रकल्पामुळे साक्री महानिर्मितीचे 'सोलर हब' म्हणून नावारूपास येणार आहे.

**महानिर्मिती पॉवर ट्रेडिंग क्षेत्रात** : जुलै २०२४ पासून महानिर्मितीने सेझ बायोटेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे समवेत १५ मेगावॅट सौर वीज वितरणाचा करार केला आहे.

**प्रगतीपथावर सौरऊर्जा प्रकल्प** : साक्री-१ येथे २५ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स गोदरेज ॲण्ड बोएस कंपनी तर साक्री-२ हा २५ मेगावॅटचा सौरऊर्जा प्रकल्प टाटा पॉवर सोलर सिस्टिम, साक्री-३, हा २० मेगावॅट स्थापित क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प विकसित करण्याचे काम मेसर्स स्वरयू पॉवर करीत असून लवकरच हे दोन्ही प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

**ऊर्जामंत्र्यांनी केले महानिर्मितीचे अभिनंदन** : साक्री-१ येथे २५ मेगावॅट स्थापित क्षमतेचा हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन यांनी संचालक (प्रकल्प) अभय हरणे आणि (नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि नियोजन) चमूचे तसेच मेसर्स गोदरेज ॲण्ड बॉयसच्या अधिकारी, अभियंत्यांचे अभिनंदन केले आहे.

**अक्षय स्रोताचे लाभ** : १. सौरऊर्जेचा एक मोठा फायदा म्हणजे तो अक्षय स्रोत आहे. अशा प्रकारे, जोपर्यंत सूर्य आहे तोपर्यंत ते वापरण्यासाठी उपलब्ध असेल. सौरऊर्जा कोणीही कितीही मोठ्या प्रमाणात वापरू शकतो, दुसऱ्या ऊर्जेच्या स्रोतांप्रमाणे ही ऊर्जा कधीच संपणारी नाही. परिणामी, प्रत्येकजण त्याचा मुबलक वापर करू शकतो.

२. सौरऊर्जेचा वापर केल्याने आपले वीज बिल कमी होण्यास मदत होऊ शकते. जेव्हा आपण ही ऊर्जा वापरतो, तेव्हा आपण पेट्रोलियम, खनिजे आणि कोळसा यासारख्या उर्जेच्या अपारंपरिक स्रोतांवर कमी अवलंबून राहू शकतो.

३. आपण सौरऊर्जेचा वापर अनेक कामांसाठी करू शकतो. सौरऊर्जा वापरून आपल्याला वीज तसेच उष्णता निर्माण करता येते. आम्ही ही ऊर्जा अशा ठिकाणी वापरू शकतो जिथे आम्हाला विजेची आवश्यकता नसते.

४. ही ऊर्जा वापरल्याने प्रदूषण होणार नाही आणि त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही. परिणामी वायू प्रदूषणात लक्षणीय घट होईल. आपण सर्वांनी आपल्या दैनंदिन जीवनात या ऊर्जेचा समावेश करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ■■



कोरफड

प्रक्रिया उद्योग

# निसर्गाचा ठेवा, उद्योजकांसाठी मेवा

**कोरफडचा रस आयुर्वेदिक गुणाने संपन्न व आरोग्यदायी आहे. कोरफडीच्या रसामध्ये व्हिटॅमिन 'ए', 'सी', 'बी१', 'बी२', 'बी३', फॉलिक ॲसिड हे घटक असतात, तर मॅग्नेशियम, झिंक, लोह, कॅल्शियम, पोटॅशियम आणि सेलेनियम यासारखी खनिजे असल्याने शरीराला पोषक घटकांचा पुरवठा होतो. त्यामुळे दररोजच्या आहारात कोरफडीच्या रसाचा समावेश होत आहे. यादृष्टीने पर्यावरणाच्या संतुलनासाठी शाश्वत शेती करण्यासाठी आणि उद्योगासाठी कोरफड अतिशय महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे कोरफड संशोधनाला चालना देणे ही आज काळाची गरज झाली आहे.**

**- डॉ. संतोष आगरकर**

कोरफड वनस्पती ही एक बारमाही झुडूपवर्गीय असून, जगातील उष्ण कटिबंधीय किंवा उपोष्ण कटिबंधीय देशात वाढते. त्याची व्यवसायिक लागवड भारतात विविध राज्यात केली जाते. जसे महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, गुजरात इ. केली जाते. आपल्या बाजारपेठेत कोरफड व त्यापासून तयार केलेल्या मूल्यवर्धित वस्तूंची प्रचंड मागणी आहे. कोरफड ही वनस्पती औषधी व सौंदर्य प्रसाधने उपयोगासाठी अतिप्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. तसेच काही भागात अन्नघटक म्हणूनही वापर केला जात असल्याचा साहित्यात उल्लेख आढळतो.

कोरफडाच्या अनेक प्रजाती असून, या वनस्पतीची पाने जाड हिरवी, तिक्ष्ण, टोकदार असतात. पानांमध्ये मुख्यतः पाण्याचे जास्त प्रमाण असते. विविध जीवनसत्त्वे, अमिनो ॲसिड्स, खनिजे आणि शर्करा असल्याचे विविध संशोधन साहित्यात संदर्भित आढळतात. विशेषतः ॲलोवेरा किंवा ॲलो बार्बेडेन्सिस याची जास्त प्रमाणात लागवड व वापर केला जातो.

आपल्या भागातील नवउद्योजकांनी कोरफड लागवड याकडे शाश्वत उद्योग म्हणून पावले उचलण्यास ग्रामीण भागात उद्योग क्रांती घडू शकते. कोरफड वनस्पतीची लागवड चांगल्या निचऱ्याची चिकणमाती, वाळूमिश्रित माती ते काळी मातीत करता येऊ शकते. यासाठी देखभाल खर्च लागवड खर्च, मशागत खर्च, संरक्षण मेहनत व खर्च, अतिशय कमी असून, इतर पिकांपेक्षा जास्त उत्पादन देणारी शेती पीक होय. या वनस्पतीवर फारच कमी प्रमाणात कीटक व रोगाचा प्रादुर्भाव होत असल्यामुळे फवारणी, औषधे व मजूर खर्च कमी होतो. तसेच अतिशय कोरड्या परिस्थितीत १५ ते २० दिवसांनी सिंचनाची आवश्यकता भासते. हिवाळा व पावसाळ्यात शक्यतो सिंचनाची गरज भासत नाही.

सिंचनाचे प्रमाण कमी असल्यामुळे तण वाढण्याचे प्रमाण कमी असते; परंतु आवश्यकतेनुसार तण काढल्यास उत्पादनात भर पडू शकते. उत्पादन वाढविण्यासाठी कंपोस्ट खत, गांडूळ खत किंवा शेणखत वापरणे आवश्यक आहे. कोरफड पिकाची काढणी ही झाडांच्या वाढीवर अवलंबून असते. ही वनस्पती साधारणतः १७ ते २४ महिन्यात काढणीसाठी योग्य राहते. पानांची खुडणी हाताने केली जाते व ती बाजारपेठेत आवश्यकतेनुसार पाठवली जातात. नव उद्योजकांनी बाजारपेठेतील भावातील चढ-उतार याचा अभ्यास करून पानांची विक्री करावी. म्हणजे जास्त नफा मिळू शकतो.

कोरफड लागवड व विक्री हा उद्योग सफल होण्यासाठी विशिष्ट भागात मोठ्या प्रमाणात लागवड किंवा शेती करणे आवश्यक आहे. माझ्या मते कोरफड लागवड व पानांची विक्री उद्योग हा समूह उद्योगाच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येऊनकेल्यास फायदेशीर ठरू शकतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे लागणारे बियाणे किंवा वाण एकत्रित खरेदी केल्यामुळे स्वस्तात सहज मिळू शकते, लागवडीसाठी मंजूर एकत्रित उपलब्ध होऊ शकतात, सिंचनाची एकत्रित व्यवस्था करता येऊ शकते, पानांची काढणी, वाहतूक व्यवस्था व बाजारपेठेत सामूहिक विक्री इ. होय.

कोरफड लागवडीप्रमाणेच कोरफड वनस्पतीपासून विविध प्रक्रिया उद्योग ही उभारले जाऊ शकतात व उद्योजकतेला ग्रामीण भागात चालना मिळवून बेरोजगारी कमी होऊ शकते असे मला वाटते. काही महत्त्वाचे कोरफड प्रक्रिया उत्पादन उद्योगाची माहिती खालीलप्रमाणे विशद केली जाते.

**१) कोरफड रस :** कोरफड वनस्पतीच्या ताज्या जाड रसाळ पानांपासून रस तयार केल्या जातो. रसाचे प्रमाण हे कोरफड वनस्पतीच्या प्रजातीनुसार व लागवडीच्या पद्धतीनुसार बदलत जाते. हा रस विविध आरोग्यविषयक तक्रारी किंवा रोगापासून मुक्ती मिळविण्यासाठी औषधीप्रमाणे तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वापरल्या जातो. रसाला विविध राज्यात प्रचंड मोठ्या प्रमाणात मागणी आहे; परंतु दुर्दैवाने उत्पादन फारच कमी असल्याचे लक्षात येते.

**२) कोरफड जेल :** कोरफड वनस्पतीच्या पानांपासून जेल बनविता येते. कोरफड प्रक्रिया उद्योगातील जेल हे मुख्य उत्पादन होय. कोरफड जेलची मागणी ग्राहक बाजारपेठ व उद्योग क्षेत्र ह्या तिन्ही अंगांनी दिवसेंदिवस वाढतच चालली असल्यामुळे नव उद्योजकांनी या उद्योगाची कास धरल्यास तो आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होऊ शकतो. कोरफड जेलचा सौंदर्य प्रसाधने, औषधी निर्मिती व इतर उद्योगात मोठ्या प्रमाणात केला जातो. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्यातील आरोग्यवर्धक, सौंदर्यवर्धक व जीवनावश्यक घटक होय.

**३) कोरफड पावडर :** कोरफड वनस्पतीच्या पानांपासून विविध उपयोगी पावडर बनविण्याचा उद्योगही मोठ्या प्रमाणात विकसीत होत आहे. कोरफडचे पीक मोठ्या प्रमाणात झाल्यास त्याचे पावडरमध्ये रूपांतरित करून ते दीर्घकाळ साठवली जाऊ शकते; परंतु वापरण्यापूर्वी गुणवत्ता तपासणी करणे गरजेचे असल्याचे संशोधकाचे मत आहे. ही पावडर कोरफड पानांपासून तयार केलेल्या जेलपासून बनविली जाते. जेलपासून पावडर बनविण्यासाठी स्प्रे ड्रॉइंग किंवा फ्रीज ड्रॉइंग या पद्धतीचा अवलंब केला जातो. ही पावडर त्वचार विकारमध्ये सौंदर्य प्रसाधने किंवा औषधी घटक म्हणून तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार विविध उत्पादनात विशिष्ट प्रमाणात वापरली जातात व बाजारपेठेत मोठी मागणी आहे.

**४) अन्नघटक व इतर पूरक पदार्थ उद्योग :** कोरफड वनस्पतीच्या काही वाण व प्रजातीच्या पानांमध्ये जीवन आवश्यक पोषक तत्त्व व आहार पूरक तत्त्व समाविष्ट आहेत. ज्यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, अमिनो ॲसिड इ. समावेश आहे. म्हणून कोरफडाचा वापर अन्नघटक व आहारपूरक पदार्थ उद्योगातही केला जात आहे.

**५) शाश्वत शेतीसाठी कोरफड खत :**

कोरफड वनस्पतीच्या पानात अनेक जैविक अद्वितीय घटक असल्यामुळे अलीकडच्या काळात त्याचा शेतीसाठी खत म्हणून वापर वाढत चालला आहे. मातीची गुणवत्ता व सुपीकता, सुधारण्यासाठी हे खत महत्त्वाचे असल्याचे संशोधनातून सिद्ध झाल्याचा साहित्यात उल्लेख आढळतो.

वरील नमूद केल्याप्रमाणे कोरफड ही वनस्पती आरोग्यासाठी सौंदर्यासाठी, पोषक तत्त्वासाठी पर्यावरणाच्या संतुलनासाठी शाश्वत शेती व उद्योगासाठी महत्त्वाची आहे. यापेक्षाही जास्त उपयोग शोधून काढण्यासाठी कोरफड संशोधनाला चलना देणे काळाची गरज आहे व ते नवीन उद्योग-व्यवसायाच्या समृद्धीसाठी आवश्यक आहे, असे मला वाटते.

*(या लेखाचे लेखक राळेगाव, जि. यवतमाळ येथील महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत असून त्यांचा भ्रमणध्वनी ९३७३७७८२१० आहे.)*

■■



- मोठ्या प्रमाणावर मोठेपण मिळविण्यासाठी इतरांना थोडा फार मोठेपणा द्यायला काहीच हरकत नाही.
- साहेबांची दिशाभूल करून आपण चांगले मार्क मिळविले अशी बऱ्याच जणांची गोड समजूत असते; पण जेव्हा साहेबाकडून त्याची दिशाभूल झाल्याचे लक्षात येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते.
- आपणच फार हुशार आहोत असे काही जण भासविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. या प्रयत्नाला इतरांनी चांगलाच प्रतिसाद दिल्यास ती व्यक्ती फारच हुशार असल्याचे सिद्ध होते; पण सत्य ओळखून प्रतिसाद न दिल्यास स्वतःची दिशाभूल होते.
- आपण फारच प्रामाणिकपणे काम करतो हे दाखविण्याचा काही कर्मचारी नाहक प्रयत्न करतात. कारण त्याच्या अविरत कामाचा निष्कर्ष साहेबाच्या हातात असतो.
- आपले म्हणणे खरे असेल तर साहेबाच्या चटकन लक्षात येते; पण वारंवार खोटे सांगून खरे करण्याचा प्रयत्न साहेबाच्या लगेच लक्षात येतो.
- साहेबाचा आपल्यावर किती विश्वास आहे हे दाखविण्यासाठी काही महाभाग अनेक क्लृप्त्या वापरतात. आपले काम इतरांना देऊन स्वतः फिरत असतात.
- सहायकाला सतत बोलून बरेच अधिकारी स्वतःलाच त्रास करून घेतात. कारण काय तर मी फार मोठा साहेब या न्यूनगंडाने त्याला ग्रासलेले असते.
- कामावरील कर्मचाऱ्याच्या फारच सुट्या वाढल्या तर तो खरोखरीच अडचणीत असावा अथवा त्याला काम आवडत नसावे अथवा त्याच्याकडे पुरेसे काम नसावे किंवा त्याला साहेबाचा स्वभाव आवडत नसावा असा अर्थ होतो.
- शहाण्या माणसाला तो शहाणा असल्याची जाणीव करून देण्याची गरज नसते. नाही तर तो तुमची गिणती अतिशहाण्यामध्ये करतो.
- कर्मचाऱ्याच्या चांगल्या कामाचे मूल्यमापन साहेब व्यवस्थित करतो तर सहकारी चांगले अवमूल्यन करतो.
- स्वतःच्या प्रति निष्ठा असलेली व्यक्ती पैशामागे धावते, कामावर निष्ठा असलेल्यांच्या त्याच्यामागे काम धावते तर संस्थेच्या प्रति निष्ठा असलेली व्यक्ती कामामागे धावते तर पैसा त्याच्यामागे धावतो.
- एखादा कर्मचारी कार्यालयात अतिशय त्रस्त आणि कामात सतत मग्न असल्याचे दाखवत असेल तर तो आपल्याकडे अतिरिक्त काम येऊ नये याची पूर्व तयारी करत असतो.
- कामसू (कमिटेड) कामाला प्राधान्य देतात, कर्तव्यदक्ष वेळेला, मेहनती कर्मचारी कार्यरत राहण्याला तर अतिहुशार श्रेय घेण्यावर लक्ष ठेवतात.
- एखादा कर्मचारी सहकाऱ्यांना आपल्या अनुभवांचे बोल दिवसातून अनेक वेळा ऐकवत असेल तर सदर कर्मचारी निवृत्तीच्या उंबरठ्यावर आलेला आहे असे खुशाल समजावे.

■■

# नमुना प्रकल्प अहवाल

## मिलेट उत्पादने तयार करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा मिलेट उत्पादने उत्पादित करण्याचा आहे. आजकाल जगभरात मिलेटचे महत्त्व त्यांच्यात असलेल्या औषधी गुणधर्मामुळे खाद्यपदार्थात वाढलेले आहे. मिलेटची उत्पादने खाद्यपदार्थात समाविष्ट केल्यास अनेक आजारांपासून संरक्षण मिळू शकते हे आता अनेक उदाहरणांसहीत स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे जगभरात व भारतात मिलेटच्या उत्पादनांची बाजारपेठ दिवसेंदिवस वाढते आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**
जागा ३,००० चौरस फूट
इमारत १,५०० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :**

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-५, अर्धकुशल-३, अकुशल-२

**लागणारी यंत्रसामग्री :**

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| **जागा विकासाला लागणारा खर्च :** | |
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |
| **इमारतीची आवश्यकता :** | |
| इमारत | भाड्याची |
| **यंत्रसामग्रीची आवश्यकता :** | |
| यंत्रसामग्री | ५०,००,००० |
| **इतर स्थिर संपत्तीचा खर्च :** | |
| वर्कशॉप फर्निचर | २,००,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **२,५०,०००** |
| **प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :** | |
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | ३०,००० |
| **खेळत्या भांडवलाची आवश्यकता :** | |
| कच्चा माल | ५,००,००० |
| पक्का माल | ३,००,००० |
| प्रत्यक्ष | ५०,००० |
| **एकूण :** | ८,५०,००० |
| **वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :** | |
| कच्चा माल | ६०,००,००० |
| **उपयुक्तिकेची आवश्यकता :** | |
| वीज | ४,००,००० |
| पाणी | ३६,००० |
| **एकूण :** | **४,३६,०००** |
| **मनुष्यबळाची आवश्यकता :** | |
| कुशल-५ | १२,१५,००० |
| अर्धकुशल-३ | ६,१८,००० |
| अकुशल-२ | ३,००,००० |
| **एकूण :** | २१,३३,००० |
| **देखभाल व दुरुस्तीचा खर्च :** | |
| यंत्रसामग्रीवर | १,५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ७,५०० |
| **एकूण :** | **१,५७,५००** |
| **घसाऱ्याचा खर्च :** | |
| यंत्रसामग्रीवर | ५,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | २५,००० |
| **एकूण :** | **५,२५,०००** |
| **प्रशासकीय खर्च :** | |
| पर्यवेक्षक | २,४०,००० |
| वॉचमन | ४८,००० |
| **एकूण :** | **२,८८,०००** |
| वाहतूक खर्च | ३,००,००० |
| प्रवास खर्च | २,५०,००० |
| इतर | १,३०,००० |
| **एकूण :** | **६,८०,०००** |
| **विक्री खर्च :** | |
| विक्रेते | ९०,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **१,४०,०००** |
| **प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :** | |
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ५०,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | २,५०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ३०,००० |
| **एकूण :** | **५२,८०,०००** |
| खेळते भांडवल | ८,५०,००० |
| **एकूण :** | **६१,३०,०००** |
| **मीन्स ऑफ फायनान्स :** | |
| स्वतःचे ३० टक्के | १८,३९,००० |
| बँकेचे कर्ज ९० टक्के | ४२,९१,००० |
| **प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :** | |
| कच्चा माल | ६०,००,००० |
| उपयुक्तिके | ४,३६,००० |
| वेतन व भत्ते | २१,३३,००० |
| देखभाल व दुरुस्ती | १,५७,००० |
| घसारा | ५,२५,००० |
| प्रशासकीय खर्च | ९,६८,००० |
| विक्री खर्च | १,४०,००० |
| **एकूण :** | **१०३,५९,५००** |
| **वार्षिक विक्री :** | **११६,०२,०००** |
| **वार्षिक नफा :** | **१२,४३,००८** |

# सिल्क उत्पादने

**ओळख :** सदरील प्रकल्प हा सिल्क उत्पादनांचा आहे. भारतातील केंद्र सरकारच्या शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढविण्यासाठी जे कार्यक्रम आखलेले आहेत त्या कार्यक्रमांपैकी एक म्हणजे रेशीम शेती करणे व त्यापासून रेशीम उत्पादने घेणे. जगभरात व भारतात मोठ्या प्रमाणात सिल्क उत्पादने व त्यांची बाजारपेठ वाढते आहे व ही बाजारपेठ दरवर्षी १२ ते १८ टक्के दराने वाढते आहे. या उत्पादनाला भारताला जगाच्या बाजारपेठेत चांगला हिस्सा कमावण्याची संधी आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

जागा ४,००० चौरस फूट

इमारत २,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :**

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-७, अर्धकुशल-३, अकुशल-२

**लागणारी यंत्रसामग्री :**

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ४०,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | २,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ५,००,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **७,५०,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | ३५,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ४,००,००० |
| पक्का माल | २,००,००० |
| प्रत्यक्ष | १,००,००० |
| **एकूण :** | **७,००,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ४८,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | ४,२०,००० |
| पाणी | ६०,००० |
| **एकूण :** | **४,८०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-५ | १३,५०,००० |
| अर्धकुशल-३ | ६,३०,००० |
| अकुशल-२ | ३,००,००० |
| **एकूण :** | **२२,८०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १,२०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | २२,५०० |
| **एकूण :** | **१,४२,५००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ४,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३५,००० |
| **एकूण :** | **४,३५,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक | ३,००,००० |
| वॉचमन | ८४,००० |
| **एकूण :** | **४,८४,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ३,५०,००० |
| प्रवास खर्च | १,७०,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **५,७०,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | २,७५,००० |
| इतर | ८०,००० |
| **एकूण :** | **३,५५,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ४०,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ७,५०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ३५,००० |
| **एकूण :** | **४७,८५,०००** |
| खेळते भांडवल | ७,००,००० |
| **एकूण :** | **५४,८५,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | १६,४५,५०० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | ३३,४९,५०० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ४८,००,००० |
| उपयुक्तिके | ४,८०,००० |
| वेतन व भत्ते | २२,८०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | १,४२,५०० |
| घसारा | ४,३५,००० |
| प्रशासकीय खर्च | ९,५४,००० |
| विक्री खर्च | ३,५५,००० |
| व्याज | ४,०१,९४० |
| **एकूण :** | **९८,४७,९४०** |
| **वार्षिक विक्री :** | **११५,२२,०४९** |
| **वार्षिक नफा :** | **१६,७४,१४९** |

# गोल्ड ज्वेलरी वर्कशॉप

**ओळख :** सदरील प्रकल्प हा गोल्ड ज्वेलरी वर्कशॉपचा आहे. या प्रकल्पामध्ये यंत्रसामग्रीच्या साह्याने बाजारपेठेत लागणाऱ्या वेगवेगळ्या गोल्ड ज्वेलरी तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. भारतीय बाजारपेठेत दागिन्यांचा वापर फार पूर्वीपासून होतो व तो वापर दिवसेंदिवस वाढतो आहे. त्यामुळे त्याची बाजारपेठ पण वाढते आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

जागा ३,००० चौरस फूट,

इमारत २,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :**

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-२, अर्धकुशल-२, अकुशल-१

**लागणारी यंत्रसामग्री :**

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | १५,००,००० |
| **एकूण :** | **१५,००,०००** |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | १,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | २,००,००० |
| इतर | ३०,००० |
| **एकूण :** | **३,३०,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता:**

प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च,
मार्केट सर्व्हे, कायदा खर्च

| | |
|---|---|
| **एकूण :** | **४०,०००** |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ३,००,००० |
| पक्का माल | ६,००,००० |
| प्रत्यक्ष | ५०,००० |
| **एकूण :** | **९,५०,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ३६,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १,८०,००० |
| **एकूण :** | **१,८०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-२ | ५,४०,००० |
| अर्धकुशल-२ | ४,२०,००० |
| अकुशल-१ | ९०,००० |
| **एकूण :** | **१०,५०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ७५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १७,००० |
| **एकूण :** | **९२,०००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १,५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३३,००० |
| **एकूण :** | **१,८३,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक | १,५०,००० |
| वॉचमन | ८४,००० |
| **एकूण :** | **२,३४,०००** |
| वाहतूक खर्च | ३,००,००० |
| प्रवास खर्च | ८०,००० |
| इतर | ३०,००० |
| **एकूण :** | **४,१०,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | -- |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **५०,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | १५,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ३,३०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ४०,००० |
| **एकूण :** | **१८,७०,०००** |
| खेळते भांडवल | ९,५०,००० |
| **एकूण :** | **२८,२०,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | ८,४६,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | १९,७४,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ३६,००,००० |
| उपयुक्तिके | १,८०,००० |
| वेतन व भत्ते | १०,५०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ९२,००० |
| घसारा | १,८३,००० |
| प्रशासकीय खर्च | ४,४४,००० |
| विक्री खर्च | ५०,००० |
| व्याज | २,३६,८८० |
| **एकूण :** | **५८,३५,८८०** |
| **वार्षिक विक्री :** | **६८,८६,३३८** |
| **वार्षिक नफा :** | **१०,५०,४५८** |

**संजय सिधये**

*(या प्रकल्प अहवालाचे लेखक हे स्वतः व्यवस्थापन सल्लागार असून गेली २३ वर्षे या क्षेत्रामध्ये प्रशिक्षण व सल्ला देण्याचे कार्य करत आहेत. ते स्वतः एक उद्योजक आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०४५५०७९९ असून ई-मेल shidhayesanjay7@gmail.com आहे. प्रकल्प अहवालामधील किमती त्या-त्या जागेप्रमाणे व स्वतःच्या गुंतवणुकीप्रमाणे बदलू शकतात.)*



# प्रश्नपेटी

**प्रश्न : लाईमस्टोनपासून प्लास्टिक उत्पादनाच्या प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**प्रसन्न देशपांडे, कोल्हापूर**

**उत्तर :** लाईमस्टोनपासून प्लास्टिक उत्पादनाच्या प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

जागा १५,००० चौरस फूट

इमारत ५,००० चौरस फूट

उपयुक्ततेची आवश्यकता :

वीज ५० अश्वशक्ती

पाणी १० के.एल.

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-५, अर्धकुशल-३, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक आर्टिफिशियल प्लास्टिक मेकिंग प्लान्ट.

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारचे व गुणवत्तेचे लाईमस्टोन

या प्रकल्पासाठी एकूण भांडवल ५०० ते ७०० लाख रुपये लागू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ३०० ते ५०० लाख व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १०० ते २०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २२ ते २४ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १३ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : व्हेइकल स्क्रॅपिंग सेंटर प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**अभिजित पाटील, नागपूर**

**उत्तर :** व्हेइकल स्क्रॅपिंग सेंटर प्रकल्पाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

जागा २०,००० चौरस फूट

इमारत १०,००० चौरस फूट

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-७, अर्धकुशल-३, अकुशल-४

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक व्हेइकल स्क्रॅपिंग मशीन मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारच्या गुणवत्तेचे व दर्जाचे व्हेईकल्स

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल १५० ते २०० लाख रुपये असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १०० ते १५० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ३० लाख ते ५० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २२ ते २७ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा ३२ ते ३४ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : वैदिक प्लास्टर प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विशाल सुतवणे, नाशिक**

**उत्तर :** वैदिक प्लास्टर प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा ५,००० चौरस फूट

इमारत २,००० चौरस फूट

उपयुक्ततेची आवश्यकता :

वीज १५ अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-२, अकुशल-१

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक वैदिक प्लास्टर मेकिंग प्लान्ट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे व ग्रेडचे वैदिक मटेरियल

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ३० ते ५० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता २० ते ३० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १० ते २० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ३५ ते ३७ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा ९ ते १२ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : सिल्क ड्रेसिंग प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**धीरज कटके, जळगाव**

**उत्तर :** सिल्क ड्रेसिंग प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे.

मूलभूत सुविधांची गरज :

जागा ५,००० चौरस फूट,

इमारत ३,००० चौरस फूट

उपयुक्ततेची आवश्यकता : वीज १० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-१, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक सिल्क ड्रेसिंग प्लान्ट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारचे सिमेंट, केमिकल्स इत्यादी.

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २० ते ३० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १५ ते २० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ७ लाख ते ९ लाखांपर्यंत कोटींपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ३२ ते ३५ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा ११ ते १३ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

*(टीप : प्रश्नपेटीसाठी प्रश्न विचारणाऱ्या वाचकांनी आपला प्रश्न मोजक्या शब्दांत मांडावा. प्रश्न एकच विचारावा, एकच प्रश्न विचारणाऱ्या वाचकांना प्राधान्याने थोडक्यात उत्तर देण्यात यईल.)*

## उद्योग, व्यापार, व्यवसायाद्वारा स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सर्व काही...

प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, राज्य शासनाच्या उद्योगासंबंधीच्या योजना इत्यादीसंदर्भात माहिती.

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

# उद्योजक


अ-३८, एम.आय.डी.सी., रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

**E-mail :**
**Editorial** : udyojakmagazine2@gmail.com
**Subscription** : udyojaksubscription@gmail.com
**Advertisement** : udyojakadvt@gmail.com


To know more about MCED please visit our
**Portal**
www.mced.co.in

## वर्गणीदारांसाठी सूचना

*('उद्योजक' मासिकाच्या ज्या वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत अथवा अनियमितता आहे अशा वर्गणीदारांनी कृपया आपल्या तक्रारी एक महिन्याच्या आत खालील भ्रमणध्वनीवर एसएमएसद्वारे नोंदवाव्यात. एक महिन्यानंतर केलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तक्रार नोंदवताना वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम तसेच जो अंक मिळाला नाही त्याचा तपशील थोडक्यात कळवावा, जेणेकरून उद्योजक वितरण विभागाला आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करता येईल. भ्रमणध्वनी क्र. ९४०३६८३११६).*

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संपादक,
'उद्योजक' मासिक,
अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : 'उद्योजक' मासिकाचे वर्गणीदार होण्याबाबत...

महोदय,
'उद्योजक' मासिकाचा वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक सभासद होऊ इच्छितो. सोबत वर्गणीची रक्कम डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डर रु......... 'एमसीईडी औरंगाबाद'चे नावे पाठवत आहोत. कृपया आम्हाला 'उद्योजक' मासिक पुढील पत्त्यावर नियमितपणे पाठवावे.

पूर्ण नाव (आडनाव प्रथम) ____________________

पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ____________________

____________________

पिन कोड ____________________

कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

नाव ____________________

### वर्गणीचे दर

| वर्गणी | अर्ध वार्षिक | वार्षिक | द्वैवार्षिक | त्रैवार्षिक |
|---|---|---|---|---|
| रुपये | ५००/- | ९००/- | १७००/- | २५००/- |

### जाहिरातींचे दर

| जाहिरातीचा आकार | नियमित अंकांसाठी |
|---|---|
| मलपृष्ठ (चार रंगी) | ५०,००० |
| कव्हर क्र. २ व ३ (चार रंगी) | ३०,००० |
| आतील पाने (चार रंगी) | २५,००० |
| अर्धे पान (चार रंगी) | १५,००० |
| पाव पृष्ठ (चार रंगी) | ८,००० |

- ५% जी.एस.टी. अतिरिक्त लागेल.
- जाहिरातीचे आर्टवर्क तयार करून पाठविणे.
- जाहिरातीचे आर्टवर्क PDF / CDR / JPEG मध्ये आवश्यक.
- संस्थेच्या प्रशिक्षित उद्योजकांना जाहिरात दरात १०% सवलत.
- जाहिराती udyojakadvt@gmail.com वर पाठवाव्यात.

उद्योजक मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी पुढील बारकोड स्कॅन करून वर्गणीदार व्हा..!

ऑफिसर कोड 40 टाका. वर्गणीची नोंदणी करताना काही अडचण आल्यास 9403078779 वर संपर्क साधा.

वर्गणी/जाहिरातीचे पेमेंट https://mced.co.in/Subscription/ या लिंकवर करावे

कृपया पेमेंट 'एमसीईडी औरंगाबाद' (महाराष्ट्र) च्या नावे डिमांड ड्राफ्टने/मनिऑर्डरद्वारे पाठवावे अथवा 'उद्योजक' मासिकाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, रेल्वे स्टेशन शाखा, औरंगाबादच्या खाते क्र. ५२०६५८८३५९६. IFSC Code : SBIN 0020302 वर भरून त्याची सूचना तात्काळ एसएमएसद्वारे यूटीआर नंबर व उद्योजक मासिक पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी सविस्तर पत्ता भ्रमणध्वनी ९४०३६८३११६. वर कळवावा.

# उद्योजक

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, 'उद्योजक' मासिक वर्गणी/जाहिरात

### संपर्काचे पत्ते

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गेल्या दीड दशकभरापासून प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या उद्योजकीकरणाची मोहीम स्वयंसेवकाच्या निष्ठेने राबवीत आहेत. केंद्राच्या शास्त्रशुद्ध उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात हजारो पहिल्या पिढीचे उद्योजक तयार झाले आहेत. हे लोण तळागाळापर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे. समृद्धीकरणाचा हा विचार जनसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यासाठी 'उद्योजक' मासिकही यशस्वीरीत्या उद्योजकतेविषयीचे ज्ञान प्रसार करीत आहे. केंद्राच्या कार्यक्रमाविषयी आणि उद्योजकच्या वर्गणी/जाहिरातींविषयी खालील प्रकल्प अधिकारी मित्र चर्चेसाठी सदैव उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील तरुणांनी, महिलांनी याचा फायदा जरूर घ्यावा. दहा हजार अधिक वर्गणीदार असलेले 'उद्योजक' कधी कधी परिस्थितीजन्य कारणांमुळे वेळेवर पोहोचत नसल्यास, वर्गणीदाराचा पत्ता बदलला असल्यास, नवीन वर्गणीदार व्हायचे असल्यास किंवा जाहिरात द्यायची असल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधून समाजाच्या उद्योजकीकरणाच्या मोहिमेला हातभार लावावा.

# महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे (एमसीईडी) राज्यातील कार्यालयांचे पत्ते

**मुंबई विभाग :** श्री.डी.यु.थावरे, विभागीय अधिकारी, कोकण विभाग, श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, कोकण भवन, ५वा मजला, रूम क्र.५१२ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. ☎२७५६३८१६, २७५६४०२५, ९४०३०७८७६६. श्री.प्रदीप सावंत, क.प्र.अ. (से.पू.), मुंबई शहर/उपनगर, द्वारा विकास सेंटर, ७वा मजला, रुम नं.७०२, डॉ.सी.जी.गिडवाणी मार्ग, बसंत टॉकीजजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई-४०० ०७४, ७९७७२४२१६७. श्री.सुबोध बायस, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सी.एफ.सी.बिल्डिंग, पहिला माळा, मुलुंड चेक नाका, ठाणे (प)-४०० ६०२. ७७७४०५३०१४. श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रायगड बाझारसमोर, अलिबाग, जिल्हा रायगड-४०२२०१. ९४०३०७८७७२. श्री.धम्मपाल थोरात, जि.प्र.समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत-अ, पहिला मजला, कक्ष क्र.१०३, कोळगाव, ता.जि.पालघर. ☎८६६९०५४०७८. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ. (से.पू.) एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बीडीओ स्टाफ क्वार्टरमागे, जेल मार्ग, रत्नागिरी. ☎२२१९८८, ९४०३०७८७६७. श्री.राजेश कांदळगांवकर, प्र.अ., द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला, ए ब्लॉक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग. ☎२२१३६२, २२८७०५, ८१८०९९७९०९. धारशिला धर्माधिकारी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग संचालनालय, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. ९४०५०५९०२०. **पुणे विभाग :** डॉ.अभिराम डबीर, विभागीय अधिकारी, श्री.एन.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५. ☎ ९४०३०७८७५९,९४०३०७८७६५,२५५३७७२४/२५५२०३५९. श्री.एन.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, सी-१८१, एच ब्लॉक, इंजिनिअरिंग ऑटो क्लस्टर परिसर, एमआयडीसी, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०१९. ☎९४०३०७८७६५. श्री.राजशेखर शिंदे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेलसमोर, सोलापूर-४१३००३. ☎२६०५०३३, २३२२५२६, ९४०३६८३२११. सौ.शितल पाटील, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.ए-१३,औद्योगिक वसाहत, सातारा-४१५ ००४. ☎२४६५५५, २४४६५५, ८७८८११०१८९. सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), प्लॉट क्र.३१५, दत्ताजी चेंबर्स, ई वॉर्ड, न्यू शाहूपुरी, मराठा रिजन्सी हॉटेलसमोर, कोल्हापूर-४१६६०१. ☎(०२३१) २६६२०७१,९४२२८१०८६३. श्री.प्रवीण कायंदे, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला, महावीर गार्डनसमोर, कोल्हापूर-४१६ ६०१. ☎(०२३१) २६६६७४८,९४०३०७८७७४. श्री.किरण बनसोडे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१६. ☎२६७११६९. **नाशिक विभाग :** श्री.आलोक मिश्रा, विभागीय अधिकारी, श्री.एस.ए.भामरे, प्रकल्प अधिकारी, श्री.मंगेश बनकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), ११, तळमजला, उद्योग भवन, त्र्यंबक मार्ग, सातपूर, नाशिक, ☎२३५२१५१, २३६३४१४, ९४०३०७८७६३, ७७२००७५९०१, ८२०८०५५०११. आरती शेलोरकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी मार्ग, धुळे-४२४००१, ८७८८५५७५३०. श्री.रमेश जाधव, क.प्र.अ. (से.पू.) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशन मार्ग, अहमदनगर महाविद्यालयाजवळ, अहमदनगर. ☎२३२०४८५,९४०४९५०००४. श्री.दिनेश गवळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रिंग रोड, राष्ट्रीय महामार्ग, जळगाव-४२५ ००१. ☎२२५२८३२, ७७२००७५९०१. श्री.डी.एस.लाकणे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, खोली क्र.२८ नांदुरबार. ☎ ०२५६४-२१०५१०, ८८८८५१०४९९.

**नागपूर विभाग :** श्री.एच.आर.वाघमारे, विभागीय अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी, शिवानी गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), उद्योग भवन, सिव्हिल लाइन्स, उच्च न्यायालयामागे, विक्री कर कार्यालयाजवळ, नागपूर. ☎२५३७०१७, ७७७४०३६२३२, ९४०३०७८७६०. श्री.एच.आर.वाघमारे, प्र.अ., उपकेंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, श्री.पंकज ठाकरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), हिंगणा औद्योगिक परिसर, नागपूर, मो. ९४२२२७६७०१, ७७७४०३६२३२, ८९७५५०६६३०. श्री.रोशन तायवडे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा-४४२ ००१. ☎२४३४६३, ९८३४३५२२९५. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग भवन, ब्लॉक क्र.८, दुसरा मजला, बस स्टॅंडसमोर, रेल्वे स्टेशन मार्ग, चंद्रपूर. ☎ २७४४१६, ९४०३०७८७७३. श्री.जितेंद्र चौरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सिव्हिल लाइन्स, भंडारा. ☎२५८८६७, २५२३४७१, ९०२१६९३०६०. श्री.खटेश्वर टेकाळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), डोरलीकर भवन, नगर परिषदेजवळ, धानोरा मार्ग, गडचिरोली. ☎२२३३६५. संगीता डोंगे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), बोपचे भवन, हॉटेल सागरसमोर, बालाघाट मार्ग, गोंदिया-४४१ ६१४. ☎२५०२७४, ८७८८६४८९६४. **छत्रपती संभाजीनगर विभाग :** श्री.एस.के.थोटे., विभागीय अधिकारी, सौ.भारती सोसे, क.प्र.अ. (से.पू.) सौ.प्रतिभा निमकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, अ-३८, रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१. ☎२३६१२२३. ९४०३०७८७५३, ९४०३६८३१७३, ९८८१३०४९३०. श्री.विनोद तुपे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.पी-७, अतिरिक्त औद्योगिक वसाहत, जालना. ☎२२०२०३०६२८, ९०४९२२८८८८. श्री.दत्तात्रय क्षीरसागर, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बशीर गंज, बीड-४३१ १२२. ☎२२२२८५, ९८६०४९५५४५. श्री.पांडुरंग कांबळे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर, उस्मानाबाद-४३१ ५०१. ☎२२१५०५, ८२७५०९३२२८. श्री.शंकर पवार, क.प्र.अ. (से.पू.), उद्योग भवन, तळ मजला, शिवाजीनगर, नांदेड. मो.९४०३६८३१९७. श्री.के.व्ही.राठोड, प्रकल्प अधिकारी, हॉल क्र.७४, सर्व्हे नं. ६२२, वार्ड क्र.२०, विद्यावार नगर, शासकीय कृषी कार्यालयाजवळ, जुना पेडगाव रोड, परभणी-४३१ ४०१. ☎२३३२७५, ९४०३०७८७७३. श्री.दिपक गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-१, एमआयडीसी परिसर, लातूर-४१३ ५३७. ☎२२११००, ९४०४९५०००४. श्री.सुधीर आठवले, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली. ☎२२२२१८, ९७६५२९१७८५. **अमरावती विभाग :** श्री.किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, श्री.पी.व्ही.इंगळे, प्रकल्प अधिकारी, श्री.राजेश सुने, क.प्र.अ. (से.पू.), श्री.नेत्रदीप चौधरी, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), टांक चेंबर्स, गाडगेनगर, व्ही.एम.व्ही. मार्ग, अमरावती-४४४ ६०२. ☎२६६०३१६, २६६५४७२, ९४०३०७८७८३, ८८५७८६९८८३, ९८२२४४१२०९. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४ ६०२. ☎२४३५६८,० ९४०५३१५९४६. श्री.गणेश गुप्ता, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जतकर भवन, टिळकवाडी, बस स्टॅंड मार्ग, बुलढाणा, ☎२४२३६७/२४२६०४, ९८६००००६८१. श्री.रूपेश हिवलकर, क.प्रकल्प अधिकारी (से.पू.), उद्योग भवन, अमरावती मार्ग, यवतमाळ. ☎२५५४१३, ८२७५०९३२३०. श्री.गौरव इंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्रासमोर, काटा मार्ग, शासकीय दूध डेअरीजवळ, वाशिम, मो. ९४०५५४८३२९

Rgd.No.RNI-66017/96 Udyojak October 2024
Date of Publication : 25th September 2024

For Posting under the Registration No. ABD/66/2022-2024 & Without Pre Payment of Postage of Posting WPP
License No.AR/Tech/WPP/Udyojak/AGD Dn/2021-22 Dated 08.03.2022 for the calendar year 2022 to 2024


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगार निर्मितीचे,
# उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

* "नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा"
* मार्गदर्शन व गुंतवणूकीसाठी पैशांचा अभाव आहे का?
* उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही का?
* तर उद्योजक होण्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपीचा लाभ घ्या.

* या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख तर
* सेवा व कृषि पूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज पुरवठा.
* मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे.
* तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वंयरोजगार उभारण्यासाठी आजच सीएमईजीपीचा लाभ घ्या.



: अधिक माहिती व संपर्कासाठी :

राज्यस्तरीय संनियंत्रण : विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
हेल्पलाईन नंबर : २२ २२०२ ३६१२.
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा) जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)
संकेतस्थळ : www.di.maharashtra.gov.in, www.maha-cmegp.gov.in, www.mced.co.in

Scan Me

**Visit us @ https://www.maha-cmegp.gov.in**


If undelivered please return to

Chief Editor,
Udyojak Magazine, उद्योजक

MCED, A-38, MIDC Railway Station Area,
**Chhatrapati Sambhajinagar-431005.**
Portal : www.mced.co.in

To,

Published & Printed by Santosh Borde on behalf of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), Printed at M/s.Printwell International Pvt.Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar-431 006. Published from MCED, A-38, MIDC Railway Station Area, Chhatrapati Sambhajinagar-431 005. **Chief Editor : B.T. Yeshwante**